CMYK

४२ वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ | वर्ष ४ थे अंक १४८ | पाने १२+४ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



## विचारपुष्प



समष्टी धर्माचे मूळ तत्त्व म्हणजे, व्यक्ती आपल्या कुटुंबाविषयी जशी धारणा बाळगून असते, तशीच धारणा तिने संपूर्ण समाजाबद्दल ठेवली पाहिजे.

**– स्व. बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# ‘जेन-झी’ प्रामाणिक अन् देशभक्त

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन; नव्या पिढीला विश्वासात घेण्याची गरज

**मुंबई, ६ ऑगस्ट**

समाजात अनेकदा आजच्या आधुनिक तरुण पिढीच्या वागण्या-बोलण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जातात. मात्र, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी या ‘जेन-झी’ पिढीबाबत अत्यंत सकारात्मक आणि आश्वासक विचार मांडले आहेत. आजची नवी पिढी ही आमच्या पिढीपेक्षाही अधिक प्रामाणिक आणि देशभक्त आहे. त्यांच्यावर अविश्वास दाखवण्यापेक्षा आपण त्यांना समजून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. भागवत यांनी केले. मुंबईतील बीकेसी भागात आयोजित भव्य कार्यक्रमात तरुणाईशी त्यांनी संवाद साधला.



मुंबई येथील इंडियाज मुव्हमेंट टू युनायटेड नेशन्सच्या एका कार्यक्रमादरम्यान या संस्थेचे संस्थापक ऋषभ शाह यांच्यासोबत संवाद साधताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत

तंत्रज्ञानाच्या युगात वावरणारी आजची युवा पिढी भरकटत चालली आहे, असा एक सर्वसामान्य समज जुन्या पिढीमध्ये अनेकदा दिसून येतो. मात्र, या समजाला छेद देत डॉ. मोहनजी भागवत यांनी नव्या पिढीच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. ते म्हणाले की, या पिढीमध्ये देशाबद्दल प्रचंड प्रेम आणि तळमळ आहे. त्यांचा प्रामाणिकपणा हा त्यांच्या विचारांमधून आणि कृतीतूनही दिसून येतो. केवळ त्यांच्या व्यक्त होण्याच्या पद्धती आधुनिक आणि वेगळ्या असू शकतात, पण त्यांची मातृभूमीवर असलेली निष्ठा वादातीत आणि ज्वलंत आहे.

सध्याच्या काळात देशात वेगवेगळ्या मुद्द्यांवरून तरुणांकडून होणाऱ्या आंदोलनांच्या पृष्ठभूमीवर बोलताना डॉ. मोहनजी भागवत यांनी एका अत्यंत महत्त्वाच्या सामाजिक पैलूकडे लक्ष वेधले. तरुणांची आंदोलने ही देशविरोधी किंवा विघातक प्रवृत्तीतून होत नाहीत, तर ती संवादाच्या अभावामुळे उद्भवतात, असे परखड मत त्यांनी मांडले. आपण या पिढीला योग्य प्रकारे समजून घेण्यात कमी पडत आहोत. त्यांच्याशी आपला संवाद तुटल्याने, त्यांच्या मनात असलेल्या शंकांचे आणि प्रश्नांचे निरसन न झाल्यानेच ते आंदोलनाचा मार्ग पत्करतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

आजची तरुण पिढी अत्यंत प्रामाणिक असून, मला डोळे झाकून कोणावर विश्वास ठेवायचा असेल, तर मी या नव्या पिढीवर नक्कीच ठेवेन, अशी पावती डॉ. मोहनजी भागवत यांनी तरुणाईला दिली. ‘जेन झी’ आणि ‘जेन अल्फा’ च्या प्रतिनिधींसोबत नुकत्याच झालेल्या एका दिलखुलास संवादात त्यांनी विविध ज्वलंत व आधुनिक प्रश्नांवर संघाची भूमिका अतिशय परखडपणे मांडली. हा संवाद केवळ प्रश्नांची उत्तरे देणारा नव्हता, तर भरकटत चाललेल्या समाजाला सांस्कृतिक आणि राष्ट्रीय भान देणारा ठरला.

पाश्चात्य प्रभावाखालील एलजीबीटीक्यू आणि समलिंगी विवाहाच्या मुद्द्यावर त्यांनी भारतीय संस्कृतीचा व्यापक दृष्टिकोन मांडला. ते म्हणाले की, हा समुदाय आपल्याच समाजाचा भाग आहे आणि त्यांना सामावून घेण्याची आपली मोठी परंपरा आहे. मात्र, विवाह ही आपल्या संस्कृतीत केवळ एकत्र राहण्याची सोय नसून, ती एक पवित्र संस्था आहे, हे त्यांनी निक्षून सांगितले. कुटुंब व्यवस्था आणि पुढची पिढी घडवण्याचे कार्य याच विवाह संस्थेतून होते. त्यामुळे या पारंपरिक व्यवस्थेशी छेडछाड करणे योग्य नाही. या समुदायाला सामावून घेण्यासाठी समाजाने एखादा वेगळा कायदा किंवा व्यवस्था केल्यास हरकत नाही. परंतु, विवाहाचे मूळ स्वरूप बदलता येणार नाही, ही संघाची ठाम भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

### राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य

राष्ट्रनिर्माणात महिलांच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना, महिला आणि पुरुष हे एकमेकांना पूरक आणि समान आहेत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेसारख्या

(शेवटच्या पानावर)

### आजच्या पिढीला तार्किक उत्तरे हवीत

तरुणांच्या आंदोलने आणि प्रश्नांबाबत बोलताना सरसंघचालक म्हणाले की, आजची पिढी प्रश्न विचारते कारण त्यांना तार्किक उत्तरे हवी असतात आणि संवादातूनच मार्ग निघू शकतो. तरुणाईच्या प्रामाणिकपणाचे आणि देशभक्तीचे कौतुक करत असतानाच, त्यांनी शिक्षणाच्या बाजारीकरणावर कडक प्रहार केला. शिक्षण हा व्यापार नाही, ती जीवनाची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. शिक्षणासाठी केवळ सरकारवर विसंबून न राहता, समाजाने आपली जबाबदारी ओळखून शाळांच्या आणि शिक्षणाच्या विकासासाठी थेट सहभाग घ्यायला हवा, असे आवाहन त्यांनी केले. ■

### तरुणाईशी मैत्रीपूर्ण संवादाची गरज

ज्येष्ठ पिढीने नव्या पिढीवर केवळ टीका करण्याऐवजी त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधण्याची गरज आहे. जर आपण त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संवाद साधला, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली आणि त्यांना विश्वासात घेतले, तर त्यांच्यातील या प्रचंड ऊर्जेचा वापर राष्ट्रउभारणीच्या विधायक कार्यासाठी निश्चितच करता येईल. ही तरुण पिढीच भारताचे उज्ज्वल भविष्य असून, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे आपले कर्तव्य असल्याचेही यातून अधोरेखित करण्यात आले आहे. ■

## ‘काम नाही, तर पगारही नाही’

### डॉक्टरांचा संप मागे

**मुंबई, ६ ऑगस्ट**

महाराष्ट्रातील डॉक्टरांनी पुकारलेले आंदोलन आणि कामबंद ठेवल्यामुळे प्रत्यक्ष जीवनावर होणाऱ्या परिणामांबाबत मुंबई उच्च न्यायालयाने प्रश्न उपस्थित केल्यानंतर काही तासांतच इंडियन मेडिकल असोसिएशनने (आयएमए) हा संप तत्काळ मागे घेत असल्याचे न्यायालयाला कळवले. मात्र, आमच्या तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे सांगितले. आम्ही आंदोलन करीत असलो, तरी आपत्कालीन सेवा बंद ठेवल्या नव्हत्या, असे सरकारी डॉक्टरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्सच्या (मार्ड) मध्यवर्ती शाखेचे अध्यक्ष डॉ. अथर्व शिंदे यांनी सांगितले.

आयएमएने संघर्षाचा मार्ग स्वीकारल्यास त्यांचे वेतन थांबवण्यास भाग पाडले जाईल, असा इशारा न्यायालयाने सुनावणीच्या दुसऱ्या सत्रात दिला. रुग्णांचे हाल करून तुम्ही संप करणार का? काम नाही, तर वेतनही मिळणार नाही, असे प्रभारी मुख्य न्यायाधीश रवींद्र व्ही. घुगे आणि न्या. गौतम ए. अखंड यांच्या खंडपीठाने म्हटले. महानगरपालिका किंवा सरकारी रुग्णालयात एकही रुग्ण दगावता कामा नये. ◂ (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### तेजीने निफ्टी २४,६०० च्या पार

**मुंबई :** गुरुवारी झालेल्या चढाओढीच्या सत्रात भारतीय शेअर बाजाराने वाढ नोंदवली. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या शेअर्समध्ये झालेल्या जोरदार खरेदीच्या जोरावर निफ्टीने २४,६०० चा टप्पा पार केला. मात्र, धातू, मीडिया आणि रिअल्टी क्षेत्रातील घसरणीमुळे बाजारातील ही वाढ काही प्रमाणात मर्यादित राहिली. सत्राच्या अखेरीस सेन्सेक्स ३७३.७६ अंकांच्या वाढीसह ७८,९५४.७६ वर बंद झाला. तर निफ्टी ११.३५ अंकांच्या वाढीसह २४,६३६ वर स्थिरावला. बाजारात एकूण २०२३ शेअर्समध्ये वाढ झाली, २०५८ शेअर्स घसरले आणि २०० शेअर्सच्या भावात कोणताही बदल झाला नाही.

## एससी, एसटी आरक्षणाला क्रिमिलेयर लागू नाही

### केंद्र सरकारचे सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र



**नवी दिल्ली, ६ ऑगस्ट**

एससी आणि एसटी आरक्षणासाठी क्रीमी लेयरचे तत्त्व लागू होत नाही, असे केंद्राने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्ट केले आहे.

एससी आणि एसटी यांच्या आरक्षणात 'क्रीमी लेयर'चे तत्त्व लागू करण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकांना तसेच सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण अधिक न्याय्य करण्यासाठी धोरणे आखण्याचे केंद्र सरकारला निर्देश देण्याच्या मागणीला सरकारने विरोध केला आहे. या जनहित याचिकांमध्ये संविधानांतर्गत असलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्याचे दिसले नाही, असे सरकारने म्हटले आहे.

एससी आणि एसटींना 'क्रीमी लेयर'चे तत्त्व लागू होते, असे कुठेही विशेषत्वाने नमूद केलेले नाही. 'क्रीमी लेयर'च्या संकल्पनेचा दिलेला संदर्भ प्रामुख्याने ओबीसी/एसईबीसीच्या आरक्षणासंदर्भातील एक सामान्य निरीक्षण असल्याचे दिसून येते.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

## अविवाहित तरुणाची कंबर तलावात उडी मारून आत्महत्या

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**



टॉवेल कारखान्यातील एका कामगाराने कंबर तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी रात्री पावणेदहा वाजता उघडकीस आली. दरम्यान आत्महत्या करण्यापूर्वी त्याने आपल्या भावजीला फोन करून आई वडील बहिणाला सांभाळा मी आता जगतो की मरतो माहिती नाही, असे सांगितल्याचे समोर आले आहे. व्यंकटेश पांडुरंग बलमेरी (वय २६ वर्ष, रा. गवळी वस्ती, आकाशवाणी केंद्राजवळ) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. तो एमआयडीसीतील टॉवेल कारखान्यात कामास होता. तो ४ ऑगस्ट रोजी सकाळी घरातून न सांगता दुचाकी घेऊन बाहेर पडला होता. रात्री उशिरापर्यंत न आल्याने घरातील लोकांनी एम आयडीसी पोलिसात मिसिंग तक्रार दिली होती. पोलिसांनी त्याच्या मोबाईल ट्रॅकवरून शोध घेतला असता त्याची दुचाकी आणि मोबाईल कंबर तलावाजवळ आढळली होती. मात्र तो सापडला नव्हता. दरम्यान बुधवारी रात्री पावणेदहा वाजेच्या सुमारास कंबर तलावातील पाण्यात अनोळखी तरुणाचा मृतदेह तरंगताना आढळून आला. सदर बझारच्या पोलिसांनी चौकशी केली असता तो मृतदेह व्यंकटेश बलमेरी याचा असल्याचे निष्पन्न झाले. पोलीस हवालदार जी. एल. काळे यांनी सदरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात रात्री अकरा वाजता दाखल केला. मयत व्यंकटेश बलमेरी याच्या पश्चात आई-वडील आणि एक विवाहित बहीण असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

### घटनेपूर्वी आईशी आणि मित्राशी फोनवर संवाद

घटनेपूर्वी व्यंकटेशने आईशी आणि एका मित्राशी फोनवर संवाद साधला होता. मित्राशी बोलताना त्याचा कंठ दाटून आला होता, तो जोरात रडत होता... आणि अचानक फोन कट झाला. आईशी फोनवर बोलताना त्याने माझ्या अकाउंटमधील सर्व पैसे गेल्याचे सांगितले, आता मी राहतो की मरतो माहिती नसल्याचे तो म्हणाला. तसेच फोनवर भावजीला बोलताना त्याने आई वडील बहिणाला सांभाळण्यास सांगितले होते.

## '... तर लिंगभेदमुक्त, संवेदनशील आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती'

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट -**

स्त्रीभ्रूण हत्या रोखणे आणि मुलींच्या जन्माचा सन्मान राखणे ही केवळ कायद्याची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे. समाजात व्यापक जनजागृती झाल्यासच लिंगभेदमुक्त, संवेदनशील आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती होईल, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे सचिव तथा न्यायाधीश अमोलकुमार ए. देशपांडे यांनी केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्या वतीने 'गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवड प्रतिबंध) कायदा, १९९४' या विषयावर विधी स्वयंसेवकांसाठी आयोजित जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अ‍ॅड. पल्लवी कुलकर्णी यांनी वरील कायद्याची उद्दिष्टे, गर्भलिंग निदानावरील कायदेशीर बंदी, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि स्त्रीभ्रूण हत्येचे सामाजिक दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन केले. न्यायाधीश अमोलकुमार ए. देशपांडे यांनी मार्गदर्शन करताना विधी स्वयंसेवकांच्या भूमिकेवर भर दिला. ग्रामीण व शहरी भागात झउझछऊढ कायद्याबत व्यापक जनजागृती करून नागरिकांपर्यंत योग्य आणि अचूक माहिती पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांमध्ये कायद्याविषयी विश्वास निर्माण करण्यासाठी विधी स्वयंसेवकांनी कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## चित्रकार डॉ. सचिन खरात यांच्या कलाकृती द ताजमहाल पॅलेसमध्ये

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट -**



भारतीय चित्रशैलीची समृद्ध परंपरा जपत आपल्या अनोख्या कलाकृतींनी रसिकांची मने जिंकणारे प्रसिद्ध चित्रकार डॉ. सचिन खरात यांच्या ओरिजिनल चित्रांचे भव्य प्रदर्शन मुंबईतील नामांकित द ताजमहाल पॅलेस येथे आयोजित करण्यात आले आहे. विवर्त या उपक्रमांतर्गत हे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. मेराकी आर्ट फेडरेशनच्या वतीने आयोजित कला प्रदर्शन १४ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत मुंबईतील द ताजमहाल पॅलेस येथे आयोजित करण्यात आले आहे. डॉ. सचिन खरात यांनी आपल्या कलाप्रवासात भारतीय चित्रशैली जोपासण्यावर व ती समृद्ध करण्यावर विशेष भर दिला आहे. त्यांच्या चित्रांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा आणि मानवी भावनांचे अप्रतिम प्रतिबिंब पाहायला मिळते. भारतीय कलेची मुळे घट्ट धरून ठेवणाऱ्या त्यांच्या या चित्रांचा अनुभव कलाप्रेमींसाठी खास असणार आहे. कलाकारांविषयी आणि त्यांच्या कलाकृतींविषयी आदर व्यक्त करण्यासाठी तसेच त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी मेराकी आर्ट फेडरेशनतर्फे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील सर्व कलाप्रेमी, चित्रकार आणि रसिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन डॉ. सचिन खरात यांच्या भारतीय शैलीतील अप्रतिम कलाकृती जवळून पाहाव्यात, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# सोलापूर शहर-जिल्ह्यात पावसाच्या हलक्या सरी

### पाणीसाठ्यासाठी आता मोठ्या पावसाची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

शहर आणि जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या हलक्या सरी पडत असून, गुरूवारी तर दिवसभर अशा सरीवर सरी सोलापुरात पडत असल्याने चाकरमाने आणि शालेय विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल झाले. दरम्यान, पिण्याचे आणि सिंचनासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी आता मोठ्या पावसाची गरज आहे.

गेल्या २ महिन्यांत जिल्ह्यात अवघा १५७ मिमी पाऊस नोंदला गेला आहे. या पावसाने खरिपातील पिकांना दिलासा मिळत असला तरी काही भागात पाऊसच न पडल्याने त्यांनी खरिपाच्या पेरण्याही केल्या नाहीत, असे सांगण्यात येते. यंदा पावसाअभावी खरिपाच्या ६० ते ७० टक्केच पेरण्या झाल्याची माहिती सोलापूर कृषी विभागाकडून मिळाली.



राज्यातही पावसाची अशीच धरसोड असून, काही जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने महापूर आले आहेत तर काही ठिकाणी पावसाअभावी पेरण्याच झाल्या नाहीत. सध्या सर्वदूर संततधार चालू असून, हा पाऊस जास्त दिवस राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. कोकण, घाटमाथा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता असून, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात हलका ते मध्यम पाऊस व मेघगर्जनेसह सरी पडू शकतो. तर विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांसाठी कोणताही विशेष इशारा देण्यात आलेला नाही. कोकणात रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता असल्याने ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. ठाणे आणि रत्नागिरी जिल्ह्यांत काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. त्याठिकाणी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पालघर, मुंबई आणि सिंधुदुर्गमध्ये मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रात धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस व काही ठिकाणी मेघगर्जनेसह सरी पडू शकतात. नाशिक घाट परिसरात काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्याठिकाणी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे. पुणे, सातारा आणि कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुणे आणि सातारा घाटमाथा परिसरात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच कोल्हापूर घाटमाथा परिसरात यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोकणात रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता असल्याने ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## पाच लाख रुपयांचा गुटखा जप्त; तिघांविरुध्द गुन्हा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ ऑगस्ट-**

पंढरपूर तालुका पोलीसांनी लक्ष्मी टाकळी (ता. पंढरपूर) येथे सापळा रचून ८७ हजार ९०० रुपयांचा अवैध गुटखा व ४ लाख रुपयांची कार गाडी असा ४ लाख ८७ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना दि६ ऑगस्ट रोजी घडली आहे. याबाबत तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पंढरपूर तालुका पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्य पोलीस निरीक्षक शहाजी गोसावी यांच्या आदेशाने अवैध्य धंद्यावरती कारवाई करण्यात येत होती. पंढरपूर तालुका पोलीसांच्या पथकाने मिळालेल्या माहितीनुसार लक्ष्मी टाकळी (ता. पंढरपूर) येथील हॉटेल शाही दरबार जवळ सापळा रचला. एक मारुती सुजुकी कंपनीची चार चाकी गाडी( एम.एच.४५ ए.यु ६६४५) चेक केली असता गाडीच्या डिकीमध्ये व मधल्या सीटवर महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला पानमसाला (गुटखा) वाहतुक करताना मिळुन आला. चालक श्रीकांत राजेंद्र बळवंतराव (वय ३२) रा. सांगोला, तर गाडीतुन उतरून पळुन गेलेला संतोष चांगदेव सुरवसे रा. खारवाटवाडी सांगोला तर ज्याच्याकडून गुटखा आणला तो संतोष डोंगरे रा.इचलकरंजी जि. कोल्हापूर या तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोसई राजेंद्र गोसावी हे करित आहेत. सदरची कारवाई अप्पर पोलीस अधिक्षक विजय कबाडे, सहाय्य पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोना बाबासाहेब पाटील, संतोष गायकवाड, पोकॉ विजयकुमार आवटे, मंगेश सुर्वे, सागर गवळी, सुरज देशमुख यांनी केली.

## पहिल्या यादीतील २६ हजार ५५३ पैकी १८ हजार ५७३ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग पूर्ण

### जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ६ ऑगस्ट-**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील कर्जमाफीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून पात्र शेतकऱ्यांनी कर्जमाफीचा लाभ घेण्यासाठी आधार सीडिंग तातडीने करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले.



यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात २६ हजार २५३ पात्र लाभार्थी यांची यादी तयार करण्यात आली आहे. ही यादी प्रत्येक तहसील कार्यालय, ग्रामपंचायत, सोसायटी आणि बँकेत प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यापैकी आतापर्यंत १८ हजार ५७३ म्हणजेच ७०% शेतकऱ्यांचे आधार सीडिंग पूर्ण झाले आहे. अजूनही ७ हजार ६९० शेतकरी असे आहेत ज्यांचे आधार सीडिंग बाकी आहे.

**लाभार्थींचे आधार सीडिंग बंधनकारक**

या योजनेमध्ये लाभ घेण्यासाठी आधार सीडिंग बंधनकारक आहे. आधार सीडिंग केल्याशिवाय कर्जमाफीचा लाभ खात्यामध्ये जमा करता येत नाही. म्हणून मी सर्व पात्र लाभार्थ्यांना आवाहन करतो की सर्वप्रथम या यादीमध्ये आपले नाव आहे का ते खात्री करावे. आपल्या मोबाईल नंबरवर मेसेज आला असेल तो बघावा. आपल्या जवळच्या तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, बँकेमध्ये यादी प्रसिद्ध केली आहे, त्यामध्ये तपासणी करावी.

**कसे करावे आधार सीडिंग?**

आपले नाव असल्यास लवकरात लवकर आधार सीडिंग करून घ्यावे. आधार सीडिंग करण्यासाठी आपल्या नावासमोर दिलेला विशेष क्रमांक आणि आधार नंबर घेऊन जवळच्या महा ई-सेवा केंद्र, सेतू केंद्र किंवा सरकारी सेवा केंद्र मध्ये गेल्यास विनाशुल्क आधार सीडिंग करून दिले जाईल. आधार झाल्यास लवकरात लवकर लाभ आपल्या खात्यात जमा होईल.

**अडचणी आल्यास संपर्क साधा**

आधार सीडिंग करताना काही अडचण आल्यास आपण आपल्या तलाठी, मंडल अधिकारी किंवा तहसीलदार यांच्याशी संपर्क साधावा. प्रशासन आपल्याला सर्वतोपरी मदत करायला तयार आहे, असेही त्यांनी सांगितले. यादीमध्ये काही शेतकरी बांधव मयत झाले असतील, तर त्यांच्या वारस नोंदणी करून घेतल्यास त्यांच्या वारसांना या योजनेचा लाभ मिळू शकेल, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

## कर्जमाफीसाठी माळशिरस तालुक्यातील २ हजार ३४८ शेतकरी पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत माळशिरस तालुक्यातील कर्जमाफीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, पात्र शेतकऱ्यांच्या आधार प्रमाणीकरणाला वेग आला आहे. सद्यस्थितीत प्रसिद्ध दुसऱ्या यादीअखेर तालुक्यातील १०६ गावांतील २,३४८ शेतकरी या योजनेसाठी पात्र ठरले आहेत,अशी माहिती सहायक निबंधक श्री पुष्पक सारडा यांनी दिली.

त्यामध्ये सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी संलग्न ८३ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांतील ७२६ सभासद शेतकऱ्यांचा, तसेच राष्ट्रीयकृत बँकांच्या थकीत कर्जदार शेतकऱ्यांचाही समावेश आहे. लाभार्थी यादीत प्रत्येक पात्र शेतकऱ्याच्या नावासमोर विशिष्ट क्रमांक आणि थकीत कर्जाची रक्कम नमूद करण्यात आली आहे. कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणीकरण बंधनकारक असून, त्यासाठी माळिशरस तालुक्यातील आपले सरकार सेवा केंद्रांवर पडताळणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी आधार कार्ड, कर्ज खाते व बचत खात्याचे पासबुक, लाभार्थी यादीतील नावासमोरील विशिष्ट क्रमांक तसेच अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करून आधार प्रमाणीकरण करून घेणे गरजेचे आहे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या माहितीनुसार, कर्जमाफीची पात्र लाभार्थी यादी संबंधित ग्रामपंचायती, बँक शाखा, गटसचिव तसेच सहाय्यक निबंधक कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच सोबतचा क्यूआर कोड स्कॅन करूनही माळिशरस तालुक्यातील शेतकरी आपल्या नावाची खात्री लाभार्थी यादीत करू शकतात,असे श्री. सारडा यांनी सांगितले तसेच पात्र शेतकऱ्यांनी तात्काळ आधार प्रमाणिकरण करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## चारित्र्याचा संशय घेऊन विवाहितेस जीवे मारण्याची धमकी

### पतीसह चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

लग्नात मानपान केला नाही, घर बांधण्यासाठी रुपये आण म्हणून व चारित्र्याचा संशय घेवून विवाहितेस वारवांर घरातून बाहेर निघून जा म्हणून शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह चौघाजणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शंकर- नवरा, नागम्मा - सासू, देवकी - नणंद आणि राजेश्री-नणंद ( सर्व रा. शास्त्रीनगर, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत रोहिणी शंकर पेद्दुर (वय-३५ वर्षे, रा- घरनं ९० शास्त्रीनगर सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.



यातील फिर्यादी ही दि १६ एप्रिल २०२४ रोजी पासून ते आजतागायत सासरी नांदत असताना वरील आरोपींनी लग्न झाल्यानंतर दोन वर्षानी लग्नात मानपान केला नाही व घर बांधकामासाठी माहेरून ४ लाख हजार रूपये आणि म्हणून मागणी केली. तेव्हा फिर्यादीचे आई वडीलांनी चार लाख रुपये दिलेही. परंतु आजून एक लाख रूपये दे म्हणून फिर्यादी च्या मागे आरोपींनी तगादा लावला. शारीरीक मानसिक त्रास देवून शिवीगाळी करून जीव मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार इनामदार हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहे.



## रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थच्या नवीन पदाधिकाऱ्यांचा संयुक्त पदग्रहण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ तसेच रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचा सन २०२६-२७ या वर्षासाठीचा संयुक्त पदग्रहण सोहळा आयएमए हॉल येथे पार पडला.

यावेळी असावरी सराफ यांनी रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थच्या अध्यक्षपदाची, तर डॉ. विष्णू रंगरेज यांनी सचिवपदाची सूत्रे स्वीकारली. तसेच महेश सुधाकर यांनी रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचे चेअरमन म्हणून, तर अनास्तासिया मार्टिनकोव्हा यांनी सचिव म्हणून पदभार स्वीकारला. कार्यक्रमास डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेशभाई पटेल हे प्रमुख पाहुणे, डीएलए डॉ. दीपक पोफळे हे प्रमुख अतिथी तसेच असिस्टंट गव्हर्नर महेश साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. नवनिर्वाचित अध्यक्षा असावरी सराफ यांनी आगामी वर्षासाठीचे सेवा प्रकल्प, सदस्यवृद्धी, महिला व युवक सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन आणि समाजोपयोगी उपक्रमांचे व्हिजन सादर केले. तर सॅटेलाईट क्लबचे चेअरमन महेश सुधाकर यांनी सॅटेलाईट क्लबच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण व परिणामकारक सेवा प्रकल्प राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. सूत्रसंचालन नमिता वडापूरकर यांनी केले. कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या सादरीकरणासाठी बसवराज रोड ट्रॅक्टर यांनी सहकार्य केले.

# 'म्हाडा'च्या प्रलंबित गृहनिर्माण प्रकल्पांना तातडीने गती द्या

### सर्वसामान्यांसाठी मोठी घरांची लॉटरी लवकर जाहीर करा : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ६ ऑगस्ट-**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) स्तरावरील सर्व प्रलंबित प्रस्ताव तातडीने मार्गी लावावेत. शासन स्तरावरील आवश्यक प्रशासकीय मान्यता आणि निर्णय प्रक्रियेलाही गती देऊन सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आज झालेल्या बैठकीत पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांचा आणि धोरणात्मक विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सांगली जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष हे दूरदृश्य प्रणालीद्वारे, तसेच म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे आणि पुणे म्हाडाचे मुख्याधिकारी राहुल साकोरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी म्हाडाची मोठी घरांची लॉटरी लवकरात लवकर जाहीर करावी आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावी. दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा लॉटरीत प्रतिसाद न मिळालेल्या सदनिकांची फर्स्ट कम, फर्स्ट सर्व्ह तत्त्वावर तातडीने विक्री करावी, जेणेकरून रिक्त घरे पडून राहणार नाहीत आणि इच्छुक नागरिकांना त्वरित घरे उपलब्ध होतील, असे निर्देशही त्यांनी दिले.



विद्यार्थी तसेच नोकरीसाठी स्थलांतरित होणाऱ्या महिलांच्या गरजा लक्षात घेऊन वर्किंग वुमन हॉस्टेल आणि विद्यार्थी वसतिगृहे भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याचा उपक्रम म्हाडामार्फत राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीत शिरूर (पुणे) येथील १५५.२२ कोटी रुपयांच्या आणि खराबवाडी (पुणे) येथील ८९.४७ कोटी रुपयांच्या म्हाडा गृहनिर्माण प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. पुणे मंडळाच्या २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील लाभार्थ्यांकडून विकासकांकडून आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त शुल्काच्या तक्रारी गांभीर्याने घेऊन नागरिकांची आर्थिक पिळवणूक होणार नाही, यासाठी स्पष्ट धोरण तयार करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले. तसेच, यूडीसीपीआरच्या तरतुदीनुसार विक्रीअभावी रिक्त असलेल्या सदनिकांचे सहा महिन्यांच्या आत वितरण करण्याबाबत स्पष्ट निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून शासन आणि विकासकांचे आर्थिक नुकसान टळेल. याशिवाय खराडी येथील म्हाडाच्या भूखंडावरील पोस्ट विभागाचे आरक्षण रद्द करून पर्यायी जागा उपलब्ध करून देणे, दापोडी (पुणे) येथे सुमारे ८ ते १० हजार घरांचा गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लावणे, तसेच म्हाळुंगे-इंगळे येथील प्रकल्पासाठी पीएमआरडीएकडून १८ मीटर रुंदीचा रस्ता, पाणीपुरवठा व एसटीपीची कामे तातडीने पूर्ण करणे, अशा विविध विषयांबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश देण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मिरज (सांगली) येथील दोन हेक्टर जमीन म्हाडाकडे हस्तांतरित करण्याबरोबरच सांगली शहरातील मोक्याच्या शासकीय जागा म्हाडाला उपलब्ध करून त्या ठिकाणी परवडणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांचा विकास करावा, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी स्पष्ट केले. बैठकीच्या शेवटी त्यांनी सर्व प्रकल्पांसाठी निश्चित कालबद्ध कृती आराखडा तयार करून प्रत्येक प्रस्तावाच्या प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ट्रम्प यांच्यावरच उलटला डाव

## १६६ अब्ज डॉलर्स व्याजासह परत करण्याचे न्यायालयाचा आदेश

**वॉशिंग्टन, ६ ऑगस्ट**

अमेरिकेची महसूल तूट भरून काढण्याचे आणि रोजगारवाढीसाठी खाजगी कंपन्यांनी देशातच उत्पादन करावे असा हट्ट धरत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह जगातील बहुतांश देशांवर ६० टक्क्यापर्यंत व्यापार शुल्क (टॅरिफ) आकारण्याचा निर्णय घेतला. सर्वोच्च न्यायालयाने टॅरिफ बेकायदेशीर ठरवत ट्रम्प यांना दणका दिला आणि टॅरिफच्या आडून वसूल केलेली रक्कम परत करण्याचे आदेश दिले होते. आदेशानंतरही टॅरिफची रक्कम परत न केल्याने न्यायालयाने संताप व्यक्त करत बुधवारी ट्रम्प प्रशासनाला आठ दिवसांत व्याजासह टॅरिफचे १६६ अब्ज डॉलर्स परत करण्याचे आदेश दिले.




'यूएस कस्टम्स अँड बॉर्डर प्रोटेक्शन' ने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. याचिकाकर्त्यांच्या वकिलाने ट्रम्प प्रशासनावर न्यायालयाच्या आदेशाच्या उल्लंघनाचा आरोप केला. न्यायालयाच्या आदेशानंतरही अद्याप वसूल केलेल्या टॅरिफचा परतावा मिळाला नसल्याचे न्यायालयाला सांगितले. यावर सरकारी वकिलाने सांगितले की, 'ऑटोमेटेड कमर्शियल एन्व्हायर्नमेंट प्लॅटफॉर्म'मध्ये परताव्यांची गणना आणि प्रक्रिया करण्यासाठी एक नवीन प्रणाली विकसित केली आहे. परताव्याची प्रक्रिया सुरू असून, लवकरच संबंधितांच्या खात्यात रक्कम हस्तांतरित केली जाईल. यावर न्यायालयाने नाराजी व्यक्त करत म्हटले की, आम्हाला तांत्रिक कारणे सांगू नका, आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी का झाली नाही, याचे स्पष्टीकरण द्या आणि आठ दिवसांत संबंधितांच्या खात्यात टॅरिफच्या परताव्याचे १६६ अब्ज डॉलर्स जमा करा. आदेशाचे पालन न झाल्यास, प्रशासन आणि सरकारवर अवमाननेचा खटला दाखल केला जाईल, असा इशारा दिला. ◂ (वृत्तसंस्था)

### व्याजावर आक्षेप

फेब्रुवारीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने आयात शुल्काचा निर्णय रद्द केला होता. एकूण टॅरिफचा परतावा १६६ अब्ज डॉलर्स आहे आणि व्याजासह ही रक्कम दोनशे अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे. ट्रम्प प्रशासनाने एकूण रकमेवरील व्याज देण्यावर आक्षेप घेत यातून दिलासा देण्याची मागणी केली. मात्र न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाला कोणताही दिलासा देण्यास नकार देत व्याजासह संपूर्ण परतावा द्यावाच लागेल, असा आदेश दिला.

### लाखो व्यावसायिकांचे अर्ज सादर

सीएपीई प्रणाली सुरू झाल्यापासून लाखो परताव्याच्या अर्जांवर प्रक्रिया केली आहे. ३१ जुलै, २०२६ पर्यंत व्यावसायिकांचे २,५२,४९६ अर्ज प्राप्त झाले आणि त्यांची पडताळणी सुरू आहे. नोंदणीधारक आणि अमेरिकन व्यावसायिकांच्या माध्यमातून संबंधित देशांच्या आयातदारांना टॅरिफचा परतावा दिला जाणार असल्याचे ट्रम्प प्रशासनाने न्यायालयाला सांगितले आहे.

### न्यायालयाचा निर्णय काय होता ?



१९७७ च्या आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्ती अधिनियम (आयईईपीए) अंतर्गत अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना अमेरिकन व्यापारी भागीदारांकडून येणाऱ्या वस्तूंवर व्यापक आयात शुल्क लादण्याचा अधिकार नसल्याचा निर्णय अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने बहुमताने निर्णय दिला. नऊ न्यायाधीशांच्या पॅनेलने ६-३ मतांनी हा निर्णय दिला, ज्यात सरन्यायाधीश जॉन रॉबर्ट्स यांनी बहुमताचे मत लिहिले. ट्रम्प प्रशासनाला टॅरिफची रक्कम परत करण्याचे आदेशही त्यानंतरच्या सुनावणीत न्यायालयाने दिले होते.

# अतिक अहमदचा लहान मुलगा आबान ठार

## झाशीच्या तुरुंगातील भावाला भेटण्यासाठी जाताना अपघात

**झाशी, ६ ऑगस्ट**

उत्तरप्रदेशातील झाशी जिल्ह्यात गुरुवारी झालेल्या भीषण अपघातात हत्या झालेला कुख्यात माफिया अतीक अहमदचा सर्वांत लहान मुलगा आबान अहमद ठार झाला. त्याच्या सोबत वाहनात असलेला आणखी एकाचा मृत्यू झाला असून, तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

अतीक अहमदचा मुलगा चार साथीदारांसह झाशीतील तुरुंगात ठेवलेला त्याचा भाऊ अली अहमद याची भेट घेण्यासाठी जात होता. भरधाव वेगाने जात असताना कारसमोर अचानक पशू आला. त्यावेळी चालकाचे नियंत्रण सुटून ती रस्ता दुभाजकावर धडकली. हा अपघात झाशी-कानपूर राष्ट्रीय महामार्गावरील पूंछ पोलिस ठाणे हद्दीत झाला. वाहनातील पाचही जण प्रयागराज येथून झाशीला जात होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.



अपघातावेळी आबान अहमद आणि सोनू खान समोर बसले होते. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने ते घटनास्थळीच ठार झाले. अपघातात बादशाही मंडी, मोहंमद जैद, उमर अहमद जखमी झाले. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना वैद्यकीय महाविद्यालयात हलवले. ठार झालेल्यांची ओळख पटली असून, त्यापैकी एक अतीक अहमदचा मुलगा आबान अहमद असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस अधीक्षक बीबीजीटीएस मूर्ती यांनी दिली.



अपघात इतका भीषण होता की वाहनाच्या पुढच्या भागाचा चक्काचूर झाला. जखमींची प्रकृती गंभीर असल्याचे मूर्ती यांनी सांगितले. उमेश हत्याकांड आणि खंडणी वसुलीतील आरोपी अली अहमद याला १ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रयागराजच्या नैनी तुरुंगातून झाशीला हलवण्यात आले होते. नैनी तुरुंगात त्याच्या ताब्यातून ११०० रुपये जप्त केल्यानंतर त्याला झाशीत पाठवण्यात आले होते. ◂ (वृत्तसंस्था)

# नई जिंदगी भागात २० वर्षीय तरुणाचा खून

**सोलापूर, दि.६ ऑगस्ट-**

नई जिंदगी भागातील कस्तुरबा नगर येथे एका २० वर्षीय तरुणाचा खून करण्यात आल्याची घटना गुरुवार, दि.६ ऑगस्ट २०२६ रोजी उघडकीस आली. उमर मौलाली बिराजदार (रा.कस्तुरबा नगर, नई जिंदगी, सोलापूर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.

यातील मृत उमर बिराजदार याचे कुटुंबीय नई जिंदगी भागात राहत असून तो गुलबर्गा येथे कामाला होता. दर आठ-पंधरा दिवसांनी सोलापूरला ये-जा करायचा. त्यानुसार मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी तो सोलापूरला आला होता. नवीन मोबाईल घेण्यासाठी तो बुधवार, दि.५ ऑगस्ट रोजी घरातून सांगून बाहेर पडला होता. रात्री उशिरापर्यंत घरी परतला नाही. दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवारी त्याचा मृतदेह नई जिंदगी भागातील शांतीनगर येथील पाण्याच्या टाकीजवळ आढळून आला. ही खबर एमआयडीसी पोलिसांना समजली असता फौजदार लक्ष्मण पाटील यांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला. याबाबत मयताचा भाऊ अबुजर बिराजदार यांनी फिर्याद दिली. पोनि संगीता पाटील पुढील तपास करीत आहेत.







**ENHANCING MOBILITY**
AS ONE OF INDIA'S LEADING ELECTRICAL AND ELECTRONICS COMPANIES.

As an *established leader in automotive solutions,* we are delivering continued growth and value.

- One of India's leading electrical & electronics (E&E) companies.*
- One of India's top 2 players in wiring harnesses for two & three wheelers.*
- A diversified presence across multiple end markets, including commercial vehicles, off-highway vehicles, farming & industrial equipment.
- 22 manufacturing facilities, 3 engineering and design support centers & 7 warehouses across India and globally.**
- Providing access to major automotive clusters both in India & the world over.

*Source: CRISIL Report | ** As of March 31, 2026

DHOOT TRANSMISSION
Harnessing Safety, Electrifying The Future
Dhoot Transmission Limited
www.dhoottransmission.com

**DHOOT TRANSMISSION LIMITED**, is proposing, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to make an initial public offering of its Equity Shares and has filed the RHP dated August 3,2026 with the RoC. The RHP and Abridged Prospectus shall be available on the website of SEBI at www.sebi.gov.in, as well as on the websites of the Stock Exchanges i.e. BSE and NSE at www.bseindia.com and www.nseindia.com, respectively, on the website of the Company at www.dhoottransmission.com and on the websites of the BRLMs, i.e. Axis Capital Limited, Jefferies India Private Limited, Kotak Mahindra Capital Company Limited, Nomura Financial Advisory and Securities (India) Private Limited, SBI Capital Markets Limited and 360 ONE WAM Limited at www.axiscapital.co.in, www.jefferies.com, https://investmentbank.kotak.com, www.nomuraholdings.com/company/group/ asia/india/index.html, www.sbicaps.com and www.360.one, respectively. Any potential Bidders should note that investment in equity shares involves a high degree of risk and for details relating to such risk, see "***Risk Factors***" on page 24 of the RHP. Potential Bidders should not rely on the UDRHP-I filed with SEBI and the Stock Exchanges for making any investment decision and should instead rely on the RHP, when filed, for making an investment decision.
The Equity Shares offered in the Offer have not been and will not be registered under the United States Securities Act of 1933, as amended (the "**U.S. Securities Act**") or any other applicable law of the United States and, unless so registered, may not be offered or sold within the United States except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to, the registration requirements of the U.S. Securities Act and applicable state securities laws. Accordingly, the Equity Shares are being offered and sold (a) within the United States only to persons reasonably believed to be "qualified institutional buyers" (as defined in Rule 144A under the U.S. Securities Act and referred to in the RHP as "**U.S. QIBs**"; for the avoidance of doubt, the term "**U.S. QIBs**" does not refer to a category of institutional investor defined under applicable Indian regulations and referred to in the RHP as "QIBs") in transactions exempt from, or not subject to, the registration requirements of the U.S. Securities Act; and (b) outside of the United States in offshore transactions as defined in and in compliance with Regulation S under the U.S. Securities Act ("**Regulation S**") and the applicable laws of the jurisdiction where those offers and sales are made.
It is to be distinctly understood that the permission given by Stock Exchanges should not in any way be deemed or construed that the Offer Document has been cleared or approved by Stock Exchanges nor does it certify the correctness or completeness of any of the contents of the Offer Document. The investors are advised to refer to the Offer Document for the full text of the Disclaimer Clause of NSE and BSE Limited.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# समाजमाध्यमांची 'मेटा'कुटी!

समाजमाध्यमांचे वेगवेगळे मंच हे केवळ संवाद साधण्याचे किंवा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याचे साधन आहे, असा या माध्यमांच्या मंचावर वावरणाऱ्या सर्वसामान्यांचा समज असला, तरी हे माध्यम तेवढ्यापुरतेच नाही, हे आता लक्षात येऊ लागले आहे. तळहातावरल्या मोबाईलच्या स्क्रीनवर दिसणारी एखादी जाहिरात किंवा कोणताही एखादा अवांतर मजकूर सहज कुतूहल म्हणून पाहण्यासाठी मारली जाणारी एक टिचकीदेखील या माध्यमाच्या समाजास अनभिज्ञ असलेल्या कोणा अज्ञात 'अतींद्रिय' शक्तीचा अनुभव देते, हे अनेकांनी अनुभवले असेल. एखाद्या उत्पादनाची किंवा करमणुकीच्या माध्यमाची जाहिरात पाहिली की पाठोपाठ इच्छा नसताना सुरू होणारा अशा जाहिरातींचा भरमसाट मारा हे या माध्यमांच्या मार्केटिंगचे मूळ सूत्र असते. सामान्य वापरकर्ता मात्र सतत स्क्रीनवर 'स्क्रोल' करत आपला वेळ घालवत राहतो. गेल्या काही दिवसांत या माध्यमाने अनेक क्षेत्रांत प्रचंड खळबळ माजविली आणि समाजाचे सुरळीत चाललेले दैनंदिन रहाटगाडगे पुरते उलटेसुलटे करून टाकले, हे आपल्या देशातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत झालेल्या अनपेक्षित उलथापालथीनंतर स्पष्ट झाले. जंतर मंतरवरील जेन-झीच्या आंदोलनानंतर गेल्या २३ जुलै रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फेसबुकवरून देशातील युवकांना उद्देशून प्रसारित केलेला व्हिडीओ संदेश तात्पुरता हटविण्यात आल्यानंतर या माध्यम-मंचाचे एक नवे रूप समोर आले. यामुळे सरकारी स्तरावर निर्माण झालेल्या राजकीय वादळाचे पडसाद देशभर उमटले आणि व्हिडीओ संदेश हटविण्यामागील कारण स्पष्ट करून माफी मागण्याची तंबी 'मेटा' या तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनीचे सर्वेसर्वा मार्क झुकरबर्ग यांना सरकारने दिली. मेटाने माफी मागितली नाही, तर या कंपनीस मिळणारे संरक्षण गमवावे लागेल, असा इशाराही सरकारने दिल्यानंतर, व्हिडीओ हटविण्याच्या कृतीवर स्पष्टीकरण देताना एका तांत्रिक चुकीचे कारण देत या कंपनीचे जागतिक सार्वजनिक धोरणप्रमुख जोएल कॅपलॉन यांनी मार्क झुकरबर्ग यांच्या वतीने भारत सरकारची माफी मागितली. हे प्रकरण वरवर दिसते तेवढे सहज नाही, यामागे एक आखणीबद्ध व्यवसाय-नीती कार्यरत असते, ही बाब या निमित्ताने आता समोर येऊ लागली आहे. याच कंपनीच्या अन्य एका माध्यम मंचावर दिसणाऱ्या बाल लैंगिक शोषणाच्या जाहिरातींचीही गंभीर दखल घेतली गेली आणि कोणत्याही एखाद्या विशिष्ट प्रकारचा मजकूर, जाहिराती किंवा वापरकर्त्यांपर्यंत पोहोचणाऱ्या 'कंटेन्ट'ला चालना देण्यासाठी मोठी आर्थिक उलाढाल होत असते, हे उघड झाले. अशा प्रकारचा बेकायदेशीर 'कन्टेन्ट' विशिष्ट प्रेक्षकांसाठी प्रसारित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याची कबुली दिली गेल्याचे सांगण्यात येते. या चुकीबद्दल मेटाने माफी मागून खेद व्यक्त केला असला, तरी समाजमाध्यम हा केवळ वेळ घालविण्याचा मंच नसून सावधगिरीने वावरण्याचे स्थान आहे, हे एव्हाना स्पष्ट झाले आहे.

अशा प्रकारच्या अनेक घडामोडी या मंचाद्वारे नेमक्या आणि निवडक समाजघटकांपर्यंत पोहोचविण्यात येतात हे जेन-झी आंदोलनानंतर स्पष्ट झाले. केवळ भारतातच नव्हे, तर गेल्या चार-दोन वर्षांत, विशेषतः कोविडोत्तर काळातील सामाजिक आणि राजकीय घडामोडींचा वेग प्रचंड वाढला आहे. अनेक क्षेत्रांत अनपेक्षित आणि अनाकलनीय रीतीने घडणाऱ्या घडामोडींनी सामान्यांचे जग संभ्रमित होऊन गेले आहे. समाजमाध्यमांचे मंच या संभ्रमात मोलाची भर घालण्याकरिता सतत सरसावून बसलेले आहेत, हे आता गुपित राहिलेले नाही. म्हणूनच, सामान्यांच्या दृष्टीने समाजमाध्यमे हे केवळ वेळ घालविण्याचे संवाद साधण्यात किंवा मते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य उपभोगण्याचे हक्काचे साधन असले, तरी त्यामागे जागतिक स्तरावरील समाजकारण, सांस्कृतिकता किंवा अर्थकारणास हवे तसे वळण देण्याची ताकद आहे, याचा अनुभवही येऊ लागला आहे. एका बाजूला कृत्रिम बुद्धिमत्तेची हत्यारे अधिक धारदारपणे आक्रमक झालेली आहेत. या हत्यारांनी रोजगाराच्या असंख्य संधी घायाळ झाल्याने, हे आक्रमण आणखी कोणते अराजक माजविणार या भीतीने समाज ग्रस्त झालेला आहे. कारण तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा वेग कल्पनातीत असून त्या वेगाने धावणे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे तर आहेच, पण कृत्रिम बुद्धिमत्तेचा सामान्य मेंदूच्या बुद्धीने वापर करण्याचे कौशल्य आत्मसात करण्यातही सामान्य माणसे कमी पडत आहेत. त्यामुळेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून समाजमाध्यमांचे वेगवेगळे मंच सामान्यांच्या सहज जीवनात धुमाकूळ घालू शकतात. त्यामुळे प्रसंगी समाजस्वास्थ्य संकटातही येऊ शकते हेदेखील आता स्पष्ट झाले आहे. केवळ 'फॉलोअर्स आणि 'लाईक्स'द्वारे स्वयंप्रतिमा निर्माण करण्याच्या वेडाने झपाटलेल्या पिढ्यांच्या मनाचा कब्जा या मंचाने घेतल्याचे स्पष्ट झाल्याने या माध्यमाचा मवाळ मुखवटा दूर होऊ लागला असून धंदेवाईक चेहऱ्याने या माध्यमाचे वेगवेगळे मंच आता मानवी व्यवहारांवर कब्जा करण्यासाठी सरसावले आहेत. अलिकडेच झालेल्या जेन-झीच्या आंदोलनाचे लोण देशभर पसरविण्यात या माध्यमाच्या मंचाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. आसपासच्या अन्य काही देशांतील जेन-झीच्या आंदोलनांनादेखील या माध्यम-मंचाचे बळ लाभले होते.

या माध्यमांचे सर्व मंच मोफत आहेत, असे वरवर पाहता वाटत असले, तरी त्यामागे मोठे अर्थकारण कार्यरत असते. फेसबुक, इन्स्टाग्राम, थ्रेडस, व्हॉटसॲपचा सर्वसामान्यांकडून होणारा वापर हे मेटासारख्या कंपन्यांचे उत्पादन नसते, तर वापरकर्त्यांकडून वापरला जाणारा डेटा आणि वापरकर्त्यांनी या मंचावर वावरण्यासाठी खर्च केलेला वेळ हे या क्षेत्राचे व्यावसायिक उत्पादन असते. या मंचाचा वापर करणाऱ्या घटकांच्या वर्गवारीनुसार विशिष्ट जाहिराती त्यांच्यासमोर प्रसृत करणे, वापरकर्त्यांच्या वर्तन आणि डेटा वापराचे विश्लेषण करणे, फेसबुक किंवा इन्स्टाग्रामसारख्या मंचावर आपले 'पेज' चालविणाऱ्यांकडून खरेदी केल्या जाणाऱ्या जाहिराती, ऑनलाईन व्यवसाय वृद्धीसाठी ग्राहकांशी साधला जाणारा संपर्क आदी अनेक बाबींद्वारे या मंचाला मोठे उत्पन्न मिळत असते. शिवाय, विशिष्ट वापरकर्ते कोणत्या बाबींवर विशेष लक्ष देतात याचे विश्लेषण करून कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचे अद्ययावतीकरण करण्यासाठीही वापरकर्त्यांचाच वापर केला जातो. अशा प्रकारे वापरकर्त्याच्या मानसिकतेचे नेमके विश्लेषण केल्यानंतर कोणत्या वापरकर्त्यास कोणत्या जाहिराती दाखवायच्या कोणता मजकूर त्याच्यासमोर ठेवायचा आणि कोणता मजकूर त्याच्यापर्यंत पोहोचू द्यायचा नाही, हे ठरविणारी अल्गोरिदम नावाची एक प्रशासकीय यंत्रणा हेच काम करत असते. वापरकर्त्याने अधिकाधिक वेळ मंचावर वावरत राहावे याची नेमकी नीती अल्गोरिदमद्वारे ठरली, की जेवढा जास्त वेळ मंचावर वावर असेल, तेवढ्या जास्त पोस्ट त्याच्यासमोर दाखविल्या जातील आणि तितक्या अधिक जाहिरातींचा मारा वापरकर्त्यावर करून अधिकाधिक महसूल मिळविता येईल, हे या मंचाचे अर्थकारण सामान्यांच्या आवाक्याबाहेरच आहे. जगभरातील अब्जावधी वापरकर्त्यांच्या सवयी आणि आवडीनिवडीचे नेमके विश्लेषण करून त्याच्या मनावर ताबा मिळविण्याचा व त्याला प्रतिक्रिया देण्यास भाग पाडण्याचा हा एक मानसशास्त्रीय खेळ पाहता, समाजमाध्यम हे केवळ संवादाचे साधन नाही, तर एका लक्ष्यवेधी अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे हे उघड दिसते. हा केंद्रबिंदू माणसांना खिळवून ठेवतो, त्याच्या मानसिकतेचा वेध घेऊन त्यानुसार आपल्या व्यवसायाची सामग्री वाढवतो आणि जाहिरातींचा मारा करून त्याद्वारे महसूल गोळा करतो. पंतप्रधानांचे भाषण अल्पकाळ वगळण्याच्या तांत्रिक चुकीचे विश्लेषण करतानाही, संपत्ती निर्मितीवर होणाऱ्या परिणामांचे काही आडाखे बांधले गेले असतील, यात शंका नाही. ■

## अर्थविशेष

### ॲड. हितेश पारसे

# टॅक्स ऑडिट : कोणाला, कधी आणि का आवश्यक?

आयकर विवरणपत्र भरण्याचा हंगाम सुरू झाला की, 'टॅक्स ऑडिट' हा शब्द वारंवार ऐकायला मिळतो. मात्र, आजही अनेक व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक आणि अगदी कंपन्यांमध्येही टॅक्स ऑडिटबाबत अनेक गैरसमज आहेत. काहींना वाटते की, टॅक्स ऑडिट म्हणजे आयकर विभागाची चौकशी किंवा तपासणी, तर काहींचा समज असतो की ते फक्त मोठ्या कंपन्यांनाच लागू होते. प्रत्यक्षात हे दोन्ही समज चुकीचे आहेत. टॅक्स ऑडिट ही आयकर कायद्यातील एक महत्त्वाची अनुपालन प्रक्रिया असून करदात्याने आपल्या व्यवसायाचे लेखे योग्य प्रकारे ठेवले आहेत का, उत्पन्नाची अचूक नोंद केली आहे का आणि आयकर कायद्याचे पालन केले आहे का, याची स्वतंत्र सनदी लेखापालामार्फत पडताळणी करण्याची ही व्यवस्था आहे.

**टॅक्स ऑडिट म्हणजे काय? :** आयकर कायद्यानुसार, विशिष्ट परिस्थितीत व्यवसाय किंवा व्यावसायिक उत्पन्न असलेल्या करदात्यांच्या लेखा पुस्तकांची सनदी लेखापालमार्फत तपासणी करून त्याचा अहवाल आयकर विभागाकडे सादर करण्याच्या प्रक्रियेस टॅक्स ऑडिट असे म्हणतात. या प्रक्रियेमुळे आर्थिक व्यवहारांची पारदर्शकता वाढते, कराची अचूक गणना होते तसेच भविष्यातील कर वाद, दंड आणि अनावश्यक चौकशी टाळण्यास मदत होते.

**टॅक्स ऑडिट कोणाला लागू होऊ शकते? :** टॅक्स ऑडिट ही तरतूद केवळ व्यक्तिगत करदात्यांसाठी मर्यादित नाही. आयकर कायद्यातील अटी पूर्ण झाल्यास पुढील सर्व प्रकारच्या करदात्यांना टॅक्स ऑडिट लागू होऊ शकते. वैयक्तिक करदाता, हिंदू अविभक्त कुटुंब (HUF), भागीदारी संस्था (Partnership Firm), मर्यादित दायित्व भागीदारी संस्था कंपनी (खाजगी मर्यादित, सार्वजनिक मर्यादित, एक व्यक्ती कंपनी), व्यक्तींचा संघ, व्यक्तींचा समूह, सहकारी संस्था, व्यवसाय करणारे ट्रस्ट किंवा इतर कायदेशीर घटक. मात्र, टॅक्स ऑडिट लागू होणे हे करदात्याच्या प्रकारावर अवलंबून नसून त्याच्या व्यवसायाचे स्वरूप, उलाढाल, प्रिझम्प्टिव्ह करप्रणालीचा अवलंब आणि आयकर कायद्यातील संबंधित अटी पूर्ण होतात की नाही, यावर अवलंबून असते.

**कंपनी असल्यास टॅक्स ऑडिट आवश्यकच असते का? :** अनेकांचा असा समज असतो की, प्रत्येक कंपनीला टॅक्स ऑडिट करणे बंधनकारक असते. प्रत्यक्षात हा समज अंशतः चुकीचा आहे. कंपन्यांना कंपनी कायद्यानुसार स्वतंत्र वैधानिक लेखापरीक्षण करणे आवश्यक असते. मात्र, आयकर कायद्यानुसार टॅक्स ऑडिट हे वेगळे अनुपालन असून आयकर कायद्यातील कलम ४४एबी मधील अटी लागू झाल्यासच ते आवश्यक होते.

**व्यवसायासाठी टॅक्स ऑडिटची मर्यादा :** सामान्यतः व्यवसायाची वार्षिक उलाढाल (उलाढाल/एकूण प्राप्ती) ₹ १ कोटीपेक्षा जास्त असल्यास टॅक्स ऑडिट लागू होते.

डिजिटल व्यवहार करणाऱ्यांसाठी ₹ १० कोटींपर्यंतची सवलत सरकारने डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी महत्त्वाची सवलत दिली आहे. जर व्यवसायातील- १. रोखीची प्राप्ती एकूण प्राप्तीच्या ५% पेक्षा जास्त नसावी. २. रोखीची देयके एकूण देयकांच्या ५% पेक्षा जास्त नसावीत. या दोन्ही अटी पूर्ण झाल्यास टॅक्स ऑडिटची मर्यादा ₹ १ कोटीवरून थेट ₹ १० कोटी होते.

**उदाहरण :** १. समजा एखाद्या भागीदारी संस्थेची वार्षिक उलाढाल ₹ ८.५० कोटी आहे. २. रोखीची प्राप्ती २%; रोखीचे पेमेंट ३%. दोन्ही व्यवहार ५% पेक्षा कमी असल्यामुळे या संस्थेला टॅक्स ऑडिट लागू होणार नाही. मात्र, रोखीची प्राप्ती ६% किंवा रोखीचे पेमेंट ७% असल्यास ₹१० कोटींची सवलत उपलब्ध होणार नाही आणि ₹१ कोटींची मर्यादा लागू होईल.

**व्यावसायिकांसाठी काय नियम आहेत? :** व्यवसाय आणि व्यावसायिक सेवा यांच्यासाठी टॅक्स ऑडिटच्या तरतुदी वेगवेगळ्या आहेत. डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाऊंटंट, आर्किटेक्ट, अभियंते, इंटिरिअर डिझायनर, तांत्रिक सल्लागार यांसारख्या व्यावसायिकांचे एकूण व्यावसायिक उत्पन्न ₹७५ लाखांपेक्षा जास्त असल्यास सामान्यतः टॅक्स ऑडिट लागू होते. तसेच प्रिझम्प्टिव्ह करप्रणालीच्या संबंधित तरतुदी लागू असल्यास इतर अटींचाही विचार करावा लागतो.

प्रिझम्प्टिव्ह करप्रणाली आणि टॅक्स ऑडिट : आयकर कायद्यातील कलम ४४एडी, ४४एडीए आणि ४४एईअंतर्गत पात्र करदात्यांना सुलभ करप्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. परंतु काही परिस्थितीत- १. निर्धारित नफ्यापेक्षा कमी नफा दाखविणे, २. संबंधित कलमांतील अटी लागू होणे, ३. नियमित करप्रणाली स्वीकारणे, यामुळे टॅक्स ऑडिटची आवश्यकता निर्माण होऊ शकते. म्हणून प्रिझम्प्टिव्ह करप्रणाली स्वीकारण्यापूर्वी किंवा त्यातून बाहेर पडण्यापूर्वी कर तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**टॅक्स ऑडिट रिपोर्ट कोणत्या फॉर्ममध्ये दाखल केला जातो?**

१. फॉर्म ३सी.ए. + फॉर्म ३सीडी ज्या करदात्यांचे इतर कोणत्याही कायद्यानुसार ऑडिट झालेले असते. २. फॉर्म ३सीबी+ फॉर्म ३सीडी – इतर सर्व प्रकरणांमध्ये.

टॅक्स ऑडिट वेळेत न केल्यास काय परिणाम होतात? : आर्थिक वर्ष २०२५-२६ (आकलन वर्ष २०२६-२७) साठी आयकर कायदा, १९६१ मधील तरतुदी लागू राहतील. कलम २७१बी नुसार, उलाढालीच्या ०.५%, किंवा ₹१,५०,००० यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा दंड आकारला जाऊ शकतो. मात्र, करदाता विलंबाचे वाजवी कारण सिद्ध करू शकला तर दंड माफ होऊ शकतो. नवीन आयकर कायदा, २०२५ मधील बदल : आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून लागू होणाऱ्या आयकर कायदा, २०२५ मध्ये दंडाऐवजी निश्चित विलंब शुल्काची तरतूद करण्यात आली आहे. कलम ४२८(c) नुसार- एक महिन्यापर्यंत विलंब – ₹७५,०००; एक महिन्यापेक्षा जास्त विलंब – ₹१,५०,०००

**करदात्यांसाठी काही उपयुक्त सूचना :** वर्षभर नियमित लेखा पुस्तके लिहा. शक्य तितके सर्व व्यवहार बँकेमार्फत किंवा डिजिटल पद्धतीने करा. जीएसटी रिटर्न, बँक खाते आणि लेखा पुस्तके यांचा ताळमेळ नियमित ठेवा. वर्षाच्या शेवटी ऑडिटची घाई टाळण्यासाठी वेळेत कागदपत्रे सनदी लेखापालाकडे द्या. प्रिझम्प्टिव्ह करप्रणालीचा पर्याय स्वीकारण्यापूर्वी त्याचे परिणाम समजून घ्या. आपल्या व्यवसायाला टॅक्स ऑडिट लागू होते का, याची दरवर्षी खात्री करून घ्या. ■

९०९६३३२३५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

### रेवती जोशी-अंधारे

# विज्ञानाची टेट्राक्रोमसी!

पुलंच्या 'बटाट्याची चाळ' मधील साडी खरेदीचा प्रसंग! रामा ग्रीन, कांद्याच्या सालीच्या रंगाची शेड, डाळिंबी लाल, किरमिजी, सी ब्ल्यू अशा अशक्य रंगांच्या साड्या दाखविण्याचा आग्रह धरणारी सौ आणि स्थितप्रज्ञतेने साड्या दाखविणारा दुकानदार! या सगळ्यात बावचळलेला नवरा! हिरवा तो हिरवा, लाल तो लाल आणि कांद्याच्या सालीला कुठला आलाय रंग, हे नवऱ्याचे प्रांजळ मत! त्यांच्यातील संवाद आणि दुकानातील प्रसंग पुलंच्या मिश्किल लेखनाने अजरामर झाला आहे. चोखंदळपणे रंगांची निवड हा केवळ बायकी स्वभाव नव्हे तर महिलांना निसर्गदत्त लाभलेले 'सुपर सायन्स' आहे, हे नव्या संशोधनाने सिद्ध केले आहे.

पुरुषांचे ट्रायक्रोमॅटिक जग विरुद्ध स्त्रियांचे टेट्राक्रोमॅटिक साम्राज्य! सामान्य माणसाच्या डोळ्यात रंग ओळखणाऱ्या तीन प्रकारच्या पेशी असतात. लाल, हिरवा आणि निळा! याला ट्रायक्रोमसी म्हणतात. या तीन पेशींच्या बळावर सामान्य पुरुष साधारणपणे १० लाख रंग पाहू शकतो. पुरुषासाठी टोमॅटो सॉसचा लाल, रक्ताचा लाल आणि मिरचीचा लाल हा शेवटी फक्त लालच असतो. पण निसर्गाने महिलांना एक देणगी दिली आहे. साधारण ६० टक्के महिलांच्या डोळ्यांत जनुकीय रचनेमुळे चौथी अतिरिक्त रंगपेशी विकसित होते. या स्थितीला म्हणतात टेट्राक्रोमसी! ज्यामुळे महिलांना तब्बल १० कोटी रंग दिसतात आणि ओळखू येतात. या कौशल्यामुळेच बायकांना पुरुष मंडळी थेट 'कलर ब्लाईंड' वाटतात.

आता विज्ञानाच्या चष्म्यातून पाहिले तर पत्नीचे म्हणणे अगदी बरोबर होते. पतीच्या डोळ्यांना जी साडी फक्त हिरवी दिसते, त्याच साडीमध्ये त्यांच्या टेट्राक्रोमॅट पत्नीला पिवळसर-हिरवी, निळसर-हिरवी आणि रामा-ग्रीन अशा छटा दिसतात. असाच प्रकार कांद्याच्या सालीच्या रंगाचा आहे. कांद्याच्या वाळलेल्या पापुद्र्यामध्ये राखाडी, गुलाबी, फिकट तपकिरी आणि जांभळ्या रंगांचे शेकडो सूक्ष्म फरक महिला पाहू शकतात. पुलंचे निरीक्षण इतके अफाट होते की, विज्ञानाने शोधण्यापूर्वीच स्त्रियांच्या या विशेष दृष्टीची नस अचूक पकडली होती.

हे प्रामुख्याने महिलांमध्येच का आढळते? तर, मानवी शरीरात रंगांची दृष्टी देणारे जीन्स हे क्रोमोझोमवर अवलंबून असतात. पुरुषांकडे एक तर महिलांकडे दोन क्रोमोझोम असतात. जर महिलांच्या दोन्ही क्रोमोझोम्समधील जीन्समध्ये विशिष्ट जनुकीय बदल झाले, तर त्यांच्या डोळ्यांत चार प्रकारच्या रंगपेशी विकसित होतात. जगभरातील सुमारे १२ ते १५ टक्के महिलांच्या जनुकीय रचनेत चार रंगपेशी असण्याचे संकेत मिळतात. महिलांचे मेंदू या चौथ्या पेशीचा वापर करून प्रत्यक्षात कोट्यवधी रंग पाहू शकतात. याला फंक्शनल टेट्राक्रोमसी म्हणतात. टेट्राक्रोमॅट व्यक्तीला दोन सारख्याच दिसणाऱ्या रंगांमधील अतिसूक्ष्म फरक सहज दिसतात. बहुतांश महिलांना त्यांच्यातील या कौशल्याविषयी माहिती नसल्यामुळे त्या याचा प्रभावी वापर करू शकत नाहीत. ट्यूबलाईटचा प्रकाश, बल्बचा प्रकाश आणि सूर्यप्रकाशानुसार रंगांच्या छटा बदलताना त्यांना स्पष्ट जाणवतात. वेगवेगळ्या प्रकाशात रंगांच्या लहरी बदलतात. एक सामान्य पुरुष दोन्ही प्रकाशात तोच रंग तसाच पाहतो. पण, स्त्रियांचे डोळे प्रकाशातील हा सूक्ष्म बदल लगेच टिपतात. म्हणूनच साडी किंवा कपडा सूर्यप्रकाशात नेऊन तपासला जातो. केवळ कपडेच नाही तर खाद्यपदार्थ, मेक-अपच्या विविध वस्तूंचे शेड्स, झाडं-फुलं, गाड्या-प्राणी यांच्यातील रंगवैविध्यही महिलांना अचूकतेने उमगते.

महिलांकडे रंग ओळखणारी जास्तीची रंगपेशी असल्यामुळे त्यांना असे काही रंग दिसू शकतात ज्यांचे शब्दांत वर्णन करणे अशक्य असते आणि म्हणून त्या विशिष्ट रंगाच्या जवळपास असलेल्या वस्तूंचा उल्लेख करून तो रंग समजावून सांगताना कांद्याच्या सालीसारखी मजेदार उदाहरणं दिली जातात. एखादी व्यक्ती नक्की कोणते रंग बघते किंवा त्यांना ते कसे दिसतात? हे मोजण्याची एकच सरसकट शास्त्रोक्त पद्धत नाही. फंक्शनल टेट्राक्रोमसी समजून घेऊन, स्वतःमध्ये त्या कौशल्याचा विकास करण्याची क्षमताही महिलांमध्ये आढळते. फंक्शनल टेट्राक्रोमसी खरंच असते की नाही? यावर संशोधकांमध्ये मतभेद असून त्यावर संशोधन सुरू आहे. यावर कोणतीही अचूक वैज्ञानिक चाचणी उपलब्ध होईपर्यंत वेगवेगळ्या प्रयोग आणि अभ्यासांतून मिळणाऱ्या माहितीवरून निष्कर्ष काढला जातो. पुढच्या वेळी खरेदी करताना,'हा हिरवा जरा जास्त पिवळट आहे' किंवा 'मोतिया रंगात आसमानी शेड हवा' अशी वाक्यं ऐकू आली तर आदराने त्यांच्याकडे पाहा! समोर उभी असलेली स्त्री ही निसर्गाची एक 'सुपर ह्युमन' आवृत्ती असू शकते, जिच्याकडे जगातील १०० कोटी रंग पाहण्याची दैवी दृष्टी आहे. महिलांनी रंगांच्या 'शेड'ची 'छेड' काढली, तर विज्ञानाचा हा नियम नक्की आठवा!

९२२३७००२७७

## डिजिटल जनजागृती

### सीए अभय सगदेव

# डीपीडीपी कायद्यानुसार तुमचे अधिकार

डिजिटल शिक्षणाच्या एका प्लॅटफॉर्मवर अभ्यासक्रमासाठी नोंदणी केल्यानंतर काही महिन्यांनी मीराला अशा प्रचारात्मक संदेश येऊ लागले, ज्यांचा तिने घेतलेल्या अभ्यासक्रमाशी काहीही संबंध नव्हता. तिच्या मनात प्रश्न निर्माण झाला : या प्लॅटफॉर्मकडे माझ्याबद्दल कोणती माहिती आहे? ती माझी माहिती कशी वापरत आहे? माझ्या प्रोफाईलमधील चुकीची माहिती दुरुस्त करण्यास मी सांगू शकते का?

डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ अर्थात डीपीडीपी ॲक्ट प्रत्येक डाटा प्रिंसिपलला महत्त्वाचे अधिकार देतो. डाटा प्रिंसिपल म्हणजे ज्या व्यक्तीशी वैयक्तिक माहिती संबंधित आहे ती व्यक्ती. हे अधिकार यासाठी आहेत की, एकदा माहिती गोळा झाल्यानंतर ती संबंधित व्यक्तीच्या पोहोचेबाहेर कायमची जाऊ नये. पहिला अधिकार म्हणजे वैयक्तिक माहितीबाबत माहिती मागण्याचा अधिकार. डाटा प्रिंसिपल, डाटा फिड्युशिअरीकडून वैयक्तिक माहितीची प्रक्रिया कशी होत आहे याचा सारांश मागू शकतो. डाटा फिड्युशिअरी म्हणजे वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशाप्रकारे प्रक्रिया करायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था. डाटा प्रिंसिपल आपली माहिती कोणत्या इतर डाटा फिड्युशिअरीज आणि डाटा प्रोसेसर्स यांच्यासोबत शेअर केली आहे, तसेच कोणती माहिती शेअर झाली आहे, याबाबतही माहिती मागू शकतो.

दुसरा अधिकार म्हणजे वैयक्तिक माहितीची दुरुस्ती, पूर्तता, अद्ययावतीकरण आणि विलोपन. तुमचा पत्ता, मोबाईल क्रमांक किंवा इतर माहिती चुकीची, अपूर्ण किंवा कालबाह्य असेल, तर ती दुरुस्त, पूर्ण किंवा अद्ययावत करण्यास तुम्ही सांगू शकता. ज्या उद्देशासाठी माहिती प्रक्रिया करण्यात आली होती तो उद्देश पूर्ण झाल्यानंतर ती माहिती आवश्यक नसेल, तर तुम्ही तिचे विलोपन (डिलिशन) मागू शकता. आणखी एक महत्त्वाचा अधिकार म्हणजे कन्सेंट मागे घेण्याचा अधिकार. कन्सेंट म्हणजे ज्या ठिकाणी वैयक्तिक माहितीची प्रक्रिया कन्सेंटवर आधारित असते, त्या ठिकाणी प्रक्रिया करण्यासाठी दिलेली परवानगी. डाटा प्रिंसिपल ही कन्सेंट कोणत्याही वेळी मागे घेऊ शकतो. कायदा सांगतो की कन्सेंट मागे घेण्याची प्रक्रिया कन्सेंट देण्याच्या प्रक्रियेइतकीच सोपी असली पाहिजे. कन्सेंट मागे घेतल्याचा परिणाम दोन्ही बाजूंवर होतो. डाटा प्रिंसिपलसाठी, ज्या काही सेवा किंवा सुविधा त्या कन्सेंटवर अवलंबून होत्या त्या पुढे उपलब्ध राहणार नाहीत. डाटा फिड्युशिअरीसाठी, याचा अर्थ असा की त्याने वाजवी कालावधीत संबंधित वैयक्तिक माहितीची कन्सेंट-आधारित प्रक्रिया थांबवली पाहिजे आणि आपल्या डाटा प्रोसेसर्सकडूनही ती थांबवली पाहिजे. डाटा प्रोसेसर्स म्हणजे डाटा फिड्युशिअरीच्या वतीने वैयक्तिक माहितीची प्रक्रिया करणारी व्यक्ती किंवा संस्था. मात्र, ज्या ठिकाणी माहिती जतन करणे किंवा पुढील प्रक्रिया करणे कायद्याने आवश्यक किंवा मान्य आहे, तेथे अपवाद लागू होऊ शकतात.

तिसरा अधिकार म्हणजे तक्रार निवारणाचा (ग्रिव्हन्स रिड्रेसल) अधिकार. ग्रिव्हन्स रिड्रेसल म्हणजे तक्रारीचे निराकरण करण्याचा अधिकार. प्रत्येक डाटा फिड्युशिअरीने डाटा प्रिंसिपलला वैयक्तिक माहितीच्या हाताळणीबाबत तक्रार किंवा चिंता मांडण्यासाठी प्रभावी व्यवस्था उपलब्ध करून दिली पाहिजे. यामध्ये चुकीची माहिती, नको असलेली प्रक्रिया, मागणीला उत्तर न मिळणे किंवा कायद्यानुसार डाटा प्रिंसिपलच्या हक्कांशी संबंधित इतर कोणताही मुद्दा यांचा समावेश होऊ शकतो. कायद्यानुसार डाटा प्रिंसिपलने प्रथम डाटा फिड्युशिअरीकडे तक्रार मांडावी. तक्रारीचे समाधानकारक निराकरण झाले नाही, तर कायद्यात दिलेल्या पद्धतीने डाटा प्रिंसिपल डाटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडियाकडे जाऊ शकतो.

चौथा अधिकार म्हणजे दुसऱ्या व्यक्तीला नामनिर्देशित करण्याचा अधिकार. डाटा प्रिंसिपल मृत्यू किंवा असमर्थता आल्यास आपल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीला नामनिर्देशित करू शकतो. असमर्थता म्हणजे मन किंवा शरीर अस्वस्थ असल्यामुळे हक्क वापरता न येणे. गंभीर आजार, वृद्धावस्था किंवा अचानक निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितींमध्ये हा अधिकार विशेष महत्त्वाचा ठरू शकतो.

मुलाच्या बाबतीत, त्याचे पालक किंवा कायदेशीर पालक सामान्यतः डाटा प्रिंसिपलचे हक्क वापरतात. त्यामुळे मुलांशी संबंधित वैयक्तिक माहिती अत्यंत काळजीपूर्वक आणि जबाबदारीने हाताळली जाणे आवश्यक आहे.

हक्क प्रत्यक्षात वापरता आले तरच ते अर्थपूर्ण ठरतात. म्हणूनच या मालिकेतील मागच्या लेखात नोटीस, संपर्क तपशील, कन्सेंट मागे घेण्याची प्रक्रिया आणि तक्रार निवारण मार्ग यांची चर्चा केली होती. एखाद्या संस्थेने डाटा प्रिंसिपलला त्याचे हक्क वापरण्यासाठी अनेक वेबपाने शोधायला लावू नयेत, वारंवार ई-मेल पाठवायला भाग पाडू नये किंवा अनावश्यकपणे कठीण प्रक्रिया ठेवू नये. या अधिकारांचा उद्देश दैनंदिन व्यवसाय कठीण करणे हा नाही. त्यांचा उद्देश योग्य समतोल निर्माण करणे हा आहे. एखाद्या संस्थेला सेवा देण्यासाठी वैयक्तिक माहितीची गरज असू शकते; परंतु माहिती डिजिटल पद्धतीने दिली म्हणून त्या व्यक्तीची सर्व माहितीवरील दृश्यमानता आणि नियंत्रण पूर्णपणे नष्ट होऊ नये.

**दैनंदिन जीवनातील डीपीडीपी**

तुम्ही ऑनलाईन खरेदीच्या प्लॅटफॉर्मवरून प्रचारात्मक संदेश मिळण्यासाठी एक चौकट निवडली. काही महिन्यांनी तुम्हाला असे संदेश नकोसे वाटू लागले. अशा संदेशांसाठी कन्सेंट हा आधार असेल, तर ती कन्सेंट सहजपणे मागे घेता आली पाहिजे. त्यानंतर प्लॅटफॉर्मने वाजवी कालावधीत माहितीचा तो कन्सेंट-आधारित वापर थांबविला पाहिजे.

**तुम्हाला माहिती आहे का?**

कन्सेंट मागे घेतल्याने संस्थेकडे असलेली प्रत्येक नोंद आपोआप हटवावी लागते असे नाही. कर, बँकिंग, वैद्यकीय किंवा इतर लागू कायद्यांनुसार काही नोंदी जतन करणे आवश्यक असू शकते. मुख्य परिणाम असा आहे की कन्सेंट-आधारित प्रक्रिया पुढे थांबली पाहिजे, जोपर्यंत दुसरा कायदेशीर आधार ती प्रक्रिया करण्यास परवानगी देत नाही किंवा ती आवश्यक करत नाही.

डाटा प्रिंसिपल, डाटा फिड्युशिअरीकडून वैयक्तिक माहिती आणि तिच्यावरील प्रक्रियेचा सारांश मागू शकतो. डाटा प्रिंसिपल वैयक्तिक माहितीची दुरुस्ती, पूर्तता, अद्ययावतीकरण किंवा विलोपन मागू शकतो; मात्र कायदेशीर जतनाच्या आवश्यकता लागू राहतात. कन्सेंट कोणत्याही वेळी मागे घेता येते. प्रत्येक डाटा फिड्युशिअरीने तक्रार निवारणाची व्यवस्था उपलब्ध करून दिली पाहिजे. तक्रार प्रथम.डाटा फिड्युशिअरीकडे मांडावी; न सुटल्यास ती डाटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडियाकडे नेली जाऊ शकते. तुम्ही आज प्रचारात्मक संदेशांसाठी दिलेली कन्सेंट मागे घेतली, तर ती कशी मागे घ्यायची हे तुम्हाला माहीत आहे का? आणि ज्या सहजतेने तुम्ही कन्सेंट दिली होती, त्याच सहजतेने संस्था ती मागे घेऊ देईल का? ■

sagdeo1@gmail.com

## वाचन कट्टा ग्रुप...

आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांचा वाचनाकडे असलेला कल कमी होत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड आणि सवय निर्माण करण्यासाठी 'वाचन कट्टा' हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरतो. या माध्यमातून विद्यार्थी एकत्र येऊन विविध पुस्तके वाचू शकतात, त्यावर चर्चा आणि नवीन विचारांची देवाणघेवाण होते. वाचन कट्टा म्हणजे विद्यार्थ्यांनी नियमितपणे एकत्र येऊन पुस्तकांचे वाचन व त्यावरील विचार मांडण्याचे व्यासपीठ. शाळा, महाविद्यालय किंवा ग्रंथालयात अशा गटांची स्थापना केल्यास विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरणा मिळते. सुरुवातीला कथा, गोष्टी, चरित्रे, विज्ञान, इतिहास अशा आवडीच्या पुस्तकांपासून वाचनाची सुरुवात करता येते. वाचन कट्टा विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालतो. नियमित वाचनामुळे शब्दसंग्रह वाढतो, भाषेवर प्रभुत्व मिळते आणि विचारशक्ती विकसित होते. पुस्तकांवरील चर्चेमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो तसेच इतरांचे विचार समजून घेण्याची वृत्ती विकसित होते.



विविध विषयांची पुस्तके वाचल्यामुळे सामान्यज्ञान वाढते, कल्पनाशक्तीला चालना मिळते आणि सर्जनशीलता विकसित होते. परीक्षेच्या दृष्टीनेही वाचनाची सवय विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरते. अशा उपक्रमांमुळे मोबाईलचा अनावश्यक वापर कमी कमी करून विद्यार्थी वाचन छंद जोपासू लागतील. वाचन कट्टा हा केवळ पुस्तक वाचण्याचा उपक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन आहे. तो विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, विचारांची व्यापकता आणि संवादकौशल्य प्रदान करतो. त्यामुळे वाचनाची सवय आनंददायी आणि टिकाऊ बनते. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी प्रत्येक शाळा व महाविद्यालयाने वाचन कट्टा सुरू करावा. अशा उपक्रमांमुळे ज्ञानसंपन्न, विचारशील आणि जबाबदार नागरिक घडण्यास निश्चितच मदत होईल.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### नागपूर-कोल्हापूर एक्सप्रेस दररोज हवी

गाडी क्रमांक ११४०३/११४०४ नागपूर-कोल्हापूर-नागपूर एक्सप्रेस ही महाराष्ट्रासाठी एक अत्यंत महत्त्वाची गाडी आहे, परंतु ती आठवड्यातून फक्त दोनदाच धावते. यामुळे हजारो प्रवाशांना मोठी गैरसोय होते. ही गाडी नागपूर, वर्धा, अकोला, वाशीम, हिंगोली, परभणी, लातूर आणि कोल्हापूर यांसारख्या प्रमुख शहरांना जोडते. महाविद्यालयीन विद्यार्थी, वैद्यकीय रुग्ण आणि व्यावसायिक या गाडीवर अवलंबून आहेत. गाडीचे दिवस मर्यादित असल्यामुळे गाड्यांमध्ये प्रचंड गर्दी असते आणि तिकिटे मिळणे कठीण होते. विदर्भ आणि मराठवाड्याला चांगल्या रेल्वे सुविधांची गरज आहे. ही गाडी दररोज चालवल्याने इतर गाड्यांवरील ताण कमी होईल, वेळ आणि पैशांची बचत होईल तसेच मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रातील पर्यटन आणि व्यापाराला चालना मिळेल. रेल्वे विभागाला विनंती आहे की, ही गाडी दररोज चालवावी.

**राजेश कारिया**/अकोला

■■

### स्व-भावाची जागृती

जीवनाचे बहू किंवा लघु नाटकाचे अंक कसे रंगवायचे हे आपल्या हातात नाही तर ते परमेश्वराच्या हातात आहे. कोणत्याही बऱ्या-वाईट भूमिकेत अडकून न पडता मूळ स्वरूपाचे आत्मभान राखण्यासाठी या जीवन नाटकाची निर्मिती भगवंताकडून होते. जर त्याची कृपा झाली तर सरस्वतीच्या वीणेचे सुस्वर झंकारसुद्धा जीवनाला आनंद दिल्याशिवाय रहाणार नाहीत. त्यासाठी ज्ञानभांडार भरण्याची जबाबदारी प्रत्येकावर आहे, ते प्राप्त व्हावे म्हणूनच आपल्या ऋषी-मुनींचा आधार आपल्याला त्यांनी निर्माण केलेल्या ज्ञान, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा, शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिष अशा अनेक अध्ययनाने सद्गुरू आपल्या जीवनाला नक्कीच गती देतात. त्यामुळे अहंकार नष्ट होऊन अंतःकरणात ज्ञानाचा दिवा प्रज्वलित होऊन आपल्या स्व-भावाची जागृती नक्कीच होते. यासाठीच विशिष्ट सण व उत्सवांची निर्मिती झालेली आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

■■

### एक क्रांतिकारी कायदा

आंतरधर्मीय विवाहातून जन्माला आलेल्या अपत्याला आईचा विवाहपूर्व धर्म लागू होणार, ही कालची हेडलाईन सुखद धक्का देणारी होती. हा कायदा एक क्रांतिकारी पाऊल ठरेल, यात शंका नाही. ख्रिश्चन धर्मीय किंवा मुस्लिम धर्मीय तरुण हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून लग्न करून, त्यातून होणारे अपत्य वडिलांच्या धर्माचे राहते. साहजिकच त्याची परिणती त्या धर्मीयांची संख्या वाढण्यात व्हायची. महाराष्ट्र सरकारने हा कायदा करून त्यांच्या मनसुब्यांवर पाणी फेरले. त्याबद्दल महाराष्ट्र सरकारच अभिनंदन.

**माधवी पत्की**/नागपूर

■■

## सलगर येथील जि.प. शाळेत विद्यार्थ्याला सर्पदंश

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

शाळेच्या आवारात एका १० वर्षीय विद्यार्थ्याला सर्पदंश झाला. ही घटना सलगर (ता.अक्कलकोट) येथील जि.प. शाळेच्या आवारात गुरुवारी दुपारच्या सुमारात घडली.वेदांश दिनकर भारती (वय १० वर्षे रा.सलगर) असे सर्पदंश झालेल्या मुलाचे नाव आहे. गुरुवारी दुपारच्या सुमारास तो शाळेच्या आवारातील बाथरूम जवळ गेला होता. त्यावेळी त्याच्या उजव्या पायाला सर्पदंश झाला. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून वडील दिनकर यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## वाघोली येथे मुलाच्या भांडणातून महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

वाघोली (ता.मोहोळ) येथे लहान मुलांच्या खेळण्याच्या भांडणावरून लाकडाने केलेल्या मारहाणीत खैरून माणिक तांबोळी (वय ४५ रा.वाघोली) ही महिला जखमी झाली. ही घटना बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना इरफान तांबोळी आणि इतर चौघांनी मिळून मारहाण केली. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## घर रिकामे करण्याच्या कारणावरून महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

घर खाली करण्याच्या कारणावरून ४१ वर्षीय महिलेस चप्पल,लाकूड आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना मोहोळ येथील समर्थ नगरात बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. स्मिता राजेश जाधव (वय ४१ रा. समर्थनगर मोहोळ) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना विश्वनाथ ढावरे आणि इतर पाच ते सहा जणांनी मिळून मारहाण केली. त्यांना उपचारासाठी राजेश (पती) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालय गुरुवारी दुपारी दाखल केले.

# महापालिकेच्या १३० पदांच्या भरतीला शासनाची मान्यता

- ३५ टक्के आस्थापना खर्चाची अट केली शिथिल
- कनिष्ठ अभियंता, लिपिक, मिडवाईफसह विविध पदांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेतील रिक्त पदांच्या भरतीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. अत्यावश्यक सेवांतील पदे भरण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने ३५ टक्के आकृतिबंध खर्चाची अट एकदाच शिथिल करत १३० पदांच्या भरतीस मंजुरी दिली आहे. याबाबतचे आदेश उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना पाठविले आहेत. लवकरच भरती प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

महापालिकेने पाठविलेल्या प्रस्तावानुसार अत्यावश्यक सेवा सुरळीत ठेवण्यासाठी ही मंजुरी देण्यात आली आहे. शासनाने यापूर्वी दिलेल्या निर्णयानुसार केवळ एकदाच ही अट शिथिल करण्यात येत असून त्याअंतर्गत रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-ब, गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांसाठी शासनाच्या नियमानुसार राबविण्यात येणार आहे. स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी टीसीएस-आयऑन किंवा बीपीएस यापैकी एका संस्थेची निवड करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

### ही पदे भरण्यास दिली मान्यता

मंजूर झालेल्या पदांमध्ये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ३०, कनिष्ठ अभियंता सहाय्यक १५, लिपिक/टंकलेखक ४१, मिडवाईफ २२, फायरमन ७, सॅनिटरी इन्स्पेक्टर ४, पंप ऑपरेटर २, पाईप फिटर २, कनिष्ठ अभियंता (विद्युत) १, सहायक प्रयोगशाळा तंत्रज्ञ १, फिल्टर इन्स्पेक्टर १, फायर मोटार मेकॅनिक १, लघुलेखक १, महिला व बाल विकास अधिकारी १ तसेच सहायक कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी १ अशा विविध पदांचा समावेश आहे.

या निर्णयामुळे अनेक दिवसांपासून रखडलेल्या भरती प्रक्रियेला गती मिळणार असून, महापालिकेच्या विविध विभागांतील मनुष्यबळाची कमतरता दूर होण्यास मदत होणार आहे. विशेषतः अभियांत्रिकी, अग्निशमन, आरोग्य आणि प्रशासकीय विभागातील रिक्त पदे भरल्याने नागरिकांना अधिक सक्षम आणि गतिमान सेवा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

**वेळापत्रक निश्चितीसाठी आयुक्तांसोबत लवकरच बैठक**

सोलापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील १३० रिक्त पदांच्या भरतीला शासनाची मंजुरी मिळाली असून लवकरच ही भरती प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली. महानगरपालिकेने १४ फेब्रुवारी २०२३ रोजी सुमारे ३०० पदांसाठी प्रक्रिया सुरू केली होती. त्यापैकी सुमारे १५० उमेदवार रुजू झाले होते. उर्वरित १३० पदांसाठी शासनाकडे मान्यता मागविण्यात आली होती. आता या पदांना शासनाची मंजुरी प्राप्त झाली आहे. ही भरती टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस किंवा आयबीपीएस यांच्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार आहे. भरतीचे वेळापत्रक निश्चित करण्यासाठी आयुक्तांसोबत लवकरच बैठक घेण्यात येणार असून त्यामध्ये प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत निर्णय घेतला जाईल.


**श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**
२३/१५७, न्यु पाच्छा पेठ, नविन वॉलचंद कॉलेज समोर, सोलापूर ४१३००५ फोन २६२००६७

**४० वे वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांकरिता)**

**श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर या संस्थेची ४० वे वार्षिक सर्व साधारण सभा रविवार दि. २३/०८/२०२६ रोजी सकाळी १० वा. पूर्व विभाग श्रीराम मंदीर, १४५५, ब दाजी पेठ, सोलापूर या ठिकाणी खालील विषयावर विचार विनिमय करण्याकरिता बोलाविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.**

**- सभेपुढील विषय -**

१) मागील दि. २०/०८/२०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
२) दि. ३१/३/२०२६ अखेर संपणाऱ्या वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मंजूर करणे.
३) मा. व्यवस्थापक मंडळाच्या शिफारशीनुसार सन २०२५-२६ सालाचे नफ्याची विभागणी करण्यास मंजुरी देणे.
४) सन २०२६-२७ सालाकरिता मा. व्यवस्थापक मंडळाने तयार केलेले उत्पन्न व खर्चाचे अंदाज पत्रकास मंजुरी देणे तसेच २०२५-२६ या सालात अंदाजपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५) सन २०२६-२७ सालाकरिता बाहेरील कर्जाची मर्यादा निश्चित करणे.
६) सन २०२५-२६ सालाचे वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल वाचून माहिती घेणे.
७) सन २०२६-२७ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.
८) सन २०२२-२३ अखेरचे न नेलेले डिव्हिडंड रक्कम पोटनियमाप्रमाणे राखीव निधीस वर्ग करणेबाबत.

सोलापूर : दि.२६/०७/२०२६
मा.संचालक मंडळाच्या अनुज्ञेवरुन
**अंबादास दत्तात्रय म्हेता - चेअरमन**

सूचना
१) कोरमअभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याचदिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल अशा सभेस कोरमची आवश्यकता लागणार नाही. २) ज्या सभासदांना सभेमध्ये सुचना अगर प्रश्न विचारायचे असतील तर त्यांनी संस्थेकडे दि. १९/०८/२०२६ पर्यंत लेखी आणून द्यावेत त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रश्नांचा विचार केला जाणार नाही. ३) ज्या सभासदांनी मागील लाभांश नेला नसेल त्या सर्वांनी सदर रक्कम नेण्याची तजवीज करावी. अन्यथा पतसंस्थेच्या पोटनियमाप्रमाणे ज्या सभासदांनी जाहीर केलेल्या दिनांकापासून तीन वर्षापर्यंत रक्कम नेली नसेल अशी रक्कम राखीव निधीस वर्ग करण्यात येईल. ४) दि.३१/३/२०२६ अखेर संपणाऱ्या वर्षाचा अहवाल, तेरीज, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तसेच अंदाज पत्रक संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेला आहे.


### जाहीर प्रसिद्धीकरण

पुढील नेमली तारीख: ११/०९/२०२६
दि.कि.अ.नं. ४३/२०२६
नि. ५

**बार्शी येथील मे जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

१) **समीक्षा हनुमंत वाघमारे,** वय १५ वर्षे,
धंदा-शिक्षण, रा. सावंत वस्ती, पिराची कुरोली,
ता. पंढरपूर जि. सोलापूर - अज्ञान अर्जदार
२) **स्नेहा हनुमंत वाघमारे,** वय ०८ वर्षे, **-- अर्जदार**
धंदा-शिक्षण, रा. सदर - अज्ञान
३) **श्रीमती उषा हनुमंत वाघमारे,** वय ४१ वर्षे,
धंदा-घरकाम, रा. सदर (अज्ञान अर्जदार नं. १, २
यांची अ.पा.क. आई)

**विरुद्ध**

महाराष्ट्र सरकार **-- सामनेवाला**

ज्याअर्थी डि. सोलापूर, सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे रुई येथील शेतजमीन ग.नं. ३५८ पैकी ० हे. ६८ आर आकार रु. ०.५० पैसे ही सदर गटातील न विभागलेली जमीन आतील तदंगभूत वस्तुसह सदर मिळकत अज्ञान अर्जदाराचे वडिल मयत झाल्यानंतर वारस हक्काने मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी मालक सदरी नोंद झालेली आहे. अज्ञान अर्जदार यांचा सांभाळ, शिक्षण, पालन पोषण सर्व काही अज्ञान अर्जदाराची आई हिच आई या नात्याने पाहत आहेत. अज्ञान अर्जदाराचे वडिल मयत असून अज्ञान अर्जदारचे शिक्षणाचा दिवसेंदिवस वाढत चाललेला खर्च व भविष्यातील शिक्षणाचा खर्च करणेकरीता त्यांचे अ.पा.क. आईनी वर नमूद जमीन विक्रीस काढली त्याची माहिती प्रियांका जयंत घोडके व हर्षदा प्रशांत घोडके, दोघी रा. रुई, ता. बार्शी यांना झालेने त्यांचेशी व्यवहार ठरवून इसाराची रक्कम स्विकारली आहे. तथापि, सदर मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने अज्ञानाचे हिष्याची मिळकत विक्रीकरीता मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, सदरची कृती योग्य व गरजेची असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अर्जदाराचे वतीने त्यांचे अज्ञान पालनकर्ते आईनी या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करण्यास परवानगी मागणेचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनां संबंधाने कोणाचे काही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे काही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमली तारीख ११/०९/२०२६ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकत, तक्रारी सादर करावात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख: १३/०७/२०२६

शिक्का

**(सही)**
**अधिक्षक**
**अपर जिल्हा न्यायालय, बार्शी**

### वारसाबाबत जाहीर प्रसिद्धीकरण

श्री एन जी शिवपुजे ॲडव्होकेट

**माढा येथील मे दिवाणी न्यायाधिश सो क स्तर याचे न्यायालयांत दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ४३/२०२६ नि नंबर**

श्रीमती माधुरी मोतीलाल समर्थ ------ अर्जदार
विरुद्ध
१) कु मोनिका मोतीलाल समर्थ लग्नानंतर
सौ मोनिका प्रशांत पांढरे
२) कु मंजू मोतीलाल समर्थ लग्नानंतर
सौ मंजू अमृत बाभळे ----- सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत मोतीलाल बळवंत समर्थ हे दिनांक २७/०९/२०२४ रोजी मयत झाले असून त्यांचे नांवावरील मौजे देवकुरळी ता तुळजापुर जि धाराशिव येथील स्थावर मिळकती बाबत अर्जदार व सामनेवाला हे वारसदार आहेत याबाबत वारसाचा दाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार व सामनेवाला हे मयत मोतीलाल बळवंत समर्थ याचे वारसदार नव्हेत असे कोणास म्हणावयाचे असलेस त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसाचे आंत अथवा नेमली तारीख १०/०९/२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता या न्यायालयात स्वत अगर नेमलेल्या विधीज्ञा मार्फत हजर राहून लेखी हरकती कळवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस अर्जदाराचे हक्काबाबत पुरावा घेवून लागलीच योग्य ते निर्णय पारीत केले जातील.

आज रोजी दिनांक ६/८/२६ रोजी न्यायालयाच्या सहिशिक्यानिशी दिले.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर माढा**

### वारसाबाबत जाहीर प्रसिद्धीकरण

श्री एन जी शिवपुजे ॲडव्होकेट

**माढा येथील मे दिवाणी न्यायाधिश सो क स्तर याचे न्यायालयांत दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ४१/२०२६ नि नंबर**

श्रीमती माधुरी मोतीलाल समर्थ ------ अर्जदार
विरुद्ध
१) कु मोनिका मोतीलाल समर्थ लग्नानंतर
सौ मोनिका प्रशांत पांढरे
२) कु मंजू मोतीलाल समर्थ लग्नानंतर
सौ मंजू अमृत बाभळे ----- सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत महानंदा बळवंत समर्थ लग्नानंतर महानंदा माणिक मोहीकर हे दिनांक १६/१०/२०१२ रोजी मयत झाले असून त्यांचे नांवावरील मौजे देवकुरुळी ता तुळजापुर जि धाराशिव येथील स्थावर मिळकती बाबत अर्जदार व सामनेवाला हे वारसदार आहेत याबाबत वारसाचा दाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार व सामनेवाला हे मयत महानंदा बळवंत समर्थ लग्नानंतर महानंदा माणिक मोहीकर याचे वारसदार नव्हेत असे कोणास म्हणावयाचे असलेस त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसाचे आंत अथवा नेमली तारीख १०/०९/२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता या न्यायालयात स्वत अगर नेमलेल्या विधीज्ञा मार्फत हजर राहून लेखी हरकती कळवाव्यात सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस अर्जदाराचे हक्काबाबत पुरावा घेवून लागलीच योग्य ते निर्णय पारीत केले जातील.

आज रोजी दिनांक ६/८/२६ रोजी न्यायालयाच्या सहिशिक्यानिशी दिले

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर माढा**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापुरातील तमाम लोकांना विशेषतः सोलापुरातील सर्व रहिवाश्यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्लॉट जागेचे वर्णन- डि व सब डि सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका शहर सोलापूर येथील हद्दवाढपैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी बाळे हद्दीतील स. नं. ८४/१अ+२अ+२/१ या मधील आबासाहेब पाटील नगर या नावाने ओळखले जाणारे बिनशेती वसाहती मधील बिनशेती प्लॉट नं. १० याचे एकूण क्षेत्र ११४.७० चौ. मी. अथवा १२३४.१७ चौ. फूट इतके आहे. चतुःसिमा खालील प्रमाणे- पूर्वेस- स. नं. ८४/१ब, पश्चिमेस- ६ मी. ले.आ. रस्ता, दक्षिणेस-प्लॉट नं. ११, उत्तरेस-सर्व्हे नंबर जमीन.

येणे प्रमाणे चतुःसिमेतील प्लॉट जागा महेरूननिसा फक्रोद्दिन मुजावर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांचे वैयक्तिक कारणास्तव आमचे अशिल अजित हरिदास क्षीरसागर यांना कायमखुषखरेदी देण्याचे ठरवून इसारा दाखल काही रक्कम स्विकारली आहेत.

सबब, वर नमूद फ्लॉट विषयी कोणाचा वाद, वहिवाटी, करार, मॉर्गेज, कर्ज, दान, लीज, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, वाटणी, टाच, जप्ती, कुळवहिवाट, कब्जाकरार, मदार व इतर कोणत्याही प्रकारचा बोजा हित संबंध असतील तर खालील नमूद वकीलांकडे योग्य त्या कागदपत्रांनिशी ३ (तीन) दिवसाच्या आत समक्ष भेटून लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर वर नमूद फ्लॉट जागा निर्वेध व निजोखमी आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता. ०६/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. धनश्री भारत केंदळे**
**बीएससी., एलएलबी**
**११४९ बी, जुनी पोलीस लाईन्स, मुरारजी पेठ,**
**जि. सोलापूर मो. ८६००३०४४३३**


Classifieds

**पाहिजेत**

**आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का? आपला वेळ, शिक्षण, यांचा उपयोग करून नामांकित कंपनीत कामाची सुवर्णसंधी. निश्चित उत्पन्न, गुंतवणूक नाही. मो.८०८७४५९८५४**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.


## SHRI MAHAVIR URBAN CO. OP BANK LTD., SOLAPUR

Head Office: 60/61, East Mangalwar Peth, Solapur 413002
PH: (0217) 2622933/44

**DEMAND NOTICE UNDER SECTION 13(2) OF SARFAESI ACT 2002**

Whereas you the below mentioned Borrower, Guarantor's and Mortgagors have availed loan from Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur, by mortgaging your immovable properties. Consequent to default committed by you all, your loan account has been classified as Non Performing Asset, whereas Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur being a secured creditor under the Act, and in exercise of the powers conferred under section 13(2) of the said Act read with rule 2 of Security Interest (Enforcement) Rules 2002, issued Demand Notice calling upon the Borrowers/Guarantor's/Mortgagors as mentioned below on their last known address to repay the amount mentioned in the notices with future interest thereon within 60 days from the date of the notice, but some notices have been returned unserved due to certain reasons, thus this public notice is being issued as follows:

| Sr. No. | Particular | Description |
|---|---|---|
| 1 | Name of Borrower/ Guarantor/ Mortgagor | 1) Shri Raghvendra Medical and Agency Prop: Siddheshwar Vasudev Nandal<br>R/o: Shop No. 1,2,3, Ground Floor, Plot No. 18/11, Madhav Nagar, Opp. Raghvendra Tower, Solapur 413006<br>2) Narendra Shivram Jatla<br>R/o: B-366, Vidi Gharkul, Hydarabad Road, Solapur 413005<br>3) Sunil Vasudev Nandal<br>R/o: Plot No. 117, Kisan Sankul, Vidi Gharkul, Hydarabad Road, Solapur 413005 |
| | Loan Account No./ Type | 0030032170000135/ Installment Loan |
| | Loan Amount | Rs. 50,00,000/- |
| | Details of the Security to be enforced | All that piece of land and building situated within District and Sub district Solapur, Taluka North solapur, within limits of Solapur Municipal Corporation Extension Area, out of Kasabe Solapur, situated at "Kisan Sankul" under the Gharkul Scheme on Akkalkot Road, bearing Old Survey No. 145/3, and its New Survey No. 143/3, Out of its Row House Unit No. A 94, Plot No. 170 having area 50.98 Sq. Mt. and Row House Unit No. A 95, Plot No. 171 having area 50.98 Sq. Mt. having boundaries as follows: 1) Plot No. 170 :- East - 6 Meter Internal Road, West - Open Land, South - Plot No. 171, North - Plot No. 169. 2) Plot No. 171: - East - Road, West - Open Land, South - Plot No. 172, North - Plot No. 170. |
| | Date of NPA | 30/06/2026 |
| | Demand Notice date | 27/07/2026 |
| | Amount Due in Rs. as on 30/06/2026 | Rs. 42,86,740/- (Rs. Fourty Two Lakh Eighty Six Thousand Seven Hundred Fourty Only) Plus future interest @ 14% p.a. and other expenses thereon. |
| 2 | Name of Borrower/ Guarantor/ Mortgagor | 1) Basavraj Shivshankar Umbarje Prop: Basavraj Shivshankar Umbarje<br>R/o: Shop No. E-93, Siddheshwar Market Yard, Hydarabad Road, Solapur 413006<br>2) Iresh Vishwanath Gadekar<br>R/o: 25, Mitra Nagar, Shelagi, Solapur 413006<br>3) Mahesh Bhagawant Birajdar<br>R/o: 76/2, Bhavani Peth, Solapur 413002 |
| | Loan Account No./ Type | 0040032020000093/Cash Credit Other Security Loan |
| | Loan Amount | Rs. 30,00,000/- |
| | Details of the Security to be enforced | District and Sub district Solapur, Taluka North Solapur, within limits of Solapur Municipal Corporation Extension Area, at Shelagi, having Bhumapan No. 79/1/B/2, (As per Sale Deed Gat No. 79/A/2), out of it Plot No. 103 and 104, Its limits Eastwest South side 150 Ft., North Side 60 Ft., South Side 100 Ft., As per Sale Deed each Plot area 7875 Sq. Ft. and 7625 Sq.Ft., or 731.60 Sq. Mt. and 708.40 Sq. Mt., As per online extract area 0.144 H.R. or 0.14.40 H. R. Sq. Mt., having boundaries as follows: East - Road out of Layout, West - Solapur Tuljapur Road, South - Plot No. 133, North - Plot No. 9. |
| | Date of NPA | 30/06/2025 |
| | Demand Notice date | 30/07/2026 |
| | Amount Due in Rs. as on 30/06/2026 | 25,82,361/- (Rs. Twenty Five Lakh Eighty Two Thousand Three Hundred Sixty One Only) Plus future interest @ 14% p.a. and other expenses thereon. |

Notice is therefore given to the Borrower/Guarantor & Mortgagor as mentioned above, calling upon them to make payment of the aggregate amount mentioned above against all the respective Borrower within 60 days of Publication of this notice as the said amount is found payable in relation to the respective loan account as on the date shown above. It is made clear that if the aggregate amount together with future interest and other amounts which may become payable till the date of payment is not paid, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur shall be constrained to take appropriate action for enforcement of security interest upon properties described above. Please note that this publication is made without prejudice to such rights and remedies as are available to Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur against the Borrower/ Guarantor's/ Mortgagors of the said financials under the law, you are further requested to note that as per section 13(13) of the said act, you are restrained/ prohibited from disposing of or dealing with the above security or transferring by way of sale, lease or otherwise of the secured asset without prior consent of Secured Creditor.

**Date:** 06/08/2026
**Place:** Solapur

SEAL

**Sd/-**
**Authorised Officer**
**Shri. Mahavir Urban Co op Bank Ltd., Solapur**

## बार्शी नगरपरिषद, बार्शी

**(स्थापत्य विभाग)**

**जाहीर निविदा-३ (२०२६-२७)**

१) बार्शी नगरपरिषद खालील नमुद कामाकरिता बंद लखोट्यातून खालील निविदा मागवित आहे. निविदापत्रके दि. १२/०८/२०२६ रोजी दु. ४-०० वाजेपर्यंत स्थापत्य विभागाकडे विकत मिळतील. दि. १३/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरलेली निविदापत्रके नागरी सुविधा केंद्र कार्यालयात स्विकारली जातील. बयाणा रक्कमेपोटीचे रक्कमेचा धनाकर्ष (डि. डि.) द्वारे स्विकारणेत येईल. रोख रक्कम भरणा करून घेतली जाणार नाही. धनाकर्ष सोबत असलेशिवाय निविदापत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दि. १४/०८/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता हजर निविधारकांसमोर अथवा त्यांचे प्रतिनिधी समोर बंद निविदा पाकिटे मुख्याधिकारी यांचे कार्यालयात (शक्य झाल्यास) उघडणेत येतील. बंद लखोट्यावर ज्या त्या कामाचे नाव लिहावे. निविदा २ पाकिट पद्धतीने स्विकारल्या जातील पाकिट क्र. १ बयाणा रक्कमेचा धनाकर्ष (डी.डी), आयकर पॅन नंबर, जीएसटी, ईपीएफ, १ वर्षाचे आयटी प्रमाणपत्र, तसेच ३ लक्षच्या आतील कामास परिशिष्ट-अ प्रमाणपत्र (र.रु. १०० चे स्टॅम्पवर), सत्य प्रतिज्ञालेख (र.रु. १०० चे स्टॅम्पवर) आणि ३ लक्षच्या वरील कामास परिशिष्ट-अ प्रमाणपत्र (र.रु. ५०० चे स्टॅम्पवर), सत्य प्रतिज्ञालेख (र.रु. ५०० चे स्टॅम्पवर), महाराष्ट्र शासनाचे सार्व. बांधकाम विभाग यांचेकडील योग्य त्या वर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र रिनिव्हल असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२०/०५/२०२१ अन्वये १० लक्ष (सर्व कर अंर्तभूत करून) रक्कमेवरील कामे ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणेबाबतच्या सुचना देणेत आलेल्या आहे. तसेच पाकिट क्र. २ मध्ये भरलेली निविदा सादर करावी. निविदाच्या अटी शर्ती वगैरे संपूर्ण माहिती सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. कमी अथवा जादा दराची निविदा मंजुर करणे अथवा नामंजुर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत. सदरचे काम तात्काळ करणे गरजेचे असलेने अल्प मुदतीची जाहीर निविदा करणेत येत आहे.

**तपशील**

| अ. न. | कामाचे नाव | अंदाजे वार्षिक र.रु. | बयाणा रक्कम | निविदा किंमत | सुरक्षित ठेव | कामची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१३ कसबा पेठ, संभाजी चौक येथे मारुती मंदिराजवळ पेव्हिंग ब्लॉक बसविणे | १,९८,३४०/- | २०००/- | २३६/- | बिलातून ९% | ३ महिने |

**टिपः-** नमूद वरील काम हे न.पा.निधीमधुन प्रस्तावित केली असुन जसजसी वित्तीय तरतूद उपलब्ध होतील तसतसी बिले अदा केली जातील याची नोंद घ्यावी.

नगरपरिषद कार्यालय,
बार्शी दि. ०६/०४/२०२६

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**बार्शी नगरपरिषद बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### विश्वचषकानंतर मेस्सीचे दोन गोल



**मियामी :** लिओनेल मेस्सीने विश्वचषकानंतरचे आपले पहिले दोन गोल केले आणि 'लीग्स चषक'मधील सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत आघाडी घेतली. या सामन्यात इंटर मियामीने सुरुवातीची पिछाडी भरून काढत ॲटलेटिको सॅन लुईसचा ४-२ असा पराभव केला. 'नू स्टेडियम'वर झालेल्या या सामन्याच्या दुसऱ्या सत्रात, परिसरात वीज चमकल्यामुळे खेळाला ३० मिनिटांचा विलंब झाला. मेस्सीने ११ व्या आणि ४४ व्या मिनिटाला गोल केले. लीग्स चषकाच्या चार वर्षांच्या इतिहासात सर्वाधिक गोल करण्याचा विक्रम आता त्याच्या नावावर आहे; त्याने १२ सामन्यांत १४ गोल केले असून, तो लॉस एंजेलिस एफसीच्या डेनिस बुआंगापेक्षा एका गोलने पुढे आहे. या सामन्यात टेलास्को सेगोव्हिया आणि बचावपटू मायकेल यांनीही गोल केले, तर नोआ ॲलनने तीन गोल करण्यात मदत केली. या विजयामुळे इंटर मियामीची सलग आठ सामन्यांतील अपराजित मालिका कायम राहिली. विश्वचषकानंतरच्या आपल्या दुसऱ्या सामन्यात मेस्सी पुन्हा एकदा मियामीच्या सुरुवातीच्या संघात परतला. विश्वचषकात त्याने अर्जेंटिनाला सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचविले होते, परंतु अर्जेंटिना संघाला स्पेनकडून १-० ने पराभव स्वीकारावा लागला होता.

# मालिकेसाठी संघ आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज असेल



### मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना विश्वास

**कोलंबो, ६ ऑगस्ट**

अलीकडच्या काळात मायदेशातील कसोटी सामन्यांमधील कामगिरी कदाचित तितकीशी प्रभावी राहिली नसेल, तरीही १५ ऑगस्टपासून श्रीलंकेविरुद्ध सुरू होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी आपला संघ सर्व आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज असेल, असा ठाम विश्वास भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी व्यक्त केला.

येथे सराव सत्रापूर्वी संघाला संबोधित करताना गंभीर यांनी संघात नव्याने सहभागी झालेल्या खेळाडूंचे - फिरकी गोलंदाज व अष्टपैलू खेळाडू सारांश जैन आणि वेगवान गोलंदाज आकिब नबी - स्वागत केले.

आपल्यासमोर काय आव्हान आहे आणि आपण कशासाठी खेळत आहोत, याची आपल्याला जाणीव आहे. आपण कठोर मेहनत घेऊ शकतो, आपल्या क्षमतेच्या पलीकडे जाऊन प्रयत्न करू शकतो आणि सर्व आवश्यक गोष्टींची पूर्तता करू शकतो, असे गंभीर यांनी म्हटले आहे.

१५ ऑगस्टच्या सकाळी, आपण प्रथम फलंदाजी करीत असू किंवा गोलंदाजी, आपल्यासमोर येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे किंवा आव्हानाचे उत्तर देण्यासाठी आपण पूर्णपणे सज्ज असू. त्यामुळे आतापासूनच सर्व बाबींची योग्य पूर्तता होईल याची खात्री करा, असेही त्यांनी नमूद केले.

या कसोटी मालिकेतील पहिला सामना १५ ऑगस्टपासून गॅले येथे खेळविला जाईल, तर दुसरा सामना २३ ऑगस्टपासून कोलंबोमध्ये होईल. गत वर्षी डिसेंबरमध्ये दक्षिण आफ्रिकेकडून मायदेशात झालेल्या ०-२ अशा निराशाजनक पराभवानंतरची ही भारताची पहिली आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिप मालिका असेल.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये मध्य प्रदेशसाठी सातत्याने चांगली कामगिरी केल्यामुळे सारांशची संघात निवड करण्यात आली आहे. दुखापतग्रस्त जसप्रीत बुमराहच्या जागी आकिब नबीचा समावेश करण्यात आला आहे. गेल्या हंगामात जम्मू-काश्मीरने रणजी करंडक जिंकण्याच्या ऐतिहासिक कामगिरीत त्याने मोलाची भूमिका बजावली होती.आपल्या संघात काही नवीन खेळाडू आले आहेत. सर्वप्रथम, सारांशचे, अभिनंदन. येथे पोहोचण्यासाठी सारांशने खूप मेहनत घेतली आहे, असे म्हणत गंभीर यांनी ३३ वर्षीय आणि उशिरा यश मिळवलेल्या या खेळाडूचे स्वागत केले. दुसरे म्हणजे, मला आकिबचे अभिनंदन करायचे आहे. आकिबचा गत हंगाम उत्कृष्ट होता व त्याने जम्मू-काश्मीरला रणजी करंडक जिंकून दिला, ही एक मोठी कामगिरी आहे. आकिबचे पुन्हा एकदा अभिनंदन, असेही ते म्हणाले.

(वृत्तसंस्था)

### फिरकी गोलंदाजीचा सामना करण्याचे फलंदाजांचे लक्ष्य

पुढील आठवड्यात श्रीलंकेविरुद्ध सुरू होणाऱ्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेच्या तयारीचा एक भाग म्हणून, भारतीय फलंदाज शुक्रवारी 'नॉनडिस्क्रिप्ट्स क्रिकेट क्लब' येथे स्थानिक 'श्रीलंका इलेव्हन' विरुद्धच्या तीन दिवसीय सराव सामन्यात फिरकी गोलंदाजीचा सामना करण्याच्या आपल्या कौशल्याला अधिक धार लावण्यास उत्सुक असतील.

अलीकडेच मायदेशात न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना दर्जेदार फिरकी गोलंदाजीचा सामना करणे ही भारतासाठी एक कमकुवत दुवा ठरली होती आणि श्रीलंकेविरुद्धही परिस्थिती वेगळी असणार नाही.

श्रीलंकेकडे फिरकी गोलंदाजांचा एक सक्षम गट आहे, विशेषतः त्यांच्या घरच्या मैदानांवर; त्यामुळे १५ ऑगस्टपासून गॅले येथे होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी भारतीय फलंदाजांसाठी हा सराव सामना अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

कर्णधार शुभमन गिल, केएल राहुल आणि यशस्वी जयस्वाल यांसारख्या काही प्रमुख फलंदाजांनी कोलंबोला रवाना होण्यापूर्वी आपापल्या घरी वैयक्तिक पातळीवर फिरकी गोलंदाजीचा सामना करण्याची तयारी सुरू केली होती, परंतु श्रीलंकेच्या खेळपट्टीवर प्रत्यक्ष खेळण्याचा अनुभव त्यापेक्षा नक्कीच श्रेष्ठ ठरेल.

हा तीन दिवसीय सामना त्यांना स्थानिक परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव देईल. हे महत्त्वाचे आहे कारण यातील अनेक खेळाडू श्रीलंकेच्या भूमीवर पहिल्यांदाच लाल चेंडूने खेळल्या जाणाऱ्या कसोटी सामन्यात खेळत आहेत. या सामन्यासाठी 'श्रीलंका इलेव्हन'चा संघ अद्याप जाहीर झालेला नाही.

भारताची श्रीलंकेतील शेवटची कसोटी मालिका २०१७ मध्ये झाली होती आणि गेल्या दशकात संघाच्या रचनेत मोठे बदल झाले आहेत.

वास्तविक, या संघातील केवळ राहुल, कुलदीप यादव आणि रवींद्र जडेजा हेच खेळाडू यापूर्वी श्रीलंकेत कसोटी सामने खेळले आहेत.



सरावादरम्यान भारतीय कसोटी क्रिकेट संघातील खेळाडू

## तन्वी शर्मा उपांत्यपूर्व फेरीत

### 'कोरिया मास्टर्स' बॅडमिंटन



**आसान, ६ ऑगस्ट**

भारताची युवा बॅडमिंटनपटू तन्वी शर्माने 'कोरिया मास्टर्स सुपर ३००' स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारत आपली शानदार कामगिरी कायम राखली आहे. तैपेई येथे नुकतेच आपले पहिले 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर' विजेतेपद पटकावल्यानंतर, १७ वर्षीय तन्वी आता शुक्रवारी उपांत्यपूर्व फेरीत आपलीच सहकारी खेळाडू रक्षिता श्री हिच्याशी भिडणार आहे.

पंजाबच्या या १७ वर्षीय खेळाडूने आपली विजयी मालिका टिकवून ठेवण्यासाठी रणनीतीमधील परिपक्वता आणि जिद्द यांचे प्रदर्शन केले. स्पर्धेत तिसरे मानांकन मिळालेल्या तन्वीने आपल्या मोहिमेची सुरुवात चीनच्या युआन अंकी हिच्यावर २१-१६, २१-१५ असा प्रभावी विजय मिळवून केली; हा सामना ३६ मिनिटे चालला. त्यानंतर अंतिम १६ खेळाडूंच्या फेरीत तिने सहकारी खेळाडू श्रियांशी वालिसेट्टी हिच्याविरुद्ध चुरशीच्या लढतीत २१-१६, १७-२१, २१-१३ असा विजय मिळवित स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले. माजी राष्ट्रीय प्रशिक्षक पार्क ते-सांग यांच्या मार्गदर्शनाखाली खेळताना, तन्वीचे 'स्टीप क्रॉस-कोर्ट स्मॅशेस' व 'डिसेप्टिव्ह नेट ड्रॉप्स' यांचे वैशिष्ट्यपूर्ण संयोजन महत्त्वाच्या रॅलीजमध्ये निर्णायक ठरले.

उपांत्यपूर्व फेरीतील ही पात्रता तन्वीच्या वेगाने होणाऱ्या प्रगतीमधील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरली आहे,त्यामुळे तिने 'बीडब्ल्यूएफ' जागतिक क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे. तिच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे ती जागतिक क्रमवारीत ३० व्या स्थानाच्या वर पोहोचली असून, वरिष्ठ महिला एकेरीतील सर्वात आश्वासक युवा खेळाडूंपैकी एक म्हणून तिने स्वतःचे स्थान पक्के केले आहे.

(वृत्तसंस्था)

## भारतीय महिला बुद्धिबळ संघाला अव्वल मानांकन

**समरकंद, ६ ऑगस्ट-**

समरकंदमध्ये १५ ते २८ सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडम ध्ये भारतीय महिला संघाला पहिले मानांकन देण्यात आले आहे, तर पुरुष संघ अव्वल मानांकित अमेरिकेच्या मागे दुसऱ्या स्थानावर आहे. भारत या दोन्ही गटांमधील विद्यमान विजेता आहे.

कोनेरू हम्पी, दिव्या देशमुख, आर. वैशाली, वर्तिका अग्रावाल आणि बी. सविता श्री यांचा महिला संघात समावेश आहे. तर 'खुल्या' गटात डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद, अर्जुन एरिगासी, निहाल सरीन आणि विदित गुजराती हे खेळाडू विजेतेपद राखण्याचा प्रयत्न करतील. खुल्या गटात महिलांना पुरुषांविरुद्ध खेळण्याची मुभा असते. पुरुष संघात एक बदल करण्यात आला असून, पी. हरिकृष्ण यांच्या जागी निहालचा समावेश करण्यात आला आहे. महिला संघातही दोन बदल झाले आहेत; डी. हरिका आणि तानिया सचदेव यांच्या जागी हम्पी व सविताचा समावेश करण्यात आला आहे.

# तीन भारतीयांची अंतिम फेरीत धडक

### जागतिक २० वर्षांखालील ॲथ्लेटिक्स

**युजीन, ६ ऑगस्ट**

येथे सुरू असलेल्या जागतिक २० वर्षांखालील ॲथ्लेटिक्स स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पहिल्या दिवशी समाधानकारक कामगिरी केली. यामध्ये भालाफेकपटू आशिष यादव आणि टी. धरणीधरण तसेच थाळीफेकपटू अमानत कंबोजने अंतिम फेरीसाठी पात्रता मिळविली.



अमानत कंबोज

यादवने पुरुषांच्या भालाफेक प्रकारातील 'गट अ' पात्रता फेरीत ६९.८७ मीटर अंतरासह अव्वल स्थान पटकावले. एकूण क्रमवारीत तो दुसऱ्या स्थानावर राहिला; त्याच्या पुढे दक्षिण आफ्रिकेचा जेन-हेंड्रिक हेमन्स असून त्याने 'गट ब' मध्ये ७६.०२ मीटर अंतरासह विजय मिळविला होता. या १९ वर्षीय भारतीय खेळाडूची या हंगामातील सर्वोत्तम कामगिरी ७४.४९ मीटर इतकी आहे, जी त्याची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीही आहे.

७२.५० मीटरची 'ऑटोमॅटिक' पात्रता मर्यादा ओलांडणारा हेमन्स हा एकमेव स्पर्धक ठरला.

धरणीधरनने 'गट ब' पात्रता फेरीत ६८.०७ मीटर अंतरासह पाचवे स्थान मिळविले व एकूण क्रमवारीत १२ वे व अंतिम स्थान पटकावत अंतिम फेरीत प्रवेश केला.

ज्यांनी ७२.५० मीटरची 'ऑटोमॅटिक' पात्रता मर्यादा ओलांडली किंवा जे सर्वोत्तम १२ स्पर्धकांमध्ये होते, त्यांनी शुक्रवारी होणाऱ्या अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली.

भारतीय सुपरस्टार नीरज चोप्रा याच्या नावावर या प्रकारातील जागतिक विक्रम जमा आहे; त्याने २०१६ मध्ये पोलंडमधील बिडगोस्झ येथे झालेल्या चॅम्पियनशिपमध्ये ८६.४८ मीटर अंतरापर्यंत भाला फेकला होता.





आशिष यादव आणि टी. धरणीधरण

महिलांच्या थाळीफेक प्रकारात अमानतने ५२.५८ मीटर अंतरासह या हंगामातील आपली सर्वोत्तम कामगिरी नोंदविली. 'गट अ' पात्रता फेरीत ती सहाव्या स्थानावर राहिली आणि अंतिम फेरीसाठी उपलब्ध असलेल्या १२ व्या व शेवटच्या स्थानावर कब्जा करत तिने अंतिम फेरीत प्रवेश केला.

चीनच्या सु यिक्सिनने दोन्ही पात्रता गटांमध्ये ५८.०६ मीटर अंतरासह अव्वल स्थान मिळवले, तर तिची सहकारी मा चेनी ५७.७२ मीटर अंतरासह दुसऱ्या स्थानावर राहिली. ज्यांनी ५५ मीटरची 'ऑटोमॅटिक' पात्रता मर्यादा ओलांडली किंवा जे सर्वोत्तम १२ स्पर्धकांमध्ये होते, त्यांनी अंतिम फेरीसाठी पात्रता मिळविली.

मोगली वेंकटरामने पुरुषांच्या ८०० मीटर शर्यतीच्या उपांत्य फेरीत धडक मारली, तर याच प्रकारात उविन आनंद पहिल्या फेरीतील शर्यतीनंतर (हीट्स) स्पर्धेतून बाहेर पडला. वेंकटरामने 'हीट ५' मध्ये १ मिनिट ५२.८१ सेकंदांची वेळ नोंदवत तिसरे स्थान मिळविले आणि उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले. आनंदने 'हीट १' मध्ये सातवे आणि एकूण ३० वे स्थान मिळवले; त्याने १:५२.३७ सेकंदांची वेळ नोंदविली. पाचही हीटमधील कामगिरी पाहता, युगांडाच्या शफेक मुरुंगीने सर्वात जलद वेळ नोंदविली; त्याने १:४६.६४ सेकंदांची स्वतःची सर्वोत्तम वेळ गाठली.

प्रत्येक हीटमधील पहिले पाच धावपटू आणि पाचही हीटमधील उर्वरित स्पर्धकांपैकी सर्वात जलद वेळ नोंदवणारे दोन धावपटू उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतात.

भारताचा ४x४०० मीटर मिश्र रिले संघ आपल्या हीटमध्ये ३ मिनिटे २२.८५ सेकंदांच्या वेळेसह चौथ्या स्थानावर राहिल्यामुळे पहिल्याच फेरीत स्पर्धेतून बाहेर पडला. पियुष राज, तहुरा खातून, सय्यद सबीर आणि थिया अरुमुगम या चौघांच्या संघाने तीन हीटमध्ये मिळून एकूण ११ वे स्थान पटकावले.

अमेरिकेने ३:१८.२६ सेकंदांच्या वेळेसह पहिल्या फेरीत अव्वल स्थान मिळवले. तीनही हीटमधील अव्वल तीन संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरतात.

दर दोन वर्षांनी होणाऱ्या या स्पर्धेच्या २०२२ च्या आवृत्तीत, भारताने मिश्र ४x४०० मीटर रिलेमध्ये ३:१७.७६ सेकंदांच्या 'आशियाई २० वर्षांखालील विक्रमी वेळेसह ऐतिहासिक रौप्य पदक जिंकले होते; ही वेळ आजही जागतिक २० वर्षांखालील विक्रमांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकाची सर्वोत्तम वेळ आहे.

(वृत्तसंस्था)

## सिध्दाराम जमादारची राज्य मैदानी स्पर्धेसाठी निवड

**अक्कलकोट, दि. ६ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा असोसिएशनच्या वतीने झालेल्या राज्य निवड स्पर्धेत सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सिद्धाराम भोजण्णा जमादार याने दुहेरी मुकुट संपादिला. त्याने १४ वर्षाखालील वयोगटातून ६0 मीटर धावणे, लांब उडी या दोन्ही स्पर्धेत



जिल्ह्यात पहिला क्रमांक तसेच गोळा फेक स्पर्धेत तिसरे स्थान मिळविले. या कामगिरीवर त्याची २७ ते ३0 ऑगस्ट दरम्यान डेवरण, जि.रत्नागिरी येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. त्यास क्रीडा शिक्षक कुमार जाधव व श्रीशैल किणगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभागप्रमुख रूपाली शहा, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.



## श्री अमोगसिध्द प्रशाला कोरवलीची राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत ४ पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ६ ऑगस्ट-**

हरियाणातील रोहतक येथे झालेल्या १३व्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत श्री अमोगसिद्ध प्रशाला कोरवली येथील विद्यार्थ्यांनी ३ सुवर्ण व एक रौप्य अशी चार पदकांची कमाई केली. याच अमर म्हमाणे, शौर्य पाटील आणि मानव सुतार यांनी आपल्या-आपल्या वजनी गटात दमदार खेळाचे प्रदर्शन करत सुवर्ण पटकावले.

विराज माळगोंडे याने उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर रौप्य संपादिले. या यशाबद्दल खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक रंगसिद्ध कोरे, संतोष बगले आणि हर्षवर्धन पाटील यांचे संस्थेचे चेअरमन राजशेखर जी पाटील, मुख्याध्यापिका वैशाली राजमाने आदींनी अभिनंदन केले.

## तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार;२0 ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करा

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयातर्फे साहसी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार सन २0२५ करिता नामांकने प्रस्ताव इच्छुक साहसी वीरांनी २0 ऑगस्ट २0२६ पर्यंत https://awards.gov.in या ऑनलाईन पोर्टलवर सादर करावेत,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी केले आहे. जमिनीवरील, समुद्रावरील आणि हवाई साहसी उपक्रमांसाठी प्रत्येकी एक पुरस्कार दिला जातो. तसेच, साहसी क्षेत्रातील आजीवन योगदानासाठी एक स्वतंत्र पुरस्कार प्रदान केला जातो.

**पात्रता व अटी याप्रमाणे**

नामांकन सादर करणाऱ्या खेळाडूंची कामगिरी मागील तीन वर्षांमधील (सन २0२३, २0२४ व २0२५) असणे आवश्यक आहे. साहसी उपक्रम हे जमीन, पाणी आणि हवेमधील असावेत. खेळाडूंची कामगिरी अतिशय उत्कृष्ट असणे आवश्यक आहे.



## विराट स्पोर्टस् अकॅडमीच्या १८ खेळाडूंची राज्य मैदानी स्पर्धेसाठी निवड

### जिल्हा स्पर्धेत ३४ पदकांची कमाई : भाजपा क्रीडा प्रकोष्ठतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या अंतर्गत सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनमार्फत आयोजित जिल्हा क्रीडा स्पर्धेत विराट स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी १९ सुवर्ण ७ रौप्य व ८ कांस्य अशी ३४ पदकांची कमाई केली आहे

या कामगिरीवर सुवर्ण व रौप्य पदक विजेत्या १७ खेळाडूंची २६ व २७ ऑगस्ट रोजी रत्नागिरी (डेरवण) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी ही निवड झाली आहे. जिल्हा स्पर्धेतील पदक विजेत्यांचा सत्कार भाजपा क्रीडा प्रकोष्ठतर्फे करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अभय दिवाणजी होते. तर नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, भारतीय जनता पार्टी क्रीडा प्रकोष्ठचे संयोजक यशवंत पाथरूट, व्ही.व्ही.पी. इंजिनिअरिंग कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष जी. के. देशमुख, बिल्डर्स असोसिएशनचे व्हाईस चेअरमन हनुमंत कुलकर्णी, सिनेट सदस्य तथा ज्येष्ठ पत्रकार अजित संगवे, सिद्धेश्वर हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक होरटीकर, विजापूर रोड गणेशोत्सव मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विजय शाबादे, न्यू जॉगर्स फाउंडेशनचे अध्यक्ष दिलीप कदम, उपाध्यक्ष विजय झाकणे, सल्लागार विलास राठोड, विराट स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक सूर्याजी लिंगडे, राष्ट्रीय व्हॉलीबॉल खेळाडू निलेश वरवडकर, उमेश कमलापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. न्यू जॉगर्स फाउंडेशनचे माजी अध्यक्ष संतोष कदम यांनी सूत्रसंचालन तर विराट स्पोर्ट्स अकॅडमीच्या संचालिका भारती लिंगडे यांनी आभार मानले.

**पदक विजेते खेळाडू याप्रमाणे**

मोहम्मद सफा खतीब (१00 मीटर, २00 मीटर सुवर्ण), वसंत वाघमोडे (१00 मीटर रौप्य, लाँग जंप रौप्य), विश्वराज जमादार - गोळाफेक सुवर्ण, थाळीफेक रौप्य), आदित्य साठे (१00 मीटर सुवर्ण), हर्षराज फुले(६00 मीटर रौप्य), यशराज पवार (गोळाफेक सुवर्ण), संकेत खटके (गोळाफेक रौप्य, थाळीफेक कांस्य), अनिकेत चव्हाण (लाँग जंप सुवर्ण, ट्रिपल जंप सुवर्ण), सुप्रिया कोळी (भालाफेक रौप्य), अनुजा पांढरे (थाळीफेक सुवर्ण, गोळाफेक कांस्य), पूजा राठोड (१00 मीटर व २00 मीटर सुवर्ण), स्वरा जाधव ( १00 मीटर सुवर्ण, लाँग जंप सुवर्ण), कीर्ती तोळणूर (१00 मीटर अडथळा शर्यत सुवर्ण, १00 मीटर कांस्य, २00 मीटर कांस्य), काशिनाथ चव्हाण ( लाँग जंप कांस्य), सुधीर कोळकुरे (२00 मीटर कांस्य, ४00 मीटर कांस्य), भक्ती थोरात ( १00 मीटर अडथळा शर्यत सुवर्ण, लाँग जंप रौप्य), सृष्टी लिंगडे - ६0 मीटर सुवर्ण, ८0 मीटर अडथळा शर्यत सुवर्ण), वैष्णवी त्रिमल (भालाफेक कांस्य), संध्या राठोड (१00 मीटर सुवर्ण, लाँग जंप सुवर्ण), विश्वराज गायकवाड (४00 मीटर सुवर्ण).

## शालेय क्रीडा स्पर्धेची ऑनलाईन प्रणाली लवकरात लवकर सुरु करा

### सोलापूर जिल्हा क्रीडा शिक्षक महासंघाची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

शालेय क्रीडा स्पर्धेची ऑनलाईन प्रवेश प्रणाली अद्याप सुरू न झाल्यामुळे स्पर्धांचे वेळापत्रक कोलमडण्याची भीती निर्माण झाली आहे. या प्रश्नाबाबत सोलापूर शहर-जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष दशरथ गुरुव यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात पुणे विभागीय क्रीडा उपसंचालक युवराज नाईक यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली आणि लवकरात लवकर प्रणाली सुरू करण्याची मागणी केली.

ऑगस्ट महिन्याचा पहिला आठवडा संपत आला असतानाही अद्याप प्राथमिक प्रवेशिका भरण्याची प्रक्रिया सुरू झालेली नाही. प्रत्येक शाळेतील क्रीडा शिक्षकांना प्रत्येक खेळाडूची माहिती ऑनलाईन भरण्यासाठी बराच वेळ लागतो. प्राथमिक प्रवेशिका भरल्यानंतर अंतिम ऑनलाईन एन्ट्री आणि त्यानंतर स्पर्धांचे आयोजन कसे करायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्याच्या स्पर्धांच्या तारखा आधीच जाहीर झाल्यामुळे जिल्हा आणि विभाग स्तरावरील स्पर्धांचे नियोजन कसे होणार, असा संभ्रम निर्माण झाला आहे. त्यातच सध्या शाळांमधील क्रीडा शिक्षकांना एस.आर.ए. ची ड्युटी देण्यात आल्याने त्यांच्यावरील कामाचा ताण वाढला आहे. या सर्व बाबींचा विचार करून क्रीडा स्पर्धांच्या नियोजनात अडथळा येऊ नये, यासाठी लवकरात लवकर ऑनलाईन प्रवेश प्रणाली सुरू करावी, अशी मागणी महासंघाच्या वतीने करण्यात आली.

# आमदार आवताडे यांच्या पाठपुराव्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून कौतुक

### पंढरपुरात अपर पोलीस अधीक्षक कार्यालयासाठी केला होता पाठपुरावा

### आरटीओ उपप्रादेशिक कार्यालय व महसूल अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासाठीही हालचाली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.६ ऑगस्ट -**

येथे नवीन अपर पोलीस अधीक्षक कार्यालयास राज्य शासनाने मंजुरी दिल्यानंतर पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार आवताडे यांना पाठविलेल्या पत्रात त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे आणि मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या पुढाकाराचे विशेष कौतुक केले आहे.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रात नमूद केले आहे की, पंढरपूर हे देशभरातील लाखो वारकऱ्यांचे आणि भाविकांचे श्रद्धास्थान आहे. वर्षभर मोठ्या प्रमाणावर भाविक येथे येत असतात. यात्राकाळात वाढणारी गर्दी, वाहतूक व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पंढरपूर येथे अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाची आवश्यकता होती. या सर्व बाबींचा विचार करून राज्य शासनाने हे महत्त्वपूर्ण कार्यालय मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे.

कार्यालयासाठी आमदार समाधान आवताडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दाखविलेली तळमळ आणि प्रयत्न कौतुकास्पद आहेत. या निर्णयामुळे पंढरपूरसह मंगळवेढा, सांगोला, माळशिरस आणि परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम, जलद आणि परिणामकारक पोलीस सेवा उपलब्ध होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

आमदार समाधान आवताडे यांच्या पुढाकारातून पंढरपूर येथे उपप्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालय तसेच महसूल विभागाचे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याची मागणीही शासनाकडे केली आहे. या दोन्ही कार्यालयांबाबत सकारात्मक हालचाली सुरू आहेत. सध्या पंढरपूर, मंगळवेढा तसेच परिसरातील नागरिकांना वाहन नोंदणी, परवाना आदी कामांसाठी सोलापूरला जावे लागते. प्रस्तावित कार्यालयांना मंजुरी मिळाल्यानंतर ही सर्व कामे पंढरपूरमध्येच होणार असल्याने नागरिकांचा वेळ, खर्च आणि गैरसोय कमी होणार आहे.

अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या मंजुरीनंतर आता आरटीओ आणि महसूल अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयांनाही लवकरच मंजुरी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

## महत्वाचे...

### विमा सोसायटी रुग्णालयात दंत चिकित्सा विभागाचे आज उद्घाटन

**सोलापूर, दि.६ ऑगस्ट -**

महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालय, होटगी रोड, सोलापूर येथे नव्याने सुरू केलेल्या दंत चिकित्सा विभागाचे उद्घाटन शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते (व्हर्च्युअल माध्यमातून) होणार आहे. राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचीही उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार गोरे यांची प्रमुख उपस्थिती असेल. खा. प्रणिती शिंदे, खा. ज्योती वाघमारे, आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे तसेच महापौर विनायक कोंड्याल यांचीही प्रमुख उपस्थिती असणार आहे. समारंभास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक तसेच सर्व अधिकार0ी व कर्मचारी वृंद यांनी केले आहे.



### विवेकवर्धिनी येथे कृ.श्री.क्षीरसागर यांना अभिवादन

**पंढरपूर,दि.६ ऑगस्ट -**

श्री. दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे संस्थापक सचिव कृ.श्री. क्षीरसागर यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे प्राचार्य डॉ.यू.आर.मुंढे यांनी केले. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक अनिरुद्ध सालविठ्ठल हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संस्थापक डॉ.बी.पी रोंगे यांनी क्षीरसागर यांचे योगदान कधीच विसरू शकत नसल्याचे सांगितले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.मदन क्षीरसागर, ज्येष्ठ संचालक आप्पासाहेब चोपडे, संचालिका सुनिता मोरे, जवाहर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ.मंदार सोनवणे, उत्तम पाटील, डॉ.सौरभ सोनवणे, प्राचार्य अविनाश कटकधोंड, मुख्याध्यापक एस.व्ही.कांबळे, कारंड, उपप्राचार्य ई.जी.शिंदे, पर्यवेक्षक ए.ए.पवार, एन.टी देवकते, प्रा.तुकाराम मस्के, पर्यवेक्षक सुरेश कट्टे, सिद्धार्थ ढवळे, एम.के क्षीरसागर हे उपस्थित होते. यावेळी सुरेखा कुलकर्णी, व्हि.डी.चौगुले,विक्रम बिस्किटे यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांचाही स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. सूत्रसंचालन एम.यू.जरे व एस.एम.शितोळे यांनी केले. आभार प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊसाहेब जगताप यांनी मानले. कार्यक्रमासाठी विवेक वर्धिनी, दत्त विद्या मंदिर सुस्ते, वाखरी आश्रम शाळा या शाळांचे सर्व पदाधिकारी शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सांगोला महाविद्यालयात स्पार्क भितीपत्रकाचे उद्घाटन

**सांगोला,दि.६ ऑगस्ट-**

सांगोला महाविद्यालयाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून इंग्रजी विभागाच्या स्पार्क या भितीपत्रकाचे उद्घाटन प्रवचनकार ह.भ.प. डॉ. जयवंत बोधले महाराज यांनी केले. यावेळी डॉ.भाग्यश्री पाटील यांनी स्पार्क या भितीपत्रका विषयीची माहिती दिली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, सचिव ॲड. उदय घोंगडे, सहसेक्रेटरी साहेबराव ढेकळे, प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, इंग्रजी विभागप्रमुख प्रा.शामराव नवले उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रा.प्रज्ञा उबाळे, प्रा.सुरेखा गायकवाड, प्रा. निखिल जावीर यांनी सहकार्य केले.

### मंगळवेढ्यात तरुण विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**मंगळवेढा दि. ६ ऑगस्ट -**

शहरातील शनिवार पेठेत राहणाऱ्या एका २६ वर्षीय विवाहित तरुणीने अज्ञात कारणावरुन स्वयंपाक खोलीत ओढणीने गळफास घेवून आत्महत्या केली. या घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या मातिहीनूसार मयत विवाहितेचे दीर महेश यादव यांनी याबाबत खबर दिली. त्यांची वहिनी शितल यादव (वय २६) हिने अज्ञात कारणावरुन स्वयंपाक खोलीत ओढणीने गळफास घेवून आत्महत्या केल्याचे सांगितले. प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.




## निधन वृत्त...

### छबुबाई शिवपुजे

**मंगळवेढा, दि. ६ ऑगस्ट-**



मूढवी येथील छबुबाई दत्तात्रय शिवपुजे यांचे बुधवार दि.५ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्या ८५ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे बॉयलर विभागातील कर्मचारी येसाप्पा दत्तात्रय शिवपुजे यांच्या त्या मातोश्री होत.

---

# शेतकरी कर्जमुक्तीचा पंढरपूर तालुक्यात ३ हजार २२४ शेतकऱ्यांना लाभ

### सहायक निबंधक तेलंगरे यांची माहिती; योजनेचा पहिला टप्पा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ ऑगस्ट -**

राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर केली. योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात पंढरपूर तालुक्यातील ९७ गावातील ३ हजार २२४ पात्र थकबाकीदार लाभार्थी शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळाला असल्याची माहिती सहायक निबंधक सुनील तेलंगरे यांनी दिली.

राज्य शासनाने या योजनेद्वारे थकीत पीककर्ज असलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्याचा निर्णय घेतला आहे. पंढरपूर तालुक्यात बँक ऑफ इंडिया ६९२, महाराष्ट्र ग्रामीण बँक ५८१, बँक ऑफ महाराष्ट्र ५५८, युनियन बँक ऑफ इंडिया ५०८, बँक ऑफ बडोदा १६९, स्टेट बँक ऑफ इंडिया १०९, सेंट्रल बँक ऑफ इंडिया ०२ आदी राष्ट्रीयकृत तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ६०५ या बँकांद्वारे कर्ज घेतलेल्या पात्र ३ हजार २२४ शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ पात्र शेतकऱ्याची पहिली यादी जाहीर झाली आहे. पंढरपूर तालुक्यातील ९७ गावातील ३ हजार २२४ पात्र शेतकऱ्यांची गावपातळीवर यादी प्रसिद्ध झाली आहे. लाभार्थी शेतकऱ्यांनी ई केवायसीसाठी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करून घ्यावे. केंद्रावर कोणतेही शुल्क न देता विनामूल्य माहिती भरून पात्र शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक निबंधक सुनील तेलंगरे यांनी केले आहे.

विशिष्ठ क्रमांकाचे यादीत नाव आलेल्या शेतक-यांना त्यांचे कर्ज खात्याबाबत तक्रार असल्यास त्यांना योजनेच्या पोर्टलवर ऑनलाईन तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध केल्याचेही तेलंगरे यांनी सांगितले.

---

# जटिल हृदयविकारांवर ‘इंट्राव्हॅस्क्युलर लिथोट्रिप्सी’ उपचारपध्दती ठरतेय वरदान

### हृदयरोग तज्ज्ञ डॉ. प्रदीप देवकते यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ६ ऑगस्ट-**

हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये कॅल्शियमचे कठीण आवरण तयार झाल्यामुळे अनेक रुग्णांमध्ये अँजिओप्लास्टी करताना स्टेंट बसविणे अवघड ठरते. अशा जटिल रुग्णांसाठी इंट्राव्हॅस्क्युलर लिथोट्रिप्सी (आयव्हीएल) ही अत्याधुनिक उपचारपद्धती प्रभावी ठरत असल्याची माहिती सांगोल्यातील हृदयरोग तज्ज्ञ डॉ.प्रदीप देवकते यांनी दिली.



आयव्हीएलमुळे रुग्णांना अधिक सुरक्षित आणि चांगले परिणाम मिळत आहेत. जटिल हृदयविकारांवर 'इंट्राव्हॅस्क्युलर लिथोट्रिप्सी' उपचारपद्धती रुग्णासाठी वरदान ठरत आहे. वाढते वय, मधुमेह आणि उच्च रक्तदाबामुळे रक्तवाहिन्यांमध्ये कॅल्शियमचे थर साचतात. त्यामुळे स्टेंट योग्य प्रकारे बसविण्यात अडचणी येतात. आयव्हीएल तंत्रज्ञानामध्ये विशेष धक्कातरंगांच्या सहाय्याने कॅल्शियममध्ये सुक्ष्म भेगा निर्माण करतात. परिणामी रक्तवाहिनी अधिक लवचिक बनते आणि स्टेंट योग्य प्रकारे बसवता येतो. या उपचारपद्धतीमुळे रक्तवाहिनीला कमी इजा होते. उपचार अधिक सुरक्षित होतात आणि दीर्घकालीन परिणामही समाधानकारक मिळतात, असेही डॉ.प्रदीप देवकते यांनी सांगितले.



---

# शिवरत्न नाव बदलास विरोध; चार दशकांची ओळख कायम ठेवण्याची शरद पवार राष्ट्रवादीची मागणी

### जिल्हा परिषद सभागृहाच्या नामांतरावरून वाद; सीईओंना निवेदन

### नव्या वास्तूला वाजपेयींचे नाव देण्याचा पर्याय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ ऑगस्ट -**



सोलापूर जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहाचे नामांतर करण्याच्या प्रस्तावावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. चार दशकांपासून अस्तित्वात असलेले शिवरत्न हे नाव कायम ठेवण्यात यावे, अशी ठाम मागणी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्याकडे केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, जिल्हा परिषदेच्या सभागृहाला सुमारे ४० वर्षांपूर्वी शिवरत्न हे नाव दिले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मरणार्थ ठेवलेले हे नाव जिल्ह्याच्या इतिहासाशी आणि जनभावनांशी जोडले गेले आहे. त्याचे नामांतर करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे हा निर्णय तातडीने मागे घेऊन शिवरत्न हे नाव पूर्ववत कायम ठेवावे, अशी मागणी केली आहे. निवेदनानुसार, शिवरत्न सभागृहाचे नाव बदलून भारतरत्न माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव देण्याचा ठराव केला आहे.

मात्र, अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्याबाबत कोणताही विरोध नाही. त्यांच्या नावाने नवीन सभागृह किंवा अन्य सार्वजनिक वास्तू उभारून त्यास त्यांचे नाव द्यावे, अशी भूमिका मांडली आहे. एका ऐतिहासिक आणि जनमानसात रुजलेल्या नावाचे नामांतराऐवजी दोन्ही महापुरुषांचा सन्मान राखणारा निर्णय घ्यावा, असे निवेदनात नमूद आहे. नामांतराच्या मुद्द्यावरून जिल्हा परिषदेच्या निर्णयाविरोधात स्थानिक पातळीवर प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, दक्षिण सोलापूर कार्याध्यक्ष प्रशांत गायकवाड, जनरल सेक्रेटरी चंद्रकांत पवार, उपाध्यक्ष प्रवीण इरत शेट्टी, विद्यार्थी संघटनेचे शहराध्यक्ष पद्मसिंह शिंदे, सामाजिक न्याय विभागाचे शहराध्यक्ष अजित पात्रे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

---

# मारापूर येथील दूध डेअरीवर अन्न भेसळ विभागाचा छापा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. ६ ऑगस्ट -**

मारापूर येथील नेचर दूध डेअरीवर सोलापूरच्या अन्नभेसळ प्रशासनाने छापा टाकला आहे. याबाबत अज्ञात व्यक्तीने तक्रार केली होती, अशी माहिती अन्न सुरक्षा विभागाचे गणेश कदम यांनी दिली.

मारापूर येथे संतोष माने यांची नेचर दूध डेअरी आहे. दूधापासून दही, ताक, लस्सी व अन्य पदार्थ तयार करुन याची विक्री केली जात असे. हे पदार्थ मुदतबाह्य झाल्याची तक्रार एका अज्ञात व्यक्तीने सोलापूर अन्न भेसळ विभागाकडे केली होती. दरम्यान राज्याचे अन्न भेसळचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूरचे अन्न भेसळचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई व मंगळवेढा विभागाचे अन्न भेसळचे गणेश कदम यांनी मारापूर येथे जावून अचानक धाड टाकली. सर्व मुदतबाह्य पदार्थ जप्त केल्याचे सांगण्यात आले. पुढील कारवाईसाठी वरिष्ठाकडे अहवाल सादर केल्याचे कदम यांनी प्रसार माध्यमांना सांगून नेमका मुद्देमाल किती जप्त केला याबाबत सांगण्यास टाळाटाळ केली. परिणामी नेमका किती किंमतीचा मुद्देमाल जप्त झाला हे कळू शकले नाही. त्यामुळे या कारवाईवरच नागरिकामधून संशय व्यक्त होत आहे. दरम्यान अन्न भेसळ पुरवठा विभागाचे या पुढे लक्ष मंगळवेढा शहर व ग्रामीण भागातील जर्सी गायीचे दूध म्हशीच्या दुधात व इतर पदार्थ भेसळ करणाऱ्यावर राहणार असल्याचे संकेत आहेत.




---

# नियोजन समिती सदस्य निवडीची अद्यापही प्रतिक्षाच

### इच्छुकांचे देव पाण्यात; ४० पदांसाठी अनेक इच्छुक

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि. ६ ऑगस्ट -**

महाराष्ट्रात सध्या महायुतीचे सरकार आहे. सोलापूर जिल्ह्यातही सर्वत्र जिल्हा परिषद, महानगरपालिकेत भाजपची सत्ता आहे. पालकमंत्री म्हणुन जयकुमार गोरे यांनी पदभार स्वीकारुन दीड वर्षाचा कालावधी झाला आहे. मात्र अद्यापही जिल्हा नियोजन समिती सदस्यांच्या निवडीची प्रतिक्षाच करावी लागत आहे. मात्र त्यामुळे कित्येक दिवसांपासून आपल्या वर्णीसाठी देव पाण्यात ठेवून बसलेल्या इच्छुकांचा मोठा हिरमोड होत आहे.

जिल्ह्यात इतर सर्व निवडणुका झाल्या आहेत. फक्त आता निवडणुकीत संधी न मिळालेल्या कार्यकर्ते तसेच तिन्ही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आपली सोलापूर जिल्हा नियोजन समितीवर सदस्य म्हणून काम करण्याची वर्णी लागावी अशी अपेक्षा आहे. यासाठी ते आपल्या गॉडफादरमार्फत फिल्डिंग लावून आहेत. पण निवडी कधी होणार हे निश्चित नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विकास कामे व्हावीत म्हणून या निवडी केल्या जातात. सोलापूर जिल्ह्यात ६८ जिल्हा परिषद समस्यांमधून २७ सदस्याची निवड केली जाते. महानगरपालिकेतील १०२ नगरसेवकांमधून ९ सदस्यांची निवड केली जाते. ४ सदस्य नगरपालिका क्षेत्रातून अशा एकुण ४० सदस्यांची निवड केली जाते.

जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष पालकमंत्री तर सचिव जिल्हाधिकारी असतात. खासदार, आमदार विशेष निमंत्रित सदस्य असतात. पालकमंत्री हे ११ सदस्यांची शिफारस करतात. नियोजन समितीचा अनुभव असणाऱ्या १५ सदस्यांची नियुक्ती या समितीत केली जाते. या समितीत सोलापूर, माढा, धाराशिव या ३ खासदारांचा, जिल्ह्यातील ११ आमदारांचा या समितीत समावेश आहे. निमंत्रित सदस्यांना सभागृहात विविध विकास कामावर तसेच झालेला खर्चावर चर्चा करता येते. निवडून आलेल्या सदस्यांना (४०) मतदानाचा हक्क असतो. सध्या महाराष्ट्रात महायुतीचे म्हणजे तीन पक्षाचे सरकार आहे. यामुळेच जिल्हा नियोजन समितीवर तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना संधी देणे अपेक्षित आहे. जिल्हा परिषदेवर भाजपची सत्ता आहे. महानगरपालिकेवरही भाजपचीच सत्ता आहे. जिल्ह्यातील जवळपास एक पंचायत समिती वगळता सर्व ठिकाणी सत्ता आहे. यामुळेच सध्या जिल्हा नियोजन समितीवर भाजपला झुकते माप असणार हे नक्की आहे. भाजपमधील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना तशीच अपेक्षा आहे. पण सध्या या रखडलेल्या निवडी कधी होणार याकडे लक्ष लागले आहे.

---

# रविवारी अण्णाभाऊ साठे जयंती मिरवणूक; सोलापूर शहरातील वाहतूक मार्गात बदल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट -**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रविवारी (दि.९) ऑगस्ट रोजी सांगता मिरवणूक काढण्यात येणार आहे. मिरवणूकीच्या अनुषंगाने सोलापूर शहरातील वाहतूक मार्गात बदल केला आहे. पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी हे आदेश जारी केले आहेत.

वाहतूक बदल मार्ग - अण्णाभाऊ साठे चौक, रामलाल चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चार हुतात्मा पुतळा, सरस्वी चौक, मॅकेनिकी चौक, छ. शिवाजी महाराज चौक ते ॲम्बेसिडर हॉटेल या मार्गावरील वाहतूक सकाळी दहा ते रात्री अकरा पर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. विजापूर रोड, होटगी रोडवरुन येणारी व मंगळवेढा, पुणे रोडवर जाणारी वाहने पत्रकार भवन, महावीर चौक, गुरुनानक चौक, अशोक चौक, अक्कलकोट नाका, बोरामणी नाका, मार्केट यार्ड, शेळगी ब्रिज, रुपाभवानी ब्रिज मार्गे पुणे नाका येथून हव्या त्या मार्गावर जातील. पुण्याहून येणारी वाहने याच मार्गाने विजापूर व होटगी रोडवर जातील. रेल्वे स्टेशनकडून बसस्थानकाकडे जाणारी वाहने सात रस्ता, रंगभवन, विजापूर वेस, समाचार चौक, कोंतम चौक, बलिदान चौक येथून हव्या त्या ठिकाणी जातील तसेच पुणे नाक्याहून रेल्वे स्टेशनकडे जाणारी वाहने याच मार्गाने रेल्वे स्टेशनकडे जातील.

### शहरात २२ ऑगस्टपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश

सोलापूर - कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक शांतता टिकवण्यासाठी पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील यांनी सोलापूर शहरात ८ ऑगस्टच्या रात्री १२ पासून २२ ऑगस्टच्या रात्री १२ पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ नुसार जमावबंदी व शस्त्रबंदीचे प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. हत्यारे, तलवारी, सुरे, लाठ्या किंवा स्फोटक पदार्थ बाळगण्यास सक्त मनाई केली आहे. सार्वजनिक ठिकाणी पाचपेक्षा जास्त जणांना एकत्र जमण्यास किंवा संचलनास बंदी असणार आहे. विनापरवानगी सभा घेणे, घोषणा देणे किंवा मोठ्या आवाजात वाद्ये वाजवण्यावर बंदी असेल. विवाह सोहळे, अंत्यसंस्कार, कायदेशीर व अधिकृत शासकीय सभांना या नियमांमधून सूट दिली आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने गुणवंत पाल्यांचा करण्यात आला गौरव

**सोलापूर, दि.६ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने गुणवंत पाल्यांचा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. मार्च २०२६ मध्ये झालेल्या दहावी व बारावीच्या परीक्षेत ७५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या सभासदांच्या पाल्यांचा रोख पारितोषिक, प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, पुस्तक आणि फाईल देऊन गौरव करण्यात आला. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी व्ही.डी. नवले, श्रीशैल देशमुख, दयानंद परिचारक, शेतांबरी राऊत, श्रीधर कलशेट्टी, डॉ.एस.पी. माने, एस.आर. तांबोळी, एस.एन. कुंभार, विशाल घोगरे, चेतन वाघमारे, शिवानंद म्हमाणे, किरण लालबोन्द्रे, विष्णू पाटील, एम.एस. शिंदे, रोहित घुले, व्ही.एम. घेरडे, शिवाजी राठोड, जी.एम. मारडकर, तजमूल मुतवल्ली, विकास शिंदे, डॉ.पी.बी. नवले, के.एन. खुर्द आदी उपस्थित होते.



### पद्मशाली समाज सेवानिवृत्त संघाला महापालिकेकडून हॉल : महापौर कोंड्याल

**सोलापूर, दि.६ ऑगस्ट-**

पद्मशाली समाज सेवानिवृत्त संघाच्या वतीने ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्र, वधू-वर सूचक केंद्र हा उपक्रम राबविण्यात येते. त्यास सोलापूरसह राज्य-परराज्यातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. ही बाब लक्षात घेता, सोलापूर महापालिकेकडून जुना विडी घरकुल भागातील हॉल उपलब्ध करुन दिली जाणार आहे, अशी ग्वाही महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली. पद्मशाली समाज सेवानिवृत्त संघाच्या चार वर्षांच्या सामाजिक कार्याच्या अहवाल प्रकाशन सम रंभात ते बोलत होते. यावेळी नगरसेवक प्रथमेश कोठे, डॉ.अजय पोन्नम, सत्यनारायण गुर्रम, यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, पद्मशाली शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष काशिनाथ गड्डम यांची प्रमुख उपस्थिती होती. अनिल कन्ना यांनी प्रास्ताविक केले. यशवंत इंदापुरे यांनी आभार मानले. यावेळी श्रीहरी कुरापाटी, सुरेश श्रीराम, सत्यनारायण बरदेपूर, उमापती मिठ्ठापल्ली, अंबादास इंदापुरे, श्रीनिवास वल्लाकाटी, अनिलकुमार जन्यारम, संगीता इंदापुरे, अरुणा कन्ना, वरलक्ष्मी गोटीपामूल, प्रमिला वडीशेरला, सुरेखा गोली, नागनाथ संभारम, नागनाथ वड्डेपल्ली, शाम बेनगिरी, वैकुंठम जडल, लक्ष्मीकांत दंडी, विजयकुमार चाटला उपस्थित होते.



### डॉ.आंबेडकर ट्रेड युनियनतर्फे मनपा कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन

**सोलापूर, दि.६ ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल यांच्याकडे देण्यात आले. बदली रोजंदारीवरील २४९ कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. मनपा कर्मचाऱ्यांसाठी मंजूर झालेली कॅशलेस मेडिकल इन्शुरन्स योजना कार्यान्वित करावी, मनपा कर्मचाऱ्यांनाही शासनाप्रमाणे ५८ टक्के महागाई भत्ता लागू करावा. बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात दरमहा २०० रुपयांची वाढ करावी. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची अर्जित रजेची थकीत रक्कम अदा करणे, सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम देणे, घनकचरा विभागातील १५ बडतर्फ कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत सामावून घ्यावे. यावेळी सभागृह नेते नरेंद्र काळे, माजी उपमहापौर पद्माकर काळे, ट्रेड युनियनचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले, माऊली पवार, श्रीनिवास रामगल, इक्बाल तडकल, अरुण मेहेत्रे, दिनेश बनसोडे, बिभीषण गायकवाड आदी उपस्थित होते.

### शिवसेना 'उबाठा'प्रणित युवा सेनेच्या उपजिल्हाप्रमुखपदी विजय गायकवाड

**मोहोळ, दि.६ ऑगस्ट-**



शिवसेना 'उबाठा'प्रणित युवा सेनेच्या उपजिल्हाप्रमुखपदी मोहोळ येथील विजय गायकवाड यांची निवड करण्यात आली. येथील शिवसेना उबाठा गटाचे ज्येष्ठ नेते तथा माजी जिल्हाप्रमुख दीपक गायकवाड यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जाणारे व सर्वसामान्य कुटुंबात पुढे आलेले युवा नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. रक्तदान शिबीर, पाणपोई, दिवाळीत फराळाचे वाटप यांसारखे उपक्रम राबवित असतात.

# निवृत्त बँक अधिकाऱ्याची सव्वादोन कोटींची फसवणूक

### शेअर मार्केट ऑनलाईन जाहिरातीच्या आमिषाला बळी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ६ ऑगस्ट-**

फेसबुकवरील शेअर मार्केट गुंतवणुकीच्या आकर्षक जाहिरातीला भुलून बार्शीतील एका ६३ वर्षीय निवृत्त बँक कर्मचाऱ्याची तब्बल २ कोटी १४ लाख ९५ हजार ५७६ रुपये २० पैशांची ऑनलाइन फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात या प्रकरणात राधे एन्टरप्रायझेस, बी.व्ही. ट्रेडर्स, स्वास्तीक एन्टरप्रायजेस, एस.व्ही.बी. एन्टरप्रायजेस, अनुष्का शिक्षण प्रसारक मंडळ, रेणुदार सर्व्हिसेस आणि शिवाशिव कन्स्ट्रक्शन यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला.

याबाबत मोहन जगन्नाथ गायकवाड (रा. कसबा पेठ, एकविराई मंदिराजवळ, बार्शी) यांनी फिर्याद दिली. जानेवारी २०२६ मध्ये फ सबुक पाहत असताना त्यांना ''२७'' या नावाची शेअर मार्केटसंदर्भातील जाहिरात दिसली. त्यावर क्लिक केल्यानंतर त्यांना ग्रुपमध्ये जोडण्यात आले. त्यानंतर कंपनीचे प्रतिनिधी सांगणाऱ्या व्यक्तींनी संपर्क साधून दररोज ५ ते २५ टक्के परतावा मिळण्याचे आमिष दाखवत डाउनलोड करण्यास सांगितले. तसेच केवायसी प्रक्रिया पूर्ण करुन त्यांचे ट्रेडिंग खाते सुरु करण्यात आले.




सुरुवातीला अल्प रक्कम गुंतविल्यानंतर ॲपवर नफा दिसू लागला. काही वेळा त्यांनी काढलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा झाल्याने त्यांचा विश्वास अधिक दृढ झाला. त्यानंतर संबंधितांनी सातत्याने फोन करुन अधिक गुंतवणूक करण्यासाठी दबाव टाकला. त्यानुसार फिर्यादी यांनी जानेवारी ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विविध कंपन्यांच्या नावाने देण्यात आलेल्या बँक खात्यांमध्ये आरटीजीएस व यूपीआयद्वारे एकूण २ कोटी १४ लाख ९५ हजार ५७६ रुपये जमा केले.

काही दिवसांनी ॲपवरील शिल्लक व नफा मोठ्या प्रम णात दिसत असतानाही प्रत्यक्ष पैसे काढता आले नाहीत. संबंधित व्यक्तींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचे सर्व मोबाईल क्रमांक बंद असल्याचे आढळले. हे ॲपही मोबाईलमधून आपोआप हटविले गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर आपली ऑनलाइन फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

## बाईक टॅक्सीविरोधात वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचा राज्यव्यापी एल्गार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**



ओला, उबर, रॅपिडो यांसारख्या खासगी ॲपबरोबरच भारत सरकारच्या भारत टॅक्सी ॲपमध्ये बाईक टॅक्सीला दिलेल्या परवानगीचा तीव्र निषेधार्थ वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या वतीने राज्यव्यापी एल्गार पुकारण्यात आला होता. प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांच्या नेतृत्वाखाली सोल-ापूरसह जळगाव, नागपूर, सांगली, कोल्हापूर, लातूर, ठाणे, कल्याण, सातारा, पुणे, नांदेड, धाराशिव आणि संभाजीनगर या जिल्ह्यांम ध्ये एकाच दिवशी, एकाच वेळी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. महाराष्ट्रातील लाखो रिक्षा व टॅक्सी चालकांच्या रोजगारावर परिणाम होणार असून, शासनाने २०१७ पासून खुले रिक्षा परवाने देऊन व्यवसायात आणलेल्या आणि लाखो रुपयांचे कर्ज घेऊन रिक्षा खरेदी केलेल्या युवकांचे भवितव्य धोक्यात येणार आहे. खासगी व सरकारी सर्व ॲपमधील बाईक टॅक्सी सेवा तात्काळ बंद करण्यात यावी. रिक्षा व टॅक्सी चालकांच्या रोजग-ाराचे संरक्षण करणारे ठोस धोरण जाहीर करण्यात यावी, असेही या निवेदनात म्हटले आहे.

## स्थगिती निर्णयानंतरही होटगी रोडवरील सिमेंट रस्त्याचे काम सुरुच

**महापालिकेचा आदेश एमएसआरडीसीपर्यंत पोहोचला नाही**

**संभ्रमावस्थेमुळे वरिष्ठांच्या निर्णयाकडे लागले लक्ष**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ ऑगस्ट-**

होटगी रोडवरील महिला हॉस्पिटल ते साखर कारखाना या हमरस्त्यावरील सिमेंट काँक्रीटीकरणाच्या कामाबाबत महापालिकेच्या स्थगितीच्या निर्णयानंतरही प्रत्यक्षात पूरक कामे सुरुच आहे. महापालिकेने काम थांबविण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा केली असली तरी त्याबाबतचा अधिकृत लेखी आदेश महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) कडे अद्याप पोहोचलेला नसल्याची माहिती समोर आली आहे.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता होईपर्यंत काम स्थगित ठेवण्याचे निर्दे श दिले होते. मात्र, लेखी आदेश न मिळाल्याने मुख्य काँक्रीटीकरणाचे काम थांबविण्यात आले असले तरी इतर पूरक कामे सुरू असल्याचे दिसून आले.

महापालिका आणि एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करून रस्त्याखालील ड्रेनेज चेंबर्सची तपासणी केली. नव्या जलवाहिनीसाठी आवश्यक तांत्रिक पडताळणी तसेच रस्त्याच्या नव्या पातळीनुसार चेंबर्सची उंची समायोजित करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. महापालिकेचा निर्णय आणि प्रत्यक्ष सुरू असलेली कामे यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

#### वरिष्ठांच्या निर्णयानंतर पुढील दिशा

एमएसआरडीसीचे अधीक्षक अभियंता उमेश झगडे यांनी सांगितले की, आज आम्ही सोलापूर व सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर असल्याने सोलापूरमधील काम ाची सद्यस्थिती सांगता येणार नाही. महापालिकेने काम थांबविण्याचे आदेश दिल्याची माहिती मिळाली आहे. म ात्र त्याचा अहवाल वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात येईल. त्यानंतर वरिष्ठ अधिकारी जो निर्णय घेतील, त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

## पवित्र पोर्टल शिक्षक भरतीला ब्रेक; वर्ष उलटले तरी प्रक्रिया ठप्प

**सोलापुरातील २४ हजार तर राज्यातील १ लाख ७५ हजार पात्र उमेदवार प्रतीक्षेत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ ऑगस्ट-**

राज्यातील पवित्र पोर्टल शिक्षक भरती प्रक्रियेला तब्बल वर्ष उलटूनही जाहिरात आणि प्राधान्यक्रम प्रक्रिया सुरू न झाल्याने हजारो पात्र उमेदवारांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील जवळपास २४ हजार, तर राज्यभरातील सुमारे पावणे दोन लाख पात्र उमेदवार शिक्षक भरतीच्या प्रतीक्षेत असून, शासनाने तातडीने भरती प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.



शिक्षक भरतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप केला आहे. राज्य परीक्षा परिषदेकडूनही प्रक्रियेबाबत स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने उमेदवारांमध्ये संभ्रम वाढत आहे. त्यामुळे मंत्रालय स्तरावर संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन शिक्षक भरतीची जाहिरात प्रसिद्ध करणे आणि पवित्र पोर्टलवरील प्राधान्यक्रम प्रक्रिया तातडीने सुरू करण्यासाठी संघटनांकडून पाठपुरावा सुरू असल्याचे सांगण्यात आले.

राज्यात अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने अध्यापनावर परिणाम होत आहे. दुसरीकडे पात्र उमेदवार रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. या दोन्ही समस्यांवर एकाचवेळी उपाय म्हणून भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करणे आवश्यक असल्याचे उमेदवारांचे म्हणणे आहे. पवित्र पोर्टलवर शिक्षक भरतीच्या जाहिराती त्वरित प्रसिद्ध करून उमेदवारांना शाळा निवडीसाठी (प्राधान्यक्रम) टॅब उपलब्ध करून द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. दीर्घकाळ सुरू असलेल्या विलंबामुळे उम ेदवारांमध्ये अस्वस्थता वाढत असून, लवकरच सकारात्मक निर्णय न झाल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशाराही संघटनांकडून देण्यात आला आहे. दरम्यान, राज्यात शिक्षकांची हजारो पदे रिक्त असताना भरती प्रक्रिया रखडणे ही दुर्दैवी बाब आहे. एका बाजूला शाळांमध्ये शिक्षकांचा तुटवडा आहे, तर दुसऱ्या बाजूला पात्र उमेदवार रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. शासनाने शिक्षक भरतीची जाहिरात आणि प्राधान्यक्रम प्रक्रिया तातडीने सुरू करून गुणवत्ताधारक उमेदवारांना न्याय द्यावा, असे युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटना तथा पवित्र पोर्टल शिक्षक भरतीचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले.

## सीसीएमपीला पात्र बीएचएमएस डॉक्टरांची एमएमसीमध्ये नोंदणी थांबवा

**इंडियन मेडिकल असोसिएशनची मागणी**

**शासनाच्या धोरणाचा केला निषेध**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ ऑगस्ट-**

सीसीएमपीला पात्र असलेल्या बीएचएमएस डॉक्टरांची एमएमसीम ध्ये नोंदणी थांबवा, अशी मागणी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) सोलापूर शाखेचे अध्यक्ष डॉ. संजय मंठाळे यांनी पत्रकार परिषदेत केली.




आमच्या संघटनेच्या म ागणीसंदर्भात सध्या डॉक्टरांचा संप सुरू आहे. आयएमए संघटनेचे सोलापूर शहरात ९५० सभासद असून या डॉक्टर्सपैकी ९० टक्के ओपीडी बंद ठेवलेली आहे तसेच २२० हॉस्पीटलमध्ये कामबंद असून तातडीची सेवा मात्र सुरळीत आहे. सीसीएमपीला पात्र असलेल्या बीएचएमएस डॉक्टरांची एमएमसीम ध्ये नोंदणी करून संपूर्ण एमबीबीएस शिक्षण व प्रशिक्षणाशिवाय आधुनिक वैद्यक करण्यास परवानगी देण्याच्या प्रस्तावाबाबत आमची तीव्र चिंता व्यक्त करण्यासाठी भूमिका मांडत आहोत.

आमच्या प्रमुख चिंता पुढीलप्रमाणे आहेत. एक वर्षाचा सीसीएमपी अभ्यासक्रम एमबीबीएस डॉक्टरांना दिल्या जाणाऱ्या सर्वसमावेशक वैज्ञानिक व क्लिनिकल प्रशिक्षणाची जागा घेऊ शकत नाही. संपूर्ण एमबीबीएस प्रशिक्षणाशिवाय आधुनिक वैद्यकाची परवानगी दिल्यास पुराव्यावर आधारित वैद्यकीय सेवेचा दर्जा व विश्वासार्हता कमी होईल. एमएम सी नोंदणीमुळे सीसीएमपी पात्रता असलेले बीएचएमएस डॉक्टर हे एमबीबीएस डॉक्टरांप्रमाणेच पात्र असल्याचा गैरसमज जनतेमध्ये निर्माण होऊ शकतो. हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. हा विषय सध्या मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असून अंतिम निर्णय होईपर्यंत कोणतीही अंमलबजावणी करू नये. बीएचएमएस डॉक्टरांची नोंदणी आधीच महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेत आहे. त्यामुळे एमएमसीमध्ये दुहेरी नोंदणीची आवश्यकता नाही, असे डॉ.मंठाळे म्हणाले. वैद्यकीय क्षेत्राने व्यक्त केलेल्या गंभीर आक्षेपांची तातडीने दखल घ्यावी, आमचे निवेदन निवेदन मुख्यमंत्री तसेच संबंधित विभागांकडे तातडीने पाठवावे, मुंबई उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत सीसीएमपी पात्रता असलेल्या बीएचएमएस डॉक्टरांची एमएमसीमध्ये नोंदणी स्थगित ठेवावी, या संघटनेच्या मागण्या आहेत.

## जिल्ह्यातील महत्वाच्या प्रकल्पांचा अजेंडा तयार : जिल्हाधिकारी

**उजनी जलपर्यटन, आयटी पार्क, धार्मिक पर्यटन आदींसह इतर प्रकल्पांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**



जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी उजनी धरणाचे प्रदूषणमुक्ती अभियान, अत्याधुनिक आयटी पार्क, धार्मिक पर्यटन सर्किट, विमानसेवेचा विस्तार, उड्डाणपूल आणि गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी 'व्हाय सोलापूर?' या ब्रँडची उभारणी अशा महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा रोड मॅप तयार असून, हे सर्व प्रकल्प मि शन मोडवर राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित वार्तालाप कार्यक्रमात ते पत्रकारांशी संवाद साधत होते. यावेळी विचारमंचावर जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, पत्रकार प्रमोद बोडके, सागर सुरवसे, अविनाश गायकवाड, किरण बनसोडे यांच्यासह इतर पत्रकार बांधव उपस्थित होते. उजनी धरणातील वाढते प्रदूषण ही गंभीर समस्या असून, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्याबरोबरच धरणातील पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना केल्या जातील. कॅश फिश व सकर फिशसारख्या आक्रमक माशांच्या जातींवर नियंत्रण ठेवून देशी माशांच्या संवर्धनालाही प्राधान्य दिले जाणार आहे. सोलापूर जिल्ह्यात धार्मिक पर्यटनाच्या विकासासाठी मोठी क्षमता असून, अक्कलकोट, पंढरपूर, बार्शीसह विविध तीर्थक्षेत्रांना जोडणारे 'रिलिजियस टुरिझम सर्किट' विकसित करण्याचा आराखडा तयार केला जात आहे. यामुळे पर्यटनासोबत स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आयटी पार्कबाबत बोलताना ते म्हणाले, होटगी परिसरातील जागा आयटी पार्कसाठी उपलब्ध झाली असून एम आयडीसीमार्फत सर्व पायाभूत सुविधा उभारून कंपन्यांना तयार इमारती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. सोलापूरकडे जमीन, वीज, पाणी आणि प्रशिक्षित मनुष्यबळ ही उद्योगांसाठी आवश्यक चारही बलस्थाने असल्याने आयटी उद्योगांसाठी शहर स्पर्धात्मक ठरू शकते, असे त्यांनी सांगितले. गुंतवणूक वाढविण्यासाठी केवळ सुविधा पुरेशा नसून सोलापूरचे प्रभावी ब्रँडिंग आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी 'व्हाय सोलापूर?' ही स्वतंत्र गुंतवणूक प्रोत्साहन मोहीम राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. यासाठी विशेष इन्व्हेस्टमेंट प्रमोशन कंपनीची मदत घेऊन देशातील विविध औद्योगिक केंद्रांमध्ये सोलापूरची क्षमता मांडली जाणार आहे.

होटगी रोड विमानतळावर नाईट लँडिंगसाठी काही तांत्रिक अडथळे असले तरी बोरामणी विमानतळ प्रकल्पासाठी प्रयत्न सुरू आहेत. सुमारे ४०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पातून भविष्यात नाईट लँडिंगसह विमानसेवा सुरू होऊ शकते. तसेच शहरातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन मार्गे बाजार समिती-हैदराबाद रोडपर्यंत उड्डाणपूल उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असून, भूसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. पंढरपूर कॉरिडॉरसाठी राज्य शासनाने मंजुरी दिली असून भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

#### वारी ही प्रशासनाची अग्निपरीक्षा

पंढरपूरची आषाढी वारी ही कुंभमेळ्यानंतर जगातील सर्वात मोठी धार्मिक म ानवी गर्दी असलेली यात्रा असून, यंदा सुमारे ३२ लाख भाविकांनी सहभाग घेतला. एवढी मोठी गर्दी अल्प कालावधीत हाताळणे ही प्रशासनासाठी मोठी अग्निपरीक्षा असते. वारीच्या नियोजनात सोलापूर आणि पंढरपूरमधील पत्रकारांनी दिलेले सहकार्य मोलाचे ठरल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष व्हॉट्सप यंत्रणा तयार करण्यात आली होती. वारीचे यश हे कोणत्याही एका व्यक्तीचे नसून संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले. वारीच्या शेवटच्या टप्प्यात अनेक वारकऱ्यांनी स्वतःहून थांबून यंदाच्या व्यवस्थापनाचे कौतुक केले. वारकऱ्यांकडून मिळालेला हा सकारात्मक प्रतिसादच संपूर्ण प्रशासनासाठी सर्वात मोठा सन्मान असल्याची भावना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी व्यक्त केली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## चालुक्य कॉलनीतील चिमुकल्यांची मोकाट कुत्र्यांविरोधात मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ ऑगस्ट -**

शहरातील गुंजोटी रोडलगतच्या चालुक्य कॉलनीतील पाळीव व मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवाविरोधात येथील चिमुकल्यांनी अनोखी मोहीम हाती घेतली आहे. कॉलनीतील १० ते १२ वर्षांच्या मुलांनी स्वहस्ताक्षराने कुत्र्यांच्या मालकांना विनंतीपत्र देत कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.



चालुक्य कॉलनीत सुमारे ६० घरे असून अनेक कुटुंबांनी कुत्री पाळली आहेत. तसेच मोकाट कुत्र्यांचाही वावर वाढला आहे. या कुत्र्यांनी काही लहान मुलांना चावा घेतल्याच्या घटना घडल्याने मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळा, शिकवणी व विविध वर्गांनंतर कॉलनीतील मोकळ्या जागेत खेळण्याचा हक्क कुत्र्यांच्या उपद्रवामुळे हिरावला जात असल्याची भावना चिमुकल्यांनी व्यक्त केली आहे. या समस्येकडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### महाळंगी येथे श्री महालक्ष्मी देवीची आषाढ पाणी यात्रा उत्साहात

**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील महाळंगी येथील जागृत देवस्थान असलेल्या श्री महालक्ष्मी देवीची आषाढ पाणी यात्रा बुधवारी (दि.५) विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात पार पडली. यात्रेनिमित्त देवीच्या दर्शनासाठी दिवसभर भाविकांची मोठी गर्दी झाली असून हजारो भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यात्रेनिमित्त सकाळी देवीच्या मूर्ती व पालखीचे विधीवत पूजन करण्यात आले. त्यानंतर मानकरी भारत ढवळे यांच्या निवासस्थानापासून पालखीचे वाजत-गाजत मंदिराकडे प्रस्थान झाले. मंदिरात पालखी दाखल झाल्यानंतर नवसपूर्ती व इतर धार्मिक विधी पार पडले. सामाजिक कार्यकर्ते प्रशांत साळुंके यांच्या शेतात मशागतीदरम्यान श्री महालक्ष्मीची मूर्ती सापडल्यानंतर येथे भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. संततीप्राप्तीसह विविध मनोकामना पूर्ण होत असल्याच्या श्रद्धेमुळे येथे दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. यात्रेत महाळंगी, चिखली, रूईभर, आंबेवाडी, बेंबळी व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून देवीचे दर्शन घेतले.



### जवाहर नवोदय विद्यालयात फाउंडेशन डे उत्साहात साजरा

**तुळजापूर, दि.६ ऑगस्ट -**

जवाहर नवोदय विद्यालयात बुधवारी (दि.५) नवोदय फाउंडेशन डे विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे प्राचार्य ए.एस. कांबळे यांच्या हस्ते नवोदयचे जनक माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादनाने झाली. यावेळी वरिष्ठ अध्यापक चक्रपाणी गोमारे, संजय माने, हरी जाधव, पुरुषोत्तम जोशी तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थी अजान शेख याने नवोदय फाउंडेशन डेचे महत्त्व विषद केले. यानिमित्त विद्यालयात घोषवाक्य व निबंध लेखन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य ए.एस. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे आवाहन केले. शिस्त, मेहनत, प्रामाणिकपणा आणि आत्मविश्वासाच्या बळावर स्वतःचे, विद्यालयाचे, पालकांचे व देशाचे नाव उज्ज्वल करण्याचे तसेच राजीव गांधी यांचे शिक्षणविषयक स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी जाधव यांनी केले.

### परंडा-लातूर-उदगीर एसटी सेवा सुरू करण्याची नागरिकांची मागणी

**परंडा, दि.६ ऑगस्ट -**

परंडा तालुक्यातील प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी परंडा-लातूर-उदगीर एसटी बस सेवा बार्शी, कळंब व शिराढोण मार्गे तातडीने सुरू करावी, अशी मागणी नागरिकांनी गुरुवारी आगार प्रमुखांकडे निवेदनाद्वारे केली. निवेदनात म्हटले आहे की, परंडा आगाराच्या दोन बस सोलापूर-लातूर मार्गावर धावत असल्या तरी त्याचा परंडा तालुक्यातील प्रवाशांना कोणताही फायदा होत नाही. परंड्यातून लातूरसाठी पूर्वी सुरू असलेली एसटी सेवा मागील वर्षभरापासून बंद असून, त्यामुळे लातूर, उदगीर, नांदेड, अहमदपूर, औसा व निलंगा येथे जाणाऱ्या विद्यार्थी व प्रवाशांना अनेक बस बदलून प्रवास करावा लागत आहे. परंडा-लातूर-उदगीर बस सेवा दररोज सकाळी बार्शी, कळंब व शिराढोण मार्गे सुरू करावी, अन्यथा उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. या निवेदनावर दयानंद पाटील, मुजीब काजी, श्रीराम विद्वत, आप्पासाहेब शिंदे, विजय मेहेर, फारुख शेख, जमीर मुल्ला, जाकीर पटेल, अजिज मुजावर, भारत ठाकूर, फारूख मुल्ला, अतुल गोफणे, अंकुश जमदाडे, गफार हावरे, जाधव, गुलाब शिंदे, सतीश शिंदे, घनश्याम शिंदे, इरफान शेख, रेहान सय्यद व शेख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### बाळूमामा पालखीची आरती संपन्न

**कळंब, दि.६ ऑगस्ट -**

चोराखळी येथे बाळूमामा पालखी क्रमांक ९ ची आरती मंगळवारी (दि.४) रात्री ९ वाजता पार पडली. जि.प.चे माजी उपाध्यक्ष तथा शेतकरी नेते संजय पाटील दुधगावकर यांच्या हस्ते पालखीची आरती करण्यात आली. यावेळी ॲड. मिराजी मेदाड, संजय नवले, भरतअण्णा मैदाड, मल्हारी नवले, अंबादास शिंदे, दशरथ साठे, आप्पा माळी यांच्यासह हजारो भाविक उपस्थित होते.

# तुळजापूर विमानतळाला मुख्यमंत्र्यांची मंजुरी; प्रकल्पाला मिळाली निर्णायक गती

**एमएडीसीला प्रशासकीय प्रक्रिया तातडीने सुरु करण्याचे आदेश... धार्मिक पर्यटन, उद्योग व रोजगाराला मिळणार नवी चालना...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे तीर्थक्षेत्र असलेल्या तुळजापूर तालुक्यात प्रस्तावित विमानतळाच्या उभारणीला महत्त्वाची गती मिळाली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी)च्या नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत या प्रकल्पाला तत्त्वतः मंजुरी देत आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे आदेश एमएडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक कपूर यांना दिल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या प्रकल्पाचे पालकत्व स्वीकारत संबंधित यंत्रणांना आवश्यक कार्यवाही वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्यामुळे तुळजापूर विमानतळाचा प्रस्ताव आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे.

या प्रकल्पाच्या पाठपुराव्यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नुकतीच नवी दिल्ली येथे भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या (एएआय) वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन विमानतळाच्या तांत्रिक आणि प्रशासकीय बाबींवर सविस्तर चर्चा केली होती. या बैठकीमुळे प्रकल्पाच्या व्यवहार्यता तपासणीला आणि पुढील प्रशासकीय प्रक्रियेला अधिक बळ मिळाल्याचे सांगण्यात आले.



प्रस्तावित विमानतळामुळे तुळजापूरसह पंढरपूर, अक्कलकोट, गाणगापूर, येरमाळा, कुंथलगिरी आणि तेर या महत्त्वाच्या धार्मिक स्थळांना नजीकचा हवाई संपर्क उपलब्ध होणार आहे. त्यामुळे देशभरातील भाविकांना या तीर्थक्षेत्रांपर्यंत जलद व सुलभ प्रवास करता येणार असून धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

याशिवाय हॉटेल व्यवसाय, वाहतूक, व्यापार, सेवा क्षेत्र आणि स्थानिक रोजगारनिर्मितीलाही या प्रकल्पाचा मोठा फायदा होणार आहे. तुळजापूर तालुक्यातील प्रस्तावित 'तारा' (टीएआरए) प्रकल्पालाही विमानतळामुळे बळ मिळणार असून रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग तसेच सुरत-चेन्नई आणि शक्तिपीठ ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाशी जोडलेल्या या भागाला हवाई संपर्काची जोड मिळाल्यास उद्योग, लॉजिस्टिक्स, गुंतवणूक, निर्यात आणि सेवा क्षेत्राच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे.

### मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा : आमदार राणाजगजितसिंह पाटील



प्रस्तावित विमानतळ हा केवळ हवाई वाहतुकीचा प्रकल्प नसून धाराशिव, बीड, लातूर तसेच सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक, औद्योगिक, पर्यटन आणि कृषी क्षेत्राच्या विकासाला दीर्घकालीन बळ देणारा ठरेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबाबत आशावादी वातावरण निर्माण झाल्याचे सांगत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

## 'त्या' घरफोडीचा उलगडा; आरोपीला काही तासांत ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

धाराशिव : गणेश नगर परिसरातील घरफोडी प्रकरणाचा धाराशिव शहर पोलिसांनी अवघ्या काही तासांत उलगडा करत संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून पुढील तपास सुरू आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सागर राम साळुंके (वय ३०, रा. गणेश नगर, धाराशिव) यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून आरोपी राजेश परमेश्वर बनसोडे (वय २६, रा. साठे चौक, धाराशिव) याने दि. ५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजण्याच्या दरम्यान घरात प्रवेश केला. त्याने घरातील दोन मोबाईल फोन, १,२०० रुपये रोख रक्कम आणि दोन मनगटी घड्याळे, असा एकूण १५ हजार २०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या प्रकरणी सागर साळुंके यांनी दि.५ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

फिर्यादीने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत आरोपी राजेश बनसोडे याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने घरफोडीची कबुली दिली असून, या प्रकरणाचा पुढील तपास धाराशिव शहर पोलीस करीत आहेत.

## तेरखेड्यातील वारंवारच्या हाणामाऱ्यांनी उद्योगांवर संकट

**कामगारांमध्ये भीतीचे वातावरण... गावात पोलीस बंदोबस्त वाढला...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.६ ऑगस्ट -**

धाराशिव जिल्ह्यातील तेरखेडा हे गाव फटाका उद्योगासह विविध लघुउद्योगांमुळे राज्यभर परिचित आहे. उद्योगांच्या बळावर गावाने स्वतंत्र ओळख निर्माण केली असून उत्तर प्रदेश, बिहारसह इतर राज्यांतील अनेक मजूर येथे रोजगारासाठी वास्तव्यास आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून गावात राजकीय व इतर कारणांवरून वारंवार वाद, हाणामाऱ्या आणि तणावाच्या घटना घडत असल्याने त्याचा थेट परिणाम उद्योग क्षेत्रावर होऊ लागल्याची चर्चा आहे.

विशेषतः २ व ३ ऑगस्ट रोजी दोन गटांमध्ये झालेल्या हिंसक हाणामारीमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत मोठ्या प्रमाणावर मारामारी झाली असली तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनांमुळे स्थानिकांसह बाहेरून आलेल्या कामगारांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून अनेक मजूर गाव सोडण्याचा विचार करत असल्याचे बोलले जात आहे.

तेरखेड्यातील फटाका उद्योगात दिवस-रात्र उत्पादन व साहित्याची ने-आण सुरू असते. अशा परिस्थितीत गावात निर्माण झालेल्या तणावामुळे उद्योगांचे दैनंदिन कामकाज आणि कामगारांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.



**मजूर गाव सोडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा**

घटनांनंतर गावात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून संपूर्ण गावाला छावणीचे स्वरूप आले आहे. काही कामगारांकडून पोलिसांच्या कारवाईबाबत नाराजी व्यक्त केली जात असून आरोपींसोबतच निष्पाप मजुरांनाही त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप केला जात आहे. मात्र, या आरोपांबाबत पोलिसांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

वारंवार घडणाऱ्या हिंसक घटनांमुळे तेरखेड्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. उद्योगांचे सुरक्षित वातावरण अबाधित राखण्यासाठी प्रशासन आणि शासन कोणती ठोस पावले उचलते, याकडे उद्योग क्षेत्रासह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## कृषी निविष्ठा घोटाळ्यात दोषींवर गुन्हे दाखल करा; तुरुंगात पाठवा : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या नावावर वितरित करण्यात आलेल्या कृषी निविष्ठांतील कथित भ्रष्टाचारप्रकरणी केवळ निलंबनाची कारवाई पुरेशी नसून, या घोटाळ्याच्या मुख्य सूत्रधारासह संबंधित सर्व दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना तुरुंगात पाठवावे. तसेच भ्रष्टाचारातून शासनाचे झालेले आर्थिक नुकसान दोषींकडून वसूल करावे, अशी ठाम मागणी आमदार कैलास पाटील यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

आमदार पाटील यांनी सांगितले की, जिल्ह्यातील कृषी निविष्ठा वितरणातील गैरव्यवहाराचा मुद्दा त्यांनी सर्वप्रथम जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपस्थित केला होता. त्यानंतर विधानसभेतही हा प्रश्न मांडून सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. तसेच कृषिमंत्री आणि कृषी विभागाच्या सचिवांकडे अधिकृत तक्रार सादर करून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती.



या तक्रारीची गंभीर दखल घेत राज्य सरकारने चौकशी समितीची नियुक्ती केली. समितीच्या अहवालात कृषी निविष्ठा वितरण प्रक्रियेत गंभीर अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले. या कारवाईचे स्वागत करताना आमदार कैलास पाटील यांनी ती अपुरी असल्याचे स्पष्ट केले.

शेतकऱ्यांच्या हक्कावर डल्ला मारणाऱ्या आणि शासनाच्या योजनांमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांना केवळ निलंबित करून चालणार नाही. त्यांच्यावर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच भ्रष्टाचारातून झालेल्या आर्थिक नुकसानीची संपूर्ण रक्कम दोषी अधिकाऱ्यांकडून वसूल झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

भ्रष्टाचार करणाऱ्यांना काही काळ निलंबित करून पुन्हा सेवेत घेण्याची परंपरा थांबली पाहिजे. अन्यथा अशा कारवायांचा कोणताही धाक राहणार नाही आणि शेतकऱ्यांची लूट सुरूच राहील, अशी तीव्र प्रतिक्रिया आमदार कैलास पाटील यांनी व्यक्त केली.

## शेतात गांजाच्या रोपाची लागवड उघड; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जहागिरदारवाडी शिवारात गांजाच्या (कॅनाबिस) रोपाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास जहागिरदारवाडी शिवारातील शेत गट क्रमांक ७५ येथे अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी गांजाच्या (कॅनाबिस) वनस्पतीची लागवड केल्याची माहिती धाराशिव ग्रामीण पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन कारवाई केली.

यावेळी सुमारे ८.३२५ किलो वजनाचे, १ लाख ६६ हजार ५०० रुपये किमतीचे गांजाचे एक रोप जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमाल ताब्यात घेऊन अज्ञात व्यक्तीविरुद्ध धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### मोहसीन खान यांना पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ ऑगस्ट -**

आगाज फाउंडेशन आणि आझाद ग्रुपतर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय 'सलिमभाई मिर्झा समाजरत्न पुरस्कार' यंदा लातूरचे सामाजिक कार्यकर्ते व व्याख्याते मोहसीन खान यांना जाहीर झाला आहे. आगाज फाउंडेशनचे अकिब पटेल व मुस्तान मिर्झा यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

मुस्लिम समाजाच्या शिक्षण, आरक्षण, सामाजिक जनजागृती तसेच विविध सामाजिक प्रश्नांवर केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार २२ ऑगस्ट रोजी विशेष समारंभात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

## धाराशिवच्या रेल्वे विकासासाठी खा. ओमराजेंचा रेल्वेमंत्र्यांकडे पाठपुरावा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

धाराशिव लोकसभा मतदारसंघातील रेल्वे विकासाला गती मिळावी आणि प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची सदिच्छा भेट घेऊन विविध महत्त्वाच्या रेल्वे विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी मतदारसंघाच्या दृष्टीने महत्त्वाच्या चार प्रमुख मागण्या त्यांनी रेल्वेमंत्र्यांसमोर मांडल्या.

बैठकीत सर्वप्रथम धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे प्रकल्पातील उर्वरित तुळजापूर ते सोलापूर मार्गाच्या कामासाठी तातडीने निविदा (टेंडर) प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी प्रमुख मागणी खासदार निंबाळकर यांनी केली. हा रेल्वे मार्ग पूर्ण झाल्यास धाराशिव जिल्ह्याच्या विकासाला मोठी चालना मिळेल तसेच प्रवासी आणि व्यापारी वाहतुकीलाही मोठा फायदा होईल, असे त्यांनी नमूद केले.

**धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे प्रकल्पासह चार महत्त्वाच्या मागण्या**

याशिवाय नांदेड-पनवेल एक्स्प्रेसला ढोकी रेल्वे स्थानकावर अधिकृत थांबा मंजूर करावा, लातूर-मुंबई रेल्वेला कळंब रोड रेल्वे स्थानकावर थांबा द्यावा तसेच हरंगुळ-हडपसर रेल्वे सेवेचा विस्तार पुणे रेल्वे स्थानकापर्यंत करण्यात यावा, अशा महत्त्वाच्या मागण्याही त्यांनी रेल्वेमंत्र्यांसमोर मांडल्या.

धाराशिव लोकसभा मतदारसंघातील रेल्वे सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी या सर्व मागण्यांची सकारात्मक दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती खासदार निंबाळकर यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली.

या बैठकीस महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, श्रीरंग आप्पा बारणे, नरेश म्हस्के आणि संजय दिना पाटील उपस्थित होते.

### सलगरा येथे मटका जुगारावर छापा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ ऑगस्ट -**

नळदुर्ग पोलिसांनी जुगारविरोधी मोहिमेत सलगरा गावाजवळ मटका जुगारावर छापा टाकून एकावर गुन्हा दाखल केला आहे. युनुस शेरखान शेख (वय ४५, रा. सलगरा, ता. तुळजापूर) याच्या ताब्यातून मटका जुगाराचे साहित्य व १,४६० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली.

ही कारवाई सलगरा-गंधोरा रस्त्यावरील शेख पशुखाद्य दुकानाजवळ करण्यात आली. याप्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# संक्षिप्त...

## जिल्हा बँकेच्या नवीन इमारतीचे १४ ऑगस्टला उद्घाटन



तभा वृत्तसेवा

दैठणा, दि. ६ ऑगस्ट : दैठणा येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन सोहळ्याच्या नियोजनासंदर्भात मंगळवारी बैठक पार पडली. या बैठकीत येत्या १४ ऑगस्ट २०२६ रोजी बँकेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन व गृहप्रवेश सोहळा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या उद्घाटन सोहळ्यासाठी लातूर जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी राज्यमंत्री व सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेतृत्व तथा सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष व माजी आमदार धीरज देशमुख यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे.

या मान्यवरांना उद्घाटन सोहळ्याचे निमंत्रण देण्यासाठी दैठणा येथील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन व्यंकटरावजी बिरादार, सोसायटीचे उपाध्यक्ष (व्हाइस चेअरमन) उमेशजी मोरे, दैठणा ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच योगेश उर्फ आशिष बिरादार, माजी सरपंच माधवराव बिरादार दैठणा येथील समाजसेवक सिताराम किसनराव पाटील तसेच क्रियाशील नागरिक विश्वनाथ तोटे आणि गणपत पाटील कल्याणराव बिरादार विजयकुमार कावळे बाळासाहेब पाटील बापूसाहेब बिरादार लिंबराज माने यांनी मान्यवरांची भेट घेऊन त्यांना निमंत्रण दिले.

या उद्घाटन सोहळ्याबाबत दैठणा परिसरातील नागरिक व सभासदांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आ. निलंगेकर यांच्या माध्यमातून धनेगावातील १३४ कुटुंबांचे घराचे स्वप्न साकार



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. ६ ऑगस्ट : धनेगाव (ता. देवणी) : यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत धनेगाव येथील १३४ पात्र लाभार्थ्यांना घरकुलांचे वाटप करण्यात आले. या वाटपामुळे अनेक वर्षांपासून स्वतःच्या हक्काच्या घराची प्रतीक्षा करणाऱ्या १३४ कुटुंबांच्या आयुष्यात आनंदाचा नवा अध्याय सुरू झाला आहे.

सदर घरकुले लोकनेते आमदार संभाजीराव (भैय्या) पाटील निलंगेकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मंजूर झाली असून, युवा नेते अरविंद भाऊ पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया गतीमान करण्यात आली. तसेच जिल्हा परिषद सदस्य रामलिंग शेषेराव शेरे यांनी लाभार्थ्यांच्या अडचणी शासन स्तरावर वेळोवेळी मांडून सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत झाली.

घरकुलांचे वाटप झाल्याने लाभार्थी कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण असून, शासनाच्या लोकाभिमुख धोरणांमुळे सर्वसामान्य नागरिकांना सन्मानाने जगण्यासाठी हक्काचे घर उपलब्ध होत असल्याची भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केली. यावेळी लाभार्थ्यांनी आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, युवा नेते अरविंद भाऊ पाटील निलंगेकर आणि जिल्हा परिषद सदस्य रामलिंग शेषेराव शेरे यांचे आभार मानले.

यावेळी बोलताना जी प सदस्य रामलिंग शेरे म्हणाले की यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेच्या माध्यमातून भूमिहीन व गरजू कुटुंबांना सुरक्षित, सन्मानाचे आणि हक्काचे निवासस्थान उपलब्ध करून देण्याचा शासनाचा संकल्प अधिक बळकट होत आहे. अशाच प्रकारे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात, कोणताही गरजू नागरिक वंचित राहू नये आणि विकासाची गंगा प्रत्येक घरापर्यंत पोहोचावी, यासाठी मी लोकनेते आमदार संभाजीराव (भैय्या) पाटील निलंगेकर, युवा नेते अरविंद भाऊ पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने पाठपुरावा करून जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध राहीन. असे मनोगत जि प सदस्य रामलिंग शेरे यांनी व्यक्त केले

# व्यवस्थेला प्रश्न विचारणारी तरुण पिढी निर्माण झाली पाहिजे : पत्रकार आवटे



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ६ ऑगस्ट : ज्ञान घेऊन विद्यार्थ्यांनी मोठे होण्याची स्वप्न बघावीत. हे स्वप्न पूर्ण करणारी व्यवस्था नसेल तर व्यवस्थेला प्रश्न विचारणारी तरुण पिढी निर्माण झाली पाहिजे.असे मत ज्येष्ठ पत्रकार तथा संपादक संजय आवटे यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील महाराष्ट्र शिक्षण समिती संचलित महाराष्ट्र महाविद्यालय व महाराष्ट्र औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर हे उपस्थित होते.

विचार मंचावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे कुलसचिव डॉ ज्ञानेश्वर पवार, महाराष्ट्र शिक्षण समितीचे सचिव बब्रुवानजी सरतापे, महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, महाराष्ट्र औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर पाटील, प्राचार्य डॉ. भागवत पौळ, उपप्राचार्य प्रा प्रशांत गायकवाड व डॉ बी एस गायकवाड आदी उपस्थित होते.

ते पुढे बोलताना पत्रकार आवटे म्हणाले की, विद्यार्थी हे शिकत असतात त्यांना योग्य मार्ग दाखविण्याचे काम शिक्षक करीत असतात. शिक्षकांनी त्यांना प्रश्नांची उत्तरे न देता त्यांच्यामध्ये उत्तरे शोधण्याची धमक निर्माण करावी. स्वतःची प्रगती, विकास जर विद्यार्थ्यांनी करून घ्यावयाचा असेल तर योग्य शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षण हेच प्रगतीचे प्रवेशद्वार अन् यशाची गुरुकिल्ली आहे.

संवादाने माणसं बदलू शकतात त्यासाठी संवादाची गरज आहे. आज समाज माध्यमांचा वापर भरपूर प्रमाणात होतो परंतु त्याचा उपयोग कुठे आणि कसा करावा याचे आकलन तरुण पिढीला होणे आवश्यक आहे. समाजाने आजच्या शिक्षणाला बाजारात उभे केले आहे हे आपले दुर्दैव असल्याचे खंत त्यांनी व्यक्त केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ ज्ञानेश्वर पवार म्हणाले, पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी पदवी बरोबरच कौशल्यही विकसित करावीत, कोणत्याही शाखेतून मिळविलेले ज्ञान हे कमी नसते, त्याचा वापर कोठे आणि कसा करावा हे समजून घेतले पाहिजे याची जाणीव विद्यार्थ्यांना होणे गरजेचे आहे.

यावेळी विजय पाटील निलंगेकर म्हणाले, पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग स्वतःच्या प्रगतीसाठी तर करावाच पण त्याचबरोबर देशाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक,आर्थिक प्रगतीसाठी ही योगदान देण्याचा सल्ला दिला.

कला, विज्ञान, वाणिज्य, संगणकशास्त्र, औषध निर्माणशास्त्र, व्यावसायिक अभ्यासक्रम, या शाखांच्या पदवी व पदव्युत्तर अशा एकूण १७४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीत आलेल्या व सुवर्णपदक प्राप्त केलेल्या २१ पदवीधारकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी परीक्षा विभागाचे प्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक तसेच क्रीडा विभागाचे प्रमुख यांचीही उपस्थिती होती.

प्रास्ताविक डॉ. बालाजी गायकवाड, आभार डॉ.हंसराज भोसले तर सूत्रसंचालन डॉ .अजित मुळजकर, डॉ. गोविंद शिवशेट्टे, डॉ. नरेश पिनमकर, डॉ. भालके, प्रा. संदीप सूर्यवंशी यांनी केले.

# किलबिल नॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थी मंत्रिमंडळ शपथविधी सोहळा



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ६ ऑगस्ट : किलबिल नॅशनल स्कूल, जवळगा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थी मंत्रिमंडळाच्या शपथविधी (INVESTITURE CEREMONY) कार्यक्रमाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव, शिस्त, सेवाभाव आणि लोकशाही मूल्ये रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक स्मिता जाधव, नगरसेवक युसुफ सय्यद, युवा नेते अजहर बागवान, महेश देवणे, ड. गजानन जाधव, प्रा. डॉ. शार्दुल पठाण, रणधीर पाटील (ग्रामपंचायत सदस्य, शिरूर ताजबंद) तसेच शरद मुंडे (सरपंच, ग्रामपंचायत थोडगा), संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींना बॅज प्रदान करण्यात आले व त्यांनी आपल्या पदाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याची शपथ घेतली.

# गटविकास अधिकारी मेडेवार यांच्या हस्ते हत्तीबेटावर वृक्षारोपण



तभा वृत्तसेवा

उदगीर येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार यांच्या हस्ते हत्तीबेट पर्यटन स्थळाच्या गडावर वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी देवर्जनचे सरपंच अभिजित साकोळकर यांच्या हस्ते गटविकास अधिकारी मेडेवार यांचा श्री स्वामी समर्थ मंदिरात शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मेडेवार यांनी हत्तीबेटावर लागवड करण्यात आलेल्या झाडांची व पर्यटन विकासाच्या कामांची पाहणी केली.याप्रसंगी पंचायत समितीचे दत्ता मद्दे, राहुल पोतदार उपस्थित होते.

# दिवेगाव, कोष्टगाव येथे वृक्षारोपण

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ६ ऑगस्ट : पर्यावरण संवर्धन आणि हरितग्राम अभियानाला चालना देण्यासाठी तालुक्यातील दिवेगाव व कोष्टगाव येथे पंचायत समितीच्या सभापती मोनिका रवी सूर्यवंशी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची गरज आहे. वृक्षारोपण ही केवळ औपचारिकता नसून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरण निर्माण करण्याची जबाबदारी असल्याचे सभापती यांनी सांगितले. कार्यक्रमास कृषी विभागाचे नरहारे, दिवेगावच्या सरपंच अहिल्या कांदे, ग्रामसेवक आशिष देशमुख, बापू कांदे, सीता लहाने, शरद मोहळकर आदी उपस्थित होते.

तर कोष्टगाव येथे झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमास सरपंच सुंदर घुले, परमेश्वर घुले, जयंत कुलकर्णी, ग्रामसेवक चाटे, राजेंद्र डाके, बाळू घुले, रोहिणी कराड, उर्मिला डाके, शिवनंदा डाके, हरिदास जाधव, अनिल वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन करण्याचा संकल्प केला.

## 'इतिहास महाराष्ट्राचा' कलाविष्कारांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

# विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम



तभा वृत्तसेवा

औसा दि. ६ ऑगस्ट : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न असलेल्या बालरंगभूमी परिषद शाखा लातूरच्या वतीने आयोजित केलेल्या स्पर्धेत विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल च्या विद्यार्थिनींच्या समूहाने सादरीकरण करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर आधारित केलेल्या सादरीकरणातून विद्यार्थिनींनी अभिनय, नृत्य आणि संगीत यांचा प्रभावी संगम सादर केला. त्यांच्या उत्कृष्ट कलाविष्काराने रसिकांची, परीक्षकांची मने जिंकत प्रथम क्रमांकावर मोहोर उमटवली. या उल्लेखनीय यशाच्या बळावर संघाची दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अद्विका धाराशिवे, श्रीजा डोंगरे, देवांशी मिटकरी, स्वरा शिंदे, स्वरा पांढरे, आरोही बोकडे, वैदेही सूर्यवंशी व स्नेहल कन्नाडोणे या विद्यार्थिनींचा या संघात समावेश आहे.या यशाबद्दल बालरंगभूमी परिषदेचे अध्यक्ष रणजित आचार्य व स्पर्धाप्रमुख महेश बिडवे यांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले. कल्चरल इन्चार्ज सायली देशमुख, पूनम बेसके, शिक्षिका शेख मसिम, संजीवनी शिंदे, नृत्य प्रशिक्षक सचिन गोने, कॅम्पस को-ऑर्डिनेटर किशोर जेवे, सुपरवायझर ऋतिक धाराशिवे तसेच प्राचार्य बसवेश्वर धाराशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी केली. संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सहसचिव महादेवजी खिचडे, संस्थेअंतर्गत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक, पालक तसेच सर्व स्तरातून विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात आले असून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# नूतन मुख्याध्यापक दत्ता कारभारी यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

वलांडी दि.६ऑगस्ट :वलांडी येथील व्यंकटेश विद्यालयात पर्यवेक्षक म्हणून कार्यरत असलेले दत्ता कारभारी यांची पदोन्नती होऊन श्री भोगेश्वर विद्यालय, भोगेश्वर तळेगाव येथे मुख्याध्यापकपदी बदली झाल्याबद्दल त्यांचा बुधवारी (दि. ५) देवणी तालुका ग्रामीण पत्रकार संघाच्या संपर्क कार्यालयात सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सचिव भगवानराव पाटील तळेगावकर यांच्या हस्ते दत्ता कारभारी यांना नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले. त्यानंतर देवणी तालुका ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष हसन मोमीन यांच्या हस्ते पगडी, शाल व हार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी चेअरमन संजीव पाटील, नामदेव भोसले, पत्रकार शादुल बौडीवाले, सामाजिक कार्यकर्ते अरुण पाटील, सुशांत साबणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी कारभारी यांना मुख्याध्यापकपदाच्या नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या भावी कार्यास यश लाभो, अशी सदिच्छा व्यक्त केली.

# साहित्य भारतीच्या वतीने आयोजित कविसंमेलन उत्साहात





तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ५ ऑगस्ट : साहित्य भारती, उदगीर शाखा व ज्येष्ठ नागरिक संघ, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने व्यासपौर्णिमेनिमित्त आयोजित कविसंमेलन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमास साहित्यप्रेमी, कवी-कवयित्री आणि रसिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

प्रारंभी महर्षी वेदव्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिका मंगला शेटे बिरादार या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवमूर्ती भातांबरे ,विश्वनाथ बिरादार माळेवाडीकर ज्येष्ठ कवी किशन उगले,अनंतराव कुडलीकर होते. प्रास्ताविक साहित्य भारती उदगीर शाखेच्या अध्यक्षा सुनंदा सरदार यांनी केले.प्रास्ताविकात त्यांनी नवोदित तसेच नामांकित लेखक, कवी आणि साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी साहित्य भारती, उदगीर शाखा सातत्याने प्रयत्नशील राहील. साहित्य संवर्धनासाठी विविध साहित्यिक उपक्रम, कविसंमेलने, व्याख्याने, काव्यवाचन, पुस्तक प्रकाशन सोहळे तसेच नवोदितांना प्रोत्साहन देणारे विविध कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येत असल्याचे सांगितले.

यानंतर झालेल्या कविसंमेलनात अश्विनी निवर्गी, शिवनंदा सोलापूरे, मंगला शेटे बिरादार, प्राचार्या मैनाताई साबणे, रंजनाताई जोशी, आसावरी अपसिंगेकर,कल्पना नळगीरकर, अनुराधा धोंड, प्रेमला नळगीरे यांच्यासह उपस्थित कवी-कवयित्रींनी सामाजिक, शैक्षणिक, भक्तिरस, स्त्रीशक्ती, नाती, आई, प्रेम, कष्ट आणि जीवनमूल्यांवर आधारित दर्जेदार कविता सादर करून उपस्थित रसिकांची दाद मिळवली.

अध्यक्षीय समारोपात मंगला शेटे बिरादार यांनी महर्षी वेदव्यास यांच्या साहित्यसेवेचा गौरवपूर्ण वारसा जपण्याचे आवाहन करत साहित्य हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले.

सूत्रसंचालन मयूर कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन कल्पना नळगीरकर यांनी केले. सामूहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# चवणहिप्परगा येथे जालनात महाराज यात्रा महोत्सव, गोपाळकाला साजरा



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. ६ ऑगस्ट : देवणी तालुक्यातील चवणहिप्परगा येथे प्रमाणे यावर्षीही जालनात महाराज यात्रा महोत्सवाचे व गोपाळकाला उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. बब्रुवान व्यंकटराव पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ग्रामस्थांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत सर्वरोग निदान व आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल १२१ रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली.

गावचे सुपुत्र डॉ. गणेश शेषेराव गणापुरे यांच्या पुढाकारातून तसेच लोकमान्य अतिदक्षता केंद्र, लातूर येथील तज्ज्ञ डॉक्टर व कर्मचारी यांच्या सहकार्याने या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात नागरिकांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्याबरोबरच रक्तदाब (बीपी), रक्तातील साखर (शुगर) आदी तपासण्या करण्यात आल्या. तपासणीनंतर रुग्णांना त्यांच्या आजारानुसार तज्ज्ञ डॉक्टरांकडून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरामध्ये डॉ. साजिद खान, डॉ. गणेश गणापुरे, डॉ. मारुती बेळेगावे यांच्यासह सदाशिव माने (ब्रदर), जीवन सोनटक्के, ऋषिकेश सुरवसे व सौ. वंदना सावंत यांनी रुग्णांची तपासणी व आरोग्यसेवा केली. शिबिरात तपासणीदरम्यान पुढील उपचाराची आवश्यकता असलेल्या रुग्णांना लातूर येथील संबंधित रुग्णालयात विशेष सवलतीच्या दरात उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य तपासणीपासून पुढील उपचारापर्यंत मार्गदर्शन मिळाल्याने शिबिराचा मोठा फायदा झाला.

वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ शुभेच्छा व सत्कारापुरता कार्यक्रम न ठेवता ग्रामस्थांच्या आरोग्यासाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आल्याबद्दल आयोजकांचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा आपल्या गावातच उपलब्ध झाल्याने अनेक नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

या शिबिरात एकूण १२१ रुग्णांची तपासणी करण्यात आली. विविध आजारांच्या तपासणीसह बीपी व शुगर तपासणी करून आवश्यक आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला. गरज असलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमात चवणहिप्परगा येथील तरुण विश्वनाथ शिवाजी बिरादार यांची लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेत लिपिक पदी निवड झाल्याबद्दल व विश्वदीप हंसराज कांबळे यांची महाराष्ट्र सुरक्षा बल गटात निवड झाल्याबद्दल त्यांची गावातून मिरवणूक काढून मित्र मंडळ व ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

## उमरग्यात शेताच्या वादातून मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

शेताच्या वादातून एका कुटुंबाला शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी उमरगा पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

तानाजी रेवा जाधव, छायाबाई तानाजी जाधव, अर्जुन जाधव (सर्व रा. बलसुर) आणि अविनाश चव्हाण (रा. लिंबाळा तांडा) अशी आरोपींची नावे आहेत.



२९ जुलै रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास गुंजोटी येथे शेताच्या वादातून आरोपींनी फिर्यादी विमलबाई शिवाजी जाधव (वय ५५, रा. बलसुर तांडा) तसेच त्यांचे पती व मुलाला शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी, काठी व कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केल्याचा आरोप आहे. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची तक्रार ५ ऑगस्ट रोजी दाखल करण्यात आली. त्यावरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही सामूहिक जबाबदारी : उषाताई गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

शिक्षण हा समाजाच्या विकासाचा मजबूत पाया आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि संस्कारक्षम शिक्षण मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, आत्मविश्वास आणि कौशल्य विकसित करण्यासाठी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा अवलंब करावा. शाळांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन धाराशिव जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा तथा शिक्षण सभापती उषाताई रवींद्र गायकवाड यांनी केले.



मंगरूळ जिल्हा परिषद गटातील जि.प. प्राथमिक शाळा, आरळी बुद्रुक येथे सदिच्छा भेट देऊन त्यांनी शाळेतील शैक्षणिक कामकाजाची पाहणी केली. यावेळी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अध्ययनाची माहिती घेतली, विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला तसेच शिक्षकांशी चर्चा करून शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन केले.

भेटीदरम्यान त्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. अभ्यास, वाचन, स्वच्छता, शिस्त आणि नियमित उपस्थितीचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांच्या भविष्यातील ध्येयांविषयी जाणून घेतले. शिक्षणाच्या माध्यमातून मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

यानंतर मुख्याध्यापक व शिक्षकांसोबत झालेल्या बैठकीत शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची उपस्थिती, अध्ययन-अध्यापन पद्धती, शासनाच्या विविध शैक्षणिक योजना, मूलभूत सुविधा, स्वच्छता, वृक्षसंवर्धन तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच नैतिक मूल्ये, संस्कार आणि कौशल्यांचा विकास होणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. शाळेच्या परिसराची पाहणी करून उपलब्ध भौतिक सुविधांची माहिती घेत त्यांनी विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात शिक्षण मिळावे, शाळांमध्ये आधुनिक शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर व्हावा आणि प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचावे यासाठी जिल्हा परिषद स्तरावर आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या सिमा माडजे, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# डॉ. कोमल गरड-जाधव यांना न्याय देण्याची मागणी



### डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजनांची आयएमएची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ ऑगस्ट -**

उमरगा येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. कोमल गरड-जाधव यांना न्याय मिळावा तसेच शहरातील डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), उमरगाच्या वतीने उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

डॉ. कोमल गरड-जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार कथित धमकी, खंडणीची मागणी आणि विनयभंग प्रकरणी गुन्हा नोंद झाला असून, या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. डॉक्टरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, या घटनेचा आयएमएने जाहीर निषेध केला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, डॉक्टर समाजाच्या आरोग्यसेवेसाठी दिवस-रात्र कार्यरत असतात. अशा परिस्थितीत वैद्यकीय अधिकाऱ्यांना धमक्या, दबाव, खंडणी किंवा छळाला सामोरे जावे लागणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे संबंधित तक्रारदाराला न्याय मिळावा आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात.

वैद्यकीय व्यवसाय हा समाजसेवेचा पाया असून डॉक्टरांच्या सुरक्षिततेची हमी ही सक्षम आरोग्य व्यवस्थेची पूर्वअट असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणात तातडीने न्याय्य व प्रभावी कारवाई करून डॉक्टरांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करावे, अशी मागणी आयएमएने केली आहे.

या निवेदनावर आयएमए उमरगा तालुकाध्यक्ष डॉ. प्रशांत मोरे, उपाध्यक्ष डॉ. शुभांगी महाजन, सचिव डॉ. विजय बेडदुर्गे, माजी तालुकाध्यक्ष डॉ. अनंत मुगळे, कोषाध्यक्ष डॉ. सागर पतंगे, डॉ. अभय शिंदे, डॉ. नामदेव बिराजदार, डॉ. थिटे, डॉ. विजय पाटील, डॉ. विनोद जाधव, डॉ. लक्ष्मण सातपुते, डॉ. अनिकेत इनामदार, डॉ. उदय मोरे, डॉ. घोडके यांच्यासह शहरातील अनेक डॉक्टरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### ▸▸ आयएमएच्या प्रमुख मागण्य...

प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व जलदगतीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी., डॉ. कोमल गरड-जाधव यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने सर्वतोपरी सहकार्य करावे., तपास प्रक्रियेवर कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा अन्य दबाव येऊ न देता निष्पक्ष तपास पूर्ण करावा., उमरगा उपजिल्हा रुग्णालयासह सर्व डॉक्टर व कर्मचाऱ्यांसाठी कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करावी., डॉक्टर व महिला डॉक्टरांवरील धमकी, मारहाण, विनयभंग आणि खंडणीच्या घटनांबाबत 'झिरो टॉलरन्स' (शून्य सहनशीलता) धोरण राबवावे., भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने अमलात आणाव्यात.

## परंडा शहराला नवा डी.पी. रस्ता मिळणार? व्यापारी संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.६ ऑगस्ट -**

परंडा शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करून ग्रामीण भागाशी सुलभ संपर्क निर्माण करण्यासाठी मंडई पेठ येथील मुख्य रस्ता ते छत्रपती संभाजी महाराज चौक (सोनारी रोड) हा डी.पी. (डेव्हलपमेंट प्लॅन) रस्ता तातडीने विकसित करण्यात यावा, अशी मागणी व्यापारी संघटना, शहरातील नागरिक आणि शेतकरी वर्गाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन बुधवारी (दि. ५ ऑगस्ट) नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तसेच नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या सोनारी रोडवरून शहरात येणारी वाहतूक आगरकर गल्ली व मोमीन गल्लीमार्गे मंडई पेठेत प्रवेश करते. या मार्गावर रस्ता अरुंद असल्याने चारचाकी वाहनांना मोठी अडचण निर्माण होते आणि वारंवार वाहतूक कोंडीची समस्या उद्भवते. परंडा शहर भौगोलिकदृष्ट्या पश्चिम महाराष्ट्राच्या सीमेवर असून उत्तरेकडील सोनारी रोडमार्गे तालुक्यातील सुमारे ३० ते ४० गावे शहराशी जोडली जातात. तसेच शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यामुळे वाहनांना वळसा घालून मंडई पेठेत प्रवेश करावा लागतो. त्यामुळे छत्रपती संभाजी महाराज चौक (सोनारी रोड) ते टिपू सुलतान चौक असा नवीन डी.पी. रस्ता झाल्यास शहराची कनेक्टिव्हिटी वाढेल, वाहतूक सुरळीत होईल आणि शहराचा संतुलित विकास साधता येईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या रस्त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांना शहरात ये-जा करणे अधिक सोयीचे होणार असून मुख्य बाजारपेठ, एसटी स्थानक, पोस्ट कार्यालय, ग्रामीण रुग्णालय तसेच विविध बँकांशी थेट संपर्क उपलब्ध होईल, असेही व्यापारी संघटनेने म्हटले आहे.

यावेळी व्यापारी संघटनेचे पदाधिकारी, व्यापारी तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### परंडा शहर विकासासाठी नवीन डी.पी. रस्त्याचा प्रयत्न करू : नगराध्यक्ष जाकीर सौदागर



राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या तसेच आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली परंडा शहराचा आदर्श विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. व्यापारी संघटनेने दिलेल्या निवेदनाची दखल घेऊन नगरपरिषदेच्या माध्यमातून नवीन डी.पी. (डेव्हलपमेंट प्लॅन) रस्ता मंजूर व विकसित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांनी व्यापारी संघटनेशी चर्चा करताना दिले.

## ३६४ वाहनांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी ५ ऑगस्ट रोजी शहरातील प्रमुख रस्त्यांवर विशेष मोहीम राबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध ३६४ कारवाया केल्या.

## पीक विमा अर्जाची मुदत १० ऑगस्टपर्यंत वाढली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

खरीप हंगामातील पिकांना नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण मिळावे यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलैवरून १० ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

बाजरी, मूग, उडीद, तूर, सोयाबीन, कापूस, मका व खरीप कांदा पिकांची लागवड केलेल्या कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे कृषी विभागाने आवाहन केले आहे.



अर्जासाठी स्वयंघोषणापत्र, सातबारा व ८-अ उतारा, आधार कार्ड, सीळींरलज्ञ त्रीशी खऊ आणि बँक पासबुकची प्रत आवश्यक असून, शेतकरी आपले सरकार सेवा केंद्र, सीएससी किंवा संबंधित बँकेमार्फत ऑनलाइन अर्ज करू शकतात.

अंतिम दिवसाची वाट न पाहता तातडीने अर्ज करून पिकाला विमा संरक्षण मिळवावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी केले आहे.

## अवैध गावठी दारूसह महिला ताब्यात; २० हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा शिवारातील माणिकदंड येथे अवैध गावठी दारू विक्रीसाठी साठवून ठेवल्याप्रकरणी येरमाळा पोलिसांनी आक्काबाई धनंजय शिंदे (वय ४०, रा. इंदापूर, ता. वाशी, ह.मु. माणिकदंड, तेरखेडा शिवार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

५ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास त्यांच्या राहत्या पत्र्याच्या शेडसमोरून सुमारे २० हजार २०० रुपये किमतीची २०० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली.

## तुळजापूरातील खड्डेमय रस्त्यांवर मनसे आक्रमक; आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील प्रमुख रस्त्यांची दिवसेंदिवस बिकट होत चाललेली अवस्था आणि वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. तालुक्यातील जीर्ण, खड्डेमय आणि धोकादायक रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तुळजापूर कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसेने दिला आहे.



यासंदर्भात मनसेचे जिल्हाध्यक्ष महेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात तालुक्यातील अनेक प्रमुख रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था अधोरेखित करण्यात आली. मनसेने म्हटले आहे की, तुळजापूर-ढेकरी, आरळी खुर्द-आरळी बुद्रुक-काळेगाव, कुंभारी-मंगरूळ, धनगरवाडी-अणदूर, चिवरी तसेच खुदावाडी-जंपूर या मार्गांसह तालुक्यातील अनेक महत्त्वाचे रस्ते मोठ्या खड्ड्यांनी व्यापले असून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. गेल्या दोन वर्षांपासून स्थानिक नागरिकांकडून सातत्याने तक्रारी करण्यात येत असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याचा आरोपही करण्यात आला. रस्त्यांच्या खराब अवस्थेमुळे दररोज लहान-मोठे अपघात होत असून विद्यार्थी, शेतकरी, रुग्ण, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. खराब रस्त्यांमुळे वाहनांचे नुकसान होत असून शासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.करोडो रुपयांचा निधी मंजूर होऊनही प्रत्यक्षात दर्जेदार कामे होत नसल्याचा मुद्दा उपस्थित करत निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी मनसेने केली आहे. कामे पूर्ण झाल्यानंतर काही महिन्यांतच पुन्हा खड्डे पडण्याची पुनरावृत्ती सहन केली जाणार नसल्याचा इशाराही देण्यात आला. निर्धारित मुदतीत कामे सुरू झाली नाहीत, तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तुळजापूर कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील, असा स्पष्ट इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष महेश जाधव, मयूर गाढवे, मल्लिकार्जुन कुंभार, धर्मराज सावंत, धनाजी साठे, सोमनाथ आलुर, शशिकांत तांबे, समीर शेख, रूपी माने, लक्ष्मण सुखशे आणि विशाल माने यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**जाहीर प्रगटनाद्वारे समन्स**
**उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**

वादप्रश्न नक्की करण्यासाठी समन्स (नियम ५, नियम १,५)

संक्षिप्त दिवाणी दावा क्र. ०१/२०२६
अजित वि. निलेश
निशाणी क्र. ८

प्रति,
प्रतिवादी
निलेश सिद्राम तुकशेट्टी
रा. मुळज, ता. उमरगा, जि. धाराशिव.

ज्याअर्थी वादी **अजित मोहनराव माने, रा. माडज, ता. उमरगा, जि. धाराशिव,** यांनी सोबतच्या नकलेप्रमाणे यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी ह्या वादासंबधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी **दिनांक १०/०९/२०२६** रोजी दिवसा १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांची उत्तर देवू शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे. व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर केम) ज्या दस्त आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावे आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर क्लेम) पुष्ठयर्थ पुरावा म्हणुन तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबुन असाल तर अशा दस्तऐवजाचे एक सुची करुन ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावे. तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पुर्वी बजावणीकरीता तुमचा पत्ता दाखल करण्यास तुम्ही कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.
**आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

स्वाक्षरित/-
(एस.एन. यमगर)
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/-
(डी.व्ही. गायकवाड)
सहा.अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर, उमरगा.

## ओंकार साखर कारखान्याविरोधात आंदोलनाचा एमआयएमचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ ऑगस्ट -**

अक्कलकोट येथील ओंकार साखर कारखान्याकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याचा आरोप एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शहबाज काझी यांनी केला आहे. जानेवारी महिन्यात गाळपासाठी गेलेल्या ऊसाचे पैसे अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले नसून एफआरपीनुसार ऊस बिलही देण्यात आले नसल्याचा दावा त्यांनी केला.

या प्रकरणाची चौकशी करून संबंधित कारखान्यावर कारवाई करावी, अन्यथा एमआयएमच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. काझी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अक्कलकोट येथील ओंकार साखर कारखान्याकडून तुळजापूर तालुक्यासह परिसरातील अनेक ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. कारखान्याने ऊस बिल देताना दुजाभाव केल्याचा आरोप करत त्यांनी सांगितले की, नोव्हेंबर महिन्यापर्यंत गाळप झालेल्या ऊसाला प्रतिटन २,९०० रुपये दर देण्यात आला, तर जानेवारी महिन्यात गाळप झालेल्या ऊसाला केवळ १,८०० रुपये दर देण्यात आला. याशिवाय जानेवारी महिन्यात गाळप केलेल्या ऊसाचे देयक अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले नसल्याचा आरोपही त्यांनी केला.



पैसे मिळविण्यासाठी शेतकरी वारंवार कारखान्याच्या फेऱ्या मारत असून, आज देतो, उद्या देतो अशी आश्वासने देऊन त्यांना परत पाठविले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

गाळप झालेल्या ऊसाचे थकीत पैसे तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावेत. अन्यथा एमआयएमच्या वतीने ओंकार साखर कारखान्यासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा काझी यांनी दिला आहे.

## बसस्थानकासमोर वाहन उभे केल्याप्रकरणी गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑगस्ट -**

बसस्थानक समोरील सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा धोकादायक पद्धतीने चारचाकी वाहन उभे केल्याप्रकरणी लोहारा पोलिसांनी महेबुब करीम शेख (रा. मार्डी, ता. लोहारा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना ५ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे ११.४० वाजता घडली. पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरीवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

**तहसील तथा कार्यकारी दंडाधिकारी, परंडा**
**बार्शी रोड परंडा पिनकोड ४१३ ५०२**
दूरध्वनी क्रमांक (०२४७७) २३२०२४ Email.ID-tahparandagmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

जा.क्र २०२६/महसूल/जन्म-मृत्यु नोंद/क्रमांक- दि.१५/०७/२०२६

**जाहिरनामा**

ज्याअर्थी अर्जदार **चित्रा मनोहर वायकुळे रा. ढगपिंपरी ता. परंडा जि.धाराशिव** याची जन्म **दिनांक ०१/०६/१९९४** रोजी मौ. ढगपिंपरी तालुका. परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद ग्रामपंचायत कार्यालय ढगपिंपरी ता. परंडा जि. धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीता आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सदरहू अर्जदार **चित्रा मनोहर वायकुळे रा. ढगपिंपरी ता. परंडा जि. धाराशिव** यांचा यांच्या जन्म दिनांक/जन्म स्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

**दिनांक / /२०२६ रोजी माझेसही व शिक्यानिशी दिले असे.**

स्वाक्षरित/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**परंडा**

**तहसील तथा कार्यकारी दंडाधिकारी, परंडा**
**बार्शी रोड परंडा पिनकोड ४१३ ५०२**
दूरध्वनी क्रमांक (०२४७७) २३२०२४ Email.ID-tahparandagmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

जा.क्र २०२६/महसूल/जन्म-मृत्यु नोंद/क्रमांक- दि.१५/०७/२०२६

**जाहिरनामा**

ज्याअर्थी अर्जदार **नाना मनोहर वायकुळे रा. ढगपिंपरी ता. परंडा जि.धाराशिव** यांची **मुलगी नामे ज्ञानेश्वरी नाना वायकुळे जन्म दिनांक. १९/०३/२०१९** मौ. ढगपिंपरी, ता. परंडा, जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद ग्रामपंचायत कार्यालय ढगपिंपरी, ता. परंडा, जि. धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीता आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सदरहू अर्जदार **नाना मनोहर वायकुळे रा. ढगपिंपरी ता. परंडा जि. धाराशिव** यांचा यांच्या जन्म दिनांक/जन्म स्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

**दिनांक / /२०२६ रोजी माझेसही व शिक्यानिशी दिले असे.**

स्वाक्षरित/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**परंडा**

लातूर
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## १० वर्षांपासून फरार आरोपीला अटक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : पोलीस ठाणे एमआयडीसी, लातूर येथे गुन्हा क्र. ३८/२०१६ अंतर्गत भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१ व ३४ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी सुग्रीव गिरजप्पा बंडगर (वय ३९ रा. भातांबी, ता. तुळजापूर) हा २०१६ पासून फरार होता. न्यायालयात वारंवार अनुपस्थित राहत असल्याने त्याच्याविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २९९ अन्वये कार्यवाही करण्यात आली होती. फिर्यादी हे एका वित्तीय संस्थेमध्ये शाखाधिकारी म्हणून कार्यरत असताना आरोपींनी बनावट कागदपत्रे व खोटी माहिती सादर करून वाहन कर्ज मंजूर करून घेतले. वाहन तारणाशी संबंधित कागदपत्रांमध्ये बनावटपणा करून वित्तीय संस्थेची आर्थिक फसवणूक करण्यात आली. ही बाब उघडकीस आल्यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी मूळ गावाच्या परिसरात येणार असल्याची माहिती पथकातील पोलीस हवालदार दत्तात्रय शिंदे यांना मिळाली. पथकाने तात्काळ सापळा रचला व आरोपीला शिताफीने ताब्यात घेऊन एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने आरोपीस न्यायालयीन कोठडी सुनावली. सदरची कारवाई वरीष्ठांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे, विनोद चलवाड, श्रीनिवास जांभळे यांनी केली आहे.



## विविध वृत्त.....

### शिवराज पाटील यांच्या स्मारकाबाबत काँग्रेस पक्ष चाकूरकर परिवाराच्या सूचनांचा करणार सन्मान



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार, दि. ५ ऑगस्ट रोजी देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पुतळ्याच्या संदर्भाने महापौरांसह शिष्टमंडळाने 'देवघर' या निवासस्थानी शैलेश पाटील चाकूरकर यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या संदर्भात चाकुरकर परिवाराच्या सूचनांचा सन्मान केला जाणार आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे,

सभागृह नेते विजयकुमार साबदे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर व माजी अध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. किरण जाधव यांनी 'देवघर' या निवासस्थानी शैलेश पाटील चाकूरकर यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. चाकूरकर परिवारांच्या दिशानिर्देशांचे पालन लातूर शहर महानगरपालिका करेल, असे महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांनी आश्र्वस्त केले. येत्या चार दिवसांमध्ये परिवारांच्या सर्व सदस्यांशी चर्चा करून याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

## पिके फवारणीची कामे सुरू

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : लातूर जिल्ह्यात खरीप हंगामात शेतकऱ्यांनी तुर, मुग, उडीद, सोयाबीन, ज्वारी, बाजरी, मका आदी पिकांचा पेरा केला आहे. ज्या शेतकऱ्यांनी सुरूवातीला पेरण्या केल्या आहेत. या पिकांचे किडीपासून संरक्षण करण्यासाठी शेतकरी फवारण्या करत आहेत. सध्या पावसाची तुरळक ठिकाणी हजेरी दिसून येत आहे.

सध्या शेतकरी पिकांच्या अंतर्गत मशागतीमध्ये व्यस्त आहे. लातूर जिल्ह्यात पिकांच्या वाढीसाठी दमदार पावसाची गरज आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्र्नही मार्गी लागणार आहे.

## शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : लातूर शहरात विकासाच्या नावाखाली चांगल्या स्थितीत असलेले रस्ते खोदून ठेवले आहेत. पावसाच्या सरी कोसळल्यानंतर या रस्त्यावरून दुचाकी घेऊन जाणे जिकीरीचे होत आहे. तसेच चालतानाही नागरीकांना कसरत करून चालावे लगत आहे. अनेक ठिकाणी चिखलातून नागरीकांना वाट सर करावी लागत आहे.

रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्याने त्यात पाणी साचत असल्याने वाहन चालकांना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने अचनकपणे आपघात घडत आहेत. नागरीकांना या रस्त्याच्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

# सत्ताधारी - विरोधकांच्या वादात लातूरच्या विकासाचे होणार ' तीनतेरा' ?

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ ऑगस्ट : बुधवारी पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेला अभूतपूर्व गदारोळ आणि गोंधळ पाहून भविष्यात सत्ताधारी काँग्रेस आणि विरोधी बाकावरील भाजपा यांच्यातील वादात चक्क लातूरच्या विकासाचे ' तीनतेरा' होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसात लातूरकरांना आपण काँग्रेसच्या हाती मनपाची सूत्रे सोपवूनमोठी घोडचूक तर केली नाही ना ? असा प्रश्र्न पडल्यास नवल वाटू नये.लातूर शहर मनपाच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत लातूरच्या मतदारांनी केंद्र आणि राज्यात सत्तेत असलेल्या भारतीय जनता पार्टी - महायुतीला डावलून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसवर विश्र्वास दाखविला होता. अनपेक्षितपणे मनपा निवडणुकीत काँग्रेस दोन तृतीयांशापेक्षाही अधिक जागा जिंकण्यात यशस्वी ठरली. लातूरच्या या निकालाचे अनेकांना आश्र्चर्य आणि कौतुकही वाटले. शहराच्या सर्वांगीण



विकासासाठी सत्ताधारी भाजप महायुतीच्या हाती मनपाच्या सत्तेच्या चाव्या मतदार सोपवतील असा सर्वांचा कयास होता. पण, काहीतरी वेगळे करणार नाहीत तर ते लातूरकर कसे ? जणू याच कारणावरून सत्ता काँग्रेसच्या हाती सोपविली गेली असावी. लातूर शहर मनपाची सर्वसाधारण सभा बुधवारी आयोजित करण्यात आली होती. या सभेत एकूण २८ विषय चर्चेला घेण्यात येणार होते. या सभेत शहराच्या बोधे नगर परिसरात झालेल्या दुर्घटनेत खड्ड्यातील पाण्यात बुडून मृत्युमुखी पडलेल्या दोन बालकांच्या कुटुंबियांना दहा लाखांची आर्थिक मदत देण्याचा विषय सोडता बाकी एकाही विषयावर प्रत्यक्षातचर्चा होऊ शकली नाही.देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री तथा लातूर नगर परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मारकाच्या मुद्द्यावरूनहीसत्ताधारी आणि विरोधी सदस्यातचांगलीचबाचाबाची झाली. मनपा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारच्या निधीतून मनपा आवारात चाकूरकरांचे स्मारक उभारण्याची घोषणा केली होती. मात्र, मनपातकाँग्रेसची सत्ता आल्यानंतर आणि चाकूरकर काँग्रेस पक्षाचेच ज्येष्ठ नेते असतानाही काँग्रेस नेतृत्वाने त्यांचा पुतळा मनपा आवाराऐवजी आदर्श कॉलनी परिसरात उभारण्याचा प्रयत्न केल्याचे भाजप सदस्यांचे म्हणणे होते. या कारणावरून सभागृहात बराच वाद चालला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी पुतळ्या उभारणीच्या कामातही सत्ताधारी काँग्रेस हेतुतः उशीर करत असल्याचा आरप केला गेला. या पुतळ्याच्या उभारणीसाठी शासनाकडून दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊनही हा प्रकार चालू असल्याबद्दल विरोधकांनी नाराजी व्यक्त केली.शहराच्या विकासासाठी काही किरकोळ अपवाद वगळता सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांनी एकत्रित येणे अतिशय आवश्यक असते. विरोधासाठी विरोध करण्याचे धोरण दोहोंनीहीकटाक्षाने टाळलेपाहिजे. तात्विक मुद्द्यावर मतभेद असणे साहजिक आहे. पण, नाहकविरोधासाठी विरोध ही भूमिका सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही ठेवता कामा नये,अशा प्रतिक्रिया काल सर्वसाधारण सभेत झालेल्या वादावादीचा विषय सामान्य लातूरकरांच्या कानावर आल्यानंतर व्यक्त होत असलेल्या ऐकायला मिळाल्या. शहराचा विकास साधायचा असेल तर सत्ताधारी काँग्रेसनेही विरोधी भाजप सदस्यांना विश्र्वासात घेऊन चालणे गरजेचे आहे. अन्यथा दोघांच्या वादात लातूरच्या विकासाचे अक्षरशः ' तीनतेरा' झाल्याशिवाय राहणार नाहीत,असे एकंदर परिस्थितीवरून निदर्शनास येत आहे. दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी आपआपल्या पक्षाच्या सदस्यांना शहराच्या विकासाच्या मुद्द्यावर तरी किमान हातात हात घालून काम करण्याचा सल्ला दिला पाहिजे,असे दिसून येत आहे.

## मांजरा साखर कारखान्याच्या यशाबद्दल सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांचा धिरज देशमुख यांनी केला सत्कार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या यशाबद्दल कारखान्याचे चेअरमन माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचा सत्कार लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांनी केला.

विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याला द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनचा 'बेस्ट शुगर फॅक्टरी २०२६' विशेष पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच १०० टक्के ऊसतोड हार्वेस्टरद्वारे करणारा देशातील पहिला साखर कारखाना हणून मांजरा साखर कारखान्याने नवा आदर्श निर्माण केला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मांजरा परिवाराचे मार्गदर्शक, सहकार महर्षी तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा रेणा साखर कारखाना येथे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी सत्कार केला. यावेळी राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील, रेणा कारखान्याचे चेअरमन अनंतराव ठाकूर-देशमुख, माजी चेअरमन सर्जेराव मोरे, व्हाईस



चेअरमन प्रवीण पाटील, रणजित पाटील, कार्यकारी संचालक बी. व्ही. मोरे, सचिव रविशंकर बरमदे आदींची उपस्थिती होती.

मांजरा साखर कारखान्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत ऊसतोडणीची प्रक्रिया हार्वेस्टरच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा उपक्रम राबविला. ऊसतोडणीसाठी मजुरांची कमतरता, वाढते ऊस क्षेत्र आणि गाळप हंगामातील विलंब यावर प्रभावी उपाय म्हणून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनातून सुरू झालेल्या या उपक्रमाला शेतकरी आणि तरुणांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी व होतकरू तरुणांना हार्वेस्टर खरेदीसाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांनी हार्वेस्टर खरेदी करून ते साखर कारखान्याच्या ऊसतोडणीसाठी उपलब्ध करून दिले. परिणामी, २०२५-२६ च्या गाळप हंगामात ८० हार्वेस्टरच्या माध्यमातून कारखान्याची १०० टक्के ऊसतोडणी पूर्ण करण्यात आली.

सहकार, शेतकरी हित आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालत मांजरा साखर कारखान्याने मिळविलेले हे यश संपूर्ण साखर उद्योगासाठी दिशादर्शक ठरले असून, या कामगिरीबद्दल राज्यभरातून मांजरा परिवाराचे कौतुक होत आहे.

## 'दयानंद वाणिज्य 'मध्ये 'स्टुडंट इंडक्शन प्रोग्राम'

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथील वाणिज्य विभागाच्या वतीने सोमवारी बी.कॉम. व एम. कॉम. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'स्टुडंट इंडक्शन प्रोग्राम' उत्साहपूर्ण वातावरणात दयानंद सभागृहात संपन्न झाला. नवीन विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन जीवनात स्वागत करत त्यांना उच्च शिक्षण, करिअर नियोजन, व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगाराभिमुख कौशल्यांची माहिती देण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत मान्नीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून शशिकांत बोराळकर, रमेश गुप्ता व अमित अग्रवाल, डॉ. मनीषा आष्टेकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, डॉ. बाळासाहेब चव्हाण उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना बदलत्या जागतिक स्पर्धेच्या युगात केवळ पदवी पुरेशी नसून संवाद कौशल्य, डिजिटल स्किल्स, नेतृत्वगुण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि सातत्याने स्वतःला अद्ययावत ठेवण्याची गरज अधोरेखित केली. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच कौशल्यविकासावर भर दिल्यास रोजगाराच्या विविध संधी सहज उपलब्ध होऊ शकतात, असे त्यांनी सांगितले. यावेळी साईनाथ उमाटे, डॉ. अशोक वाघमारे, डॉ. विठ्ठल जाधव, प्रा. दगडू शेख, प्रा. योगेश शर्मा यांनी आपल्या विभागाची थोडक्यात माहिती दिली.

प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपस्थित तज्ज्ञांशी संवाद साधला. करिअर मार्गदर्शन, उद्योग क्षेत्रातील संधी आणि कौशल्यविकासाविषयी विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित हा इंडक्शन कार्यक्रम त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मनिषा आष्टेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. लता जाधव यांनी केले. प्रा. ऐश्र्वर्या कुलकर्णी यांनी आभार मानले.

## क्विक हिल फाऊंडेशन तर्फे सुरक्षित इंटरनेट वापरासाठी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा प्रशिक्षण



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात व जवळच्या गावात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत श्री रामनाथ विद्यालय आलमला ता. औसा जि.लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.

दि. ४ जुलै २०२६ रोजी सकाळी १०:०० ते ११:०० या वेळेत झालेल्या या सत्रात इयत्ता पाचवी ते दहावीच्या २५० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर वॉरिअर जाधव योगिता आणि सायबर वॉरिअर बोरूळे प्राजक्ता यांनी फोटो मॉर्फिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख)च्या माध्यमातून फोटो तयार करण्याची प्रक्रिया, एआयचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर, मजबूत परवलीचा शब्द (पासवर्ड) तयार करण्याचे महत्त्व याबाबत उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही प डाउनलोड करताना कोणत्या परवानग्या द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याशिवाय ऑनलाइन फसवणूक, बनावट संकेतस्थळांच्या दुव्यांपासून सावध राहणे, ओटीपी फसवणूक, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर तसेच डिजिटल गोपनीयतेचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्र्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.

कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ आंबुलगे यांचे मार्गदर्शन लाभले. आयोजनासाठी समस्त शिक्षक मंडळी व बाकी सर्व सदस्यांनी विशेष सहकार्य केले. विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनावे, असे आवाहन करण्यात आले.

## ४७ दिवसांत ९,४२० नागरिकांशी थेट संवाद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : पोलीस आपल्या दारी, सुरक्षित समाजाची

हमी या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत लातूर जिल्हा पोलीस दलाने राबविलेल्या पोलीस आपल्या सोसायटीमध्ये या अभिनव उपक्रमाला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. दि. १५ जून ते ३१ जुलै या ४७ दिवसांच्या कालावधीत लातूर जिल्ह्यातील शहरी भागातील १० पोलीस ठाण्यांनी ३१४ सोसायट्या व वस्त्यांना भेटी देत तब्बल ९,४२० नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधला. या संवादातून नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या, अनेक तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात आले आणि कायदा-सुव्यवस्था तसेच नागरिकांच्या सुरक्षेसंदर्भात क्षसदमात व्यापक जनजागृती करण्यात आली. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सोसायट्या, वसाहती आणि निवासी भागात जाऊन नागरिकांशी मुक्त संवाद साधला. त्यांच्या समस्या, सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या आणि त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्र्वासन दिले. या उपक्रमामध्ये अहमदपूर पोलीस ठाण्याने ४६, औसा पोलीस ठाण्याने ४१, गांधी चौक व चाकूर पोलीस ठाण्यांनी प्रत्येकी ३१, शिवाजीनगरने ३०, उदगीर शहर व उदगीर ग्रामीणने प्रत्येकी २७, एमआयडीसी व विवेकानंद चौकने प्रत्येकी २६, तर निलंगा पोलीस ठाण्याने २३ भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला.

## योग्य मार्गदर्शन आणि अभ्यासात सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली!

# 'एलन'चे शाखा प्रमुख सिंग यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ ऑगस्ट : डॉक्टर किंवा इंजिनिअर होण्याचं स्वप्न असेल, तर योग्य मार्गदर्शन आणि अभ्यासात सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय समोर ठेवून वेळेचे नियोजन केल्यास हमखास यश मिळते, असा मौलिक सल्ला एलन करिअर अकॅडमीचे शाखा प्रमुख तथा अकॅडमिक हेड ए. के. सिंग यांनी दिला.





येथील राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास 'एलन'च्या टीमने बुधवारी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी 'एलन'चे बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर पवन तिवारी, संस्थाध्यक्ष के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्रा. बी. बी. खटके, एस. एम. गुरमे, आर. एन. पटने, ए. एस. खोत, एम. डी. मोटाडे, ए. बी. मुंडे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर आदी उपस्थित होते.

यावेळी सिंग म्हणाले, सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी इयत्ता ७वी किंवा ८वी पासून अभ्यासाची तयारी करावी. राष्ट्रीय पातळीवरील नीट व जेईई परीक्षेससह स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. यासाठी एलन करिअर अकॅडमीच्यावतीने विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून त्यांना परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी 'टॅलेन्ट टेक्स'ची सुरुवात करण्यात आली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या नीट परीक्षेच्या निकालात चार टॉपर विद्यार्थ्यांमागे 'एलन'चा एक विद्यार्थी आहे. राजमाता जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीही 'टॅलेन्ट टेक्स'चा लाभ घेऊन आपले स्वप्न साकार करावे, असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवणे गरजेचे आहे. परीक्षा ही एक संधी आहे. परीक्षेला धैर्याने सामोरे जा. 'टॅलेन्ट टेक्स'चा पर्याय निवडून यश संपादन करा, असे यावेळी तिवारी म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे यांनी संकुलाच्या प्रगतीचा वाढता आलेख मांडला. या संकुलाची विद्यार्थिनी संस्कृती पवार हिने नीट परीक्षेत ६९० व भूषण घरटे याने ६९२ गुण मिळविले आहेत. याबरोबरच अनेक विद्यार्थी डॉक्टर व इंजिनिअर बनले आहेत. यश मिळविण्यासाठी कोणत्या बाबींवर लक्ष केंद्रीत करावे, याबाबत 'एलन'च्यावतीने मार्गदर्शन करण्यात येते. याचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवत नामवंत कॉलेजमधून डॉक्टर व इंजिनिअर बनण्याचे ध्येय साध्य करावे, असे ते म्हणाले. सूत्रसंचालन प्रा. वैशाली पाटील यांनी केले तर आभार राजीव मुंढे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



Late. B. E. Chanshetti Guruji Pratishthan's
GLOBAL VILLAGE
PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE, BORAMANI
Boramani, Tal: South Solapur, Dist: Solapur 413 003
CBSE Affiliation No. 1130935
ADMISSIONS OPEN 2026-27
LKG / UKG & I to VI CLASSES
LEARN • INNOVATE • CREATE • LEAD
Features of Global Village Education
NAI TALIM (Learning by Doing)
Experiential and activity-based learning.
Skill development through productive work.
Vocational education integrated with academics.
Development of self-reliance, creativity, and leadership.
Community service and social responsibility.
Eco-friendly practices and sustainability projects.
Hands-on activities such as soap making, phenyl, perfume, detergent powder, gulkand, chikki, and other entrepreneurship projects.
ULIPSU – Future Ready Learning
Coding and Programming.
Artificial Intelligence (AI).
Robotics and Automation.
Design Thinking.
Financial Literacy.
Entrepreneurship Skills.
Communication & Soft Skills.
Logical and Computational Thinking.
21st Century Skills aligned with NEP 2020.
ATL (Atal Tinkering Lab)
Innovation and Creativity.
Robotics and Electronics.
Arduino and IoT Projects.
3D Design & Prototyping.
STEM-based Learning.
Scientific Research and Experimentation.
National Innovation Competitions.
Problem Solving and Critical Thinking.
Mathematics Laboratory
Activity-based Mathematics.
Learning through Mathematical Models.
Geometry and Measurement Kits.
Logical Reasoning Activities.
Mathematical Games and Puzzles.
Data Handling and Statistics.
Hands-on Concept Learning.
Real-life Applications of Mathematics.
Science Laboratory
Physics, Chemistry & Biology Experiments.
Observation and Investigation Skills.
Scientific Temper and Inquiry.
Practical Learning through Experiments.
Laboratory Safety and Discipline.
Environmental Science Activities.
Innovation and Scientific Research.
Project-based STEM Learning.
Robotics & Coding
Science Experiments
Maths Lab Activities
Tinkering Lab
Vocational Activities
Outdoor Learning
EXPERIENCED & DEDICATED FACULTY
SAFE & NURTURING ENVIRONMENT
VALUE-BASED & HOLISTIC EDUCATION
SKILL DEVELOPMENT & ENTREPRENEURSHIP
TRANSPORT & HOSTEL FACILITY
For Admissions & More Information
9552642900
9552707900
School Bus Facility Available
Hostel Facility For Boys & Girls
Our Vision
"Nurturing Minds, Building Futures through Innovation, Values, Skill Development, and Experiential Learning."
Ms. Asama Nadaf
Principal
LEARN INNOVATE CREATE LEAD
Together Towards a Better Tomorrow...




सन्माननिय उद्योजक
दैनिक तरुण भारतच्या
४२ व्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा!
जगदंबा ग्रुप
इंडियनऑपल
विश्वास नात्यांचा, ध्यास नाविन्याचा!
एके'ज जगदंबा पेट्रोलियम
डॉ. अजयकुमारजी महादेव करंडे
प्रमुख-जगदंबा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज
शुभेच्छुक
जगदंबा प्रायव्हेट लिमिटेड
जगदंबा ज्वेलर्स
जगदंबा पेट्रोलियम
जगदंबा ॲग्रो इंडस्ट्रीज
जगदंबा टेक्स्टाईल
उत्कर्ष फाऊंडेशन आणि
समस्त ग्रामस्थ सासुरे, ता. बार्शी




सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
आस्था फाऊंडेशन, सोलापूर
आस्था रोटी बँक
आस्था रोटी बँकेतर्फे दररोज
सिव्हिल हॉस्पिटलमध्ये व
निराधार महिलेंना मोफत
अन्नदान केले जाते.
आस्था रोटी बँकेचे अध्यक्ष
विजय छंचुरे
आस्था रोटी बँकेचे सल्लागार
राजू हौशेट्टी




सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
एस.पी.पब्लिक स्कूल, नांदोरे
वेदांत अकॅडमी नांदोरे,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर
S.P. PUBLIC SCHOOL NANDORE Tal. Pandharpur
VEDANTA ACADEMY THE FUTURE BEGINS HERE
अकॅडमीची वैशिष्ट्ये
सुसज्ज इमारत
इ.१ ली पासून मराठी व इंग्रजी माध्यमातून स्पर्धा परीक्षेची तयारी
इ.४ थी व ७ वी स्कॉलरशिपची तयारी
इ.५ वी नवोदय व सैनिक स्कूल स्वतंत्र बॅच
इ.६वी पासून JEE, NEET, NDA Foundation कोर्स
देशपातळीवरील ऑलिंपियाड व डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा यासारख्या परीक्षेची तयारी
NCERT (CBSE) अभ्यासक्रमाची सोय
अत्याधुनिक टेक्नॉलॉजीचा वापर
अधिक माहितीसाठी
8975785555
9921577555
शुभेच्छुक
प्रशाला पदाधिकारी, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वृंद




तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा




सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिन...
हार्दिक शुभेच्छा
लोकमंगल बँक
अखंड गतीतून सार्थकता
लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर
मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : ०२१७ – २७३५५०३
१२% व्याज परतावा कर्ज योजना
सर्व प्रकारच्या व्यवसायाकरिता बँकेकडून आर्थिक साहाय्य
महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
अण्णासाहेब पाटील
आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत
महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर
आर्थिक विकास महामंडळ
कमाल कर्ज मर्यादा रक्कम
रू. १५ लाख
महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय
वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित
उपकंपनी – शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत
महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
वसंतराव नाईक
विमुक्त जाती व भटक्या जमाती
विकास महामंडळ (मर्यादित) अंतर्गत
सर्व प्रकारच्या अन्न प्रक्रिया व्यवसायासाठी
कर्ज उपलब्ध.
प्रधानमंत्री फुड प्रोसेसिंग योजने अंतर्गत
३५% पर्यंत सबसीडी
AAI
पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजिकांचे सक्षमीकरण
महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
'आई' महिला केंद्रित पर्यटन धोरण अंतर्गत
व्याज परतावा योजना
(फक्त महिलांसाठी)
कमाल कर्ज मर्यादा रक्कम
रू. १५ लाख
आजच बँकेच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.




दै. तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
मा.श्री.
सचिन (दादा) कल्याणशेट्टी
आमदार, अक्कलकोट
MCS
महिंद्रा
क्रॉप सायन्सेस
An ISO 9001 : 2008 Certified Company
उत्पादक
पिक संजीवके, सुक्ष्म अन्नद्रव्य, सेंद्रीय खते
गट नं. ५६, कासेगांव, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर
मो. 9326777689
श्री. बालाजी चौगुले
सचिव, सोलापूर जिल्हा सिड्स् फर्टिलायझर डिलर्स असोसिएशन, सोलापूर.
SIDDHI
बलवान
Sampanna
SAMRAT
Super Riddhi
SILICON

# सोलापूर विकास आणि सोलापूरचे पर्यटन

भारतातील ऐतिहासिक शहरांपैकी एक असणारे महाराष्ट्रातील सोलापूर हे शहर होय. सोलापूरला तसा स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आहे. स्वातंत्र्यानंतर राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक या चारही बाबत सोलापूरचा सर्वार्थाने विकास होत असल्याचे दिसून येते. याबाबत सोलापूरने विशेष स्थान राखून ठेवल्याचे दिसून येते.




सोलापूर हे राज्यातील एक महत्त्वाचे शहर आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या राज्यांच्या सीमेलगत असल्यामुळे सोलापूरला भौगोलिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ऐतिहासिक वारसा, धार्मिक स्थळे, वस्त्रोद्योग, शेती, आधुनिक विकासकामे आणि पर्यटनाची वाढती क्षमता यांमुळे सोलापूर जिल्हा राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

गेल्या काही दशकांत सोलापूरमध्ये पायाभूत सुविधा, शिक्षण, उद्योग, वाहतूक, आरोग्य आणि पर्यटन या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली आहे. त्यामुळे सोलापूर हे केवळ औद्योगिक शहर न राहता विकास आणि पर्यटन यांचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे.

औद्योगिक विकासाबाबत पाहिले असता सोलापूरला कापड उद्योगाचे शहर म्हणून ओळखले जाते. येथील प्रसिद्ध सोलापुरी चादरी, टॉवेल आणि हातमाग उद्योगाला देशभरात तसेच परदेशातही मोठी मागणी आहे. सोलापुरी चादर ही येथील ओळख बनली असून अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह या उद्योगावर अवलंबून आहे. औद्योगिक विकासासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मार्फत औद्योगिक वसाहती विकसित करण्यात आल्या आहेत. याठिकाणी वस्त्रोद्योग, अभियांत्रिकी, प्लास्टिक, रसायन, अन्न प्रक्रिया, औषधनिर्मिती आणि इतर लघु व मध्यम उद्योग कार्यरत आहेत. त्यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. सोलापूर जिल्हा कृषिप्रधान असून याला ज्वारीचे कोठार म्हणून एक वेगळी ओळख आहे. येथे ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा, ऊस, डाळी, डाळिंब आणि द्राक्षांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. विशेषतः डाळिंब उत्पादनासाठी सोलापूर देशभर प्रसिद्ध आहे. उजनी धरणामुळे अनेक भागात सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली असून आधुनिक शेती, ठिबक सिंचन, सेंद्रिय शेती, फळबागा आणि जलसंधारण योजनांमुळे कृषी उत्पादनात वाढ झाली आहे. शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक फायदेशीर करण्याचा प्रयत्न करत आहेत.

वाहतूक विकासाबाबत आढावा घेतला असता सोलापूर हे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीचे महत्त्वाचे केंद्र आहे. मुंबई, पुणे, हैदराबाद, बेंगळुरू, चेन्नई, नागपूर, दिल्ली आणि इतर प्रमुख शहरांशी रेल्वेने तसेच राष्ट्रीय महामार्गांद्वारे उत्तम संपर्क आहे. अलीकडील काळात शहरातील रस्त्यांचे रुंदीकरण, उड्डाणपूल, चौकांचे सुशोभीकरण, सार्वजनिक वाहतुकीतील सुधारणा आणि नवीन रस्त्यांच्या निर्मितीमुळे वाहतुकीची सुविधा अधिक चांगली झाली आहे.

शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र म्हणूनही सोलापूर विकसित झाले आहे. येथे अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी, व्यवस्थापन, कला, विज्ञान, वाणिज्य आणि कृषी शिक्षणासाठी अनेक नामांकित महाविद्यालये आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामुळे उच्च शिक्षणाला चालना मिळाली आहे. संशोधन, कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षण यांनाही महत्त्व प्राप्त झाले आहे. वैद्यकीय क्षेत्राबाबत आसपासच्या जिल्ह्यांसाठी सोलापूर हे एक वरदान मानले जाते. सोलापूरमध्ये शासकीय आणि खासगी रुग्णालयांची संख्या मोठी आहे. जिल्हा रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालये, आधुनिक निदान केंद्रे आणि विविध विशेष उपचार सुविधा उपलब्ध आहेत. ग्रामीण भागात आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि आरोग्य मोहिमांमुळे नागरिकांना वैद्यकीय सेवा अधिक सहज उपलब्ध होत आहेत.

ऊर्जा क्षेत्रातील विकास हा एक सोलापूरसाठी मैलाचा दगड ठरला आहे. जिल्ह्यात सौरऊर्जेला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. मुबलक सूर्यप्रकाशामुळे सौरऊर्जा प्रकल्प विकसित करण्यात आले आहेत. हरित ऊर्जा निर्मितीमुळे पर्यावरण संरक्षणास मदत होत असून औद्योगिक विकासालाही चालना मिळत आहे. नागरी विकास याबाबत महानगरपालिकेमार्फत स्वच्छता, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, उद्यानांची निर्मिती, स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर, रस्ते विकास, एलईडी दिवे आणि नागरिकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. शहरातील उद्याने, व्यापारी संकुले, गृहनिर्माण प्रकल्प आणि सार्वजनिक सेवा यामध्ये सातत्याने सुधारणा होत आहे.

सोलापूरचे पर्यटन क्षेत्र हे विकसित व विकसनशिल असे आहे. हा जिल्हा धार्मिक, ऐतिहासिक, नैसर्गिक आणि सांस्कृतिक पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. दरवर्षी लाखो पर्यटक येथे भेट देतात. त्यात प्रामुख्याने खालील पर्यटन क्षेत्रांचा समावेश आहे.

**१. श्री. सिद्धेश्वर देवस्थान :-**

सोलापूर शहराच्या मध्यभागी असलेले श्री सिद्धेश्वर मंदिर हे शहराचे प्रमुख आकर्षण आहे. हे मंदिर तलावाच्या मध्यभागी असून अत्यंत सुंदर परिसरामुळे भाविक आणि पर्यटक येथे मोठ्या संख्येने येतात. मकर संक्रांतीच्या काळात येथे मोठी यात्रा भरते. मंदिरातील धार्मिक वातावरण, तलाव आणि सुंदर परिसर पर्यटकांना आकर्षित करतात. सर्वांनी सहकुटुंब यावे व पहावे असे हे तीर्थक्षेत्र आहे.

**२. भुईकोट किल्ला:-**

सोलापूरमधील भुईकोट किल्ला हा ऐतिहासिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे. बहामनी आणि आदिलशाही काळातील वास्तुकलेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून हा किल्ला ओळखला जातो. किल्ल्यातील मजबूत तटबंदी, दरवाजे, बुरुज आणि ऐतिहासिक वारसा यामुळे याला विशेष महत्त्व आहे.



प्रा. डॉ. गुरबसप्पा करपे
भ्र. ९४२१९०८८९१

**३. अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिर: –**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट हा तसा कर्नाटक राज्याच्या सीमा वरती भागातील तालुका आहे. हे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या वास्तव्यामुळे संपूर्ण देशात व विदेशातही प्रसिद्ध आहे. दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. स्वामी समर्थ मंदिर, वटवृक्ष मंदिर आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे अक्कलकोट हे प्रमुख तीर्थक्षेत्र बनले आहे.

**४. पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर:–**

पंढरपूर हे महाराष्ट्राचे प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. श्री विठ्ठल– रुक्मिणी मंदिरामुळे पंढरपूरला जागतिक स्तरावर ओळख मिळाली आहे. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला लाखो वारकरी पायी वारी करून येथे येतात. चंद्रभागा नदी, वारकरी परंपरा आणि भक्तिमय वातावरण हे प्रमुख आकर्षण आहे.

**५. उजनी धरण: –**




उजनी धरण हे महाराष्ट्रातील महत्त्वाच्या धरणांपैकी एक आहे. या धरणामुळे सिंचन, पाणीपुरवठा आणि मत्स्यव्यवसायाला चालना मिळाली आहे. हिवाळ्यात येथे अनेक स्थलांतरित पक्षी येतात. त्यामुळे पक्षीनिरीक्षण आणि निसर्ग पर्यटनासाठी हे आकर्षणाचे केंद्र बनले आहे.

**६. धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटन:–**

सोलापूर जिल्ह्यात विविध धर्मांची मंदिरे, दर्गे, चर्च आणि जैन मंदिरे आहेत. त्यामुळे धार्मिक सलोखा आणि सांस्कृतिक वैविध्य अनुभवण्याची संधी पर्यटकांना मिळते. लोककला, भजन, कीर्तन, भारूड, वारकरी परंपरा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम हे सोलापूरच्या पर्यटनाला समृद्ध करतात. पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. हॉटेल व्यवसाय, वाहतूक, हस्तकला, मार्गदर्शक सेवा, स्थानिक बाजारपेठ आणि लघुउद्योग यांना रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतात.

सोलापुरी चादरी, टॉवेल, हस्तकला वस्तू, पारंपरिक खाद्यपदार्थ आणि स्थानिक उत्पादने पर्यटकांमुळे अधिक लोकप्रिय होत आहेत. त्यामुळे स्थानिक कारागीर आणि व्यापाऱ्यांना आर्थिक लाभ मिळतो. येथील जर पर्यटनाची वृद्धी करायची असेल त्यांचा अधिकचा सांभाळ करून भविष्यात याची मोठी वाढ करायची असेल तर पर्यटनस्थळांवर स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणावर भर देणे. पर्यटकांसाठी माहिती केंद्रे आणि मार्गदर्शक सुविधा उपलब्ध करणे. रस्ते, पार्किंग, स्वच्छतागृहे आणि निवास व्यवस्था सुधारणा करणे. ऐतिहासिक वास्तूंचे जतन आणि संवर्धन करणे. स्थानिक संस्कृती, कला आणि हस्तकलेचा प्रचार करणे. डिजिटल माध्यमांतून पर्यटनाचा प्रसार करणे. पर्यावरणपूरक पर्यटनाला प्रोत्साहन देणे. स्थानिक युवकांना पर्यटनाशी संबंधित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

## सोलापूरची ओळख व्यापक होईल

सोलापूरचा विकास हा केवळ जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावणारा आहे. वस्त्रोद्योग, शेती, ुग्धव्यवसाय, अन्न प्रक्रिया, सौरऊर्जा, व्यापार आणि सेवा क्षेत्रामुळे जिल्ह्याची आर्थिक प्रगती सातत्याने होत आहे. रेल्वे आणि रस्ते संपर्कामुळे व्यापार वाढला असून कृषी उत्पादनांची देशभर वाहतूक सुलभ झाली आहे. पर्यटनामुळे सेवा उद्योगालाही मोठी चालना मिळत आहे. सोलापूर हे इतिहास, संस्कृती, उद्योग, शेती, शिक्षण आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम असलेले शहर आहे. औद्योगिक विकास, आधुनिक पायाभूत सुविधा, कृषी प्रगती, शिक्षणाचा विस्तार आणि पर्यटनाच्या वाढत्या संधी यांमुळे सोलापूरची ओळख दिवसेंदिवस अधिक व्यापक होत आहे.

**श्री सिद्धेश्वर मंदिर, भुईकोट किल्ला, अक्कलकोट, पंढरपूर, उजनी धरण यांसारखी पर्यटनस्थळे सोलापूरला विशेष आकर्षण प्राप्त करून देतात. भविष्यात शाश्वत विकास, पर्यावरण संरक्षण, पर्यटन सुविधा आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन यांवर अधिक भर दिल्यास सोलापूर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर अधिक ठळकपणे झळकेल. महाराष्ट्र सरकारचे सोलापूर जिल्ह्याकडे विशेष लक्ष आहेच. तरीही जिल्ह्याच्या विकासासाठी व पर्यटन क्षेत्राच्या वृद्धीसाठी शासनाने अधिकचा निधी देऊन हे दोन्ही छत्र विकसित करावेत अशी अपेक्षा आहे. सर्वांगीण विकास आणि समृद्ध पर्यटन यांच्या बळावर सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत राहील आणि विकासाचे आदर्श मॉडेल म्हणून पुढे येईल. यात तीळमात्र शंका नाही.**



# "दक्षिण मुखी गौडगाव मारुती स्थान महात्म"




**स्वामी समर्थांच्या पुण्यपावन अक्कलकोट तालुक्यात श्रीक्षेत्र गौडगांव बु।। हे दक्षिणमुखी मारुतींचे जागृत व मनोकामना पूर्ण करणारे स्थान म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे. श्रीक्षेत्र गौडगांव हे स्वामी समर्थ महाराज मंदिर अक्कलकोट पासून ११ कि. मी. आणि अक्कलकोट रेल्वे स्टेशनपासून २ कि. मी. अंतरावर आहे. या मारुतींची उपासना केल्याने अनेक भाविकांचे मनोकामना पूर्ण झालेले आहे. हे जागृत मारुती मंदिर सुमारे चारशे वर्षापूर्वीचे आहे. हनुमंत अवतार रामदास स्वामींनी या मारुतीची स्थापना केली.**

या मारुतीची मूर्ती शेंदरी रंगाची आहे. या मारुती मंदिरास कळस आहे. हा मारुती दक्षिणमुखी असून त्याला एकमुख असून एकच डोळा आहे. हा मारुती गदाधारी आहे. या गदाधारी हनुमानाच्या दर्शनाने संकटे, समस्या, वास्तुदोष नाहीसे होतात. म्हणून या मारुतीस संकटमोचन मारुती म्हणतात. श्रीक्षेत्र गौडगाव येथील हा मारुती शेंडीधारी आहे. शेंडीधारी मारुती क्वचित असतो. या जागृत मारुतीच्या संपूर्ण शरीराभोवती शेपटी आहे.

या मारुतीच्या वारंवार दर्शनाने आपल्या शरीराभोवती शेपटीप्रमाणे एक अदृश्य संरक्षक कवच तयार होते. या मारुतीच्या डाव्या बाजूस शंकराची पिंड आहे. हे जागृती मारुती मंदिर हेमाडपंथी असून संपूर्ण बांधकाम कोरीव दगडात चुना व वाकुने केले आहे. सिमेंटचा कोटेही वापर नाही. संपूर्ण मंदिर दक्षिणमुखी आहे.

मंदिराच्या दर्शनी महाद्वारावर हेमाडपंथी दगडी छत असून त्यावर प्रभू श्रीराम व सीतामाईस खांद्यावर घेऊन बसलेल्या हनुमानाची मोठी बैठी दगडी मूर्ती आहे. जागृत मारुतीचा गाभारा छोटासा असून गाभाऱ्यात खाली वाकूनच प्रवेश करावा लागतो. गाभाऱ्यासमोर चौकात आवार आहे. या आवाराच्या डाव्या, उजव्या व समोरच्या बाजूस



असलेल्या दगडी भिंतीत नऊ छोटे देव्हारे असून त्यात नऊ देवांच्या मूर्तीची स्थापना विश्वस्त समितीने केलेली आहे. या नऊ मूर्ती स्थापन करण्याचे कारण म्हणजे पूर्वी मारुतीची प्राणप्रतिष्ठापना करताना समर्थ रामदास स्वामींच्या मनात मूर्तीसमोरील आवारात नवग्रहाची स्थापना करण्याचा विचार होता पण त्यावेळी नवग्रहाची स्थापना झाली नाही.

समर्थ रामदास स्वामींचा अपूर्ण संकल्प विश्वस्त समितीने नऊ देवतांच्या मूर्तीची स्थापना करून पूर्ण केला आहे.

पूर्वी गाभाऱ्यासमोरील आवारात विहीर होती. या विहिरीत स्नान करून भाविक मारुतीचे दर्शन घेत असत. या जागृत मारुती मंदिराच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले असून थोड्याच कालावधीत तेथे निसर्गरम्य वातावरण निर्माण होईल यात शंका नाही. प्रत्येक गावात किमान एक तरी मारुती मंदिर आहे. पण जागृत मारुती फार कमी आहेत.



नंदकुमार जगदाळे
भ्र. ८८८८७४०७८०

श्रीक्षेत्र गौडगांव येथील मारुती जागृत असून तो भक्तांच्या अनेक मनोकामना पूर्ण करतो. ११ शनिवार, ११ मंगळवार श्रीक्षेत्र गौडगांव येथे येऊन मारुतीची पूजा करून मनातील इच्छा मारुतीसमोर व्यक्त केल्यास ११ शनिवाराच्या आतच मनातील इच्छा पूर्ण होते. हा अनुभव अनेक भक्तांनी घेतला आहे. यामुळे शनिवारी व मंगळवारी श्रीक्षेत्र गौडगांव येथे लाखो भक्तगण दर्शनासाठी न चुकता येतात. त्यामुळे जत्रेचे स्वरूप येते.

शारीरिक व मानसिक पीडा कमी व्हाव्यात, आर्थिक संकट दूर व्हावे, नोकरी मिळावी, संततीप्राप्ती व्हावी, व्यापार भरभराटीस यावा, वाईट शक्तीपासून संरक्षण व्हावे, म्हणून असंख्य लोक श्रीक्षेत्र गौडगांव येथील मारुतीची उपासना करून फलप्राप्त करून घेत आहेत.

फलप्राप्तीमुळे भाविक आनंदाने, स्वखुशीने या जागृत मारुतीस थन, अन्नधान्य, वस्तूरूपात यथाशक्ती देणगी देत आहेत. या देणग्यातून विश्वस्त समिती मंदिराचा जीर्णोद्धार करीत असून भक्त निवास व अन्नछत्राचे बांधकाम चालू आहे.

सध्या शनिवारी व मंगळवारी अन्नदान केले जाते. अक्कलकोटपासून गौडगांवला जाण्याकरिता एस.टी. बसेस तसेच खाजगी वाहनेही आहेत. सोलापूरहून सिटी बसेसची सोय आहे. तसेच मेल, उद्यान व सर्व पॅसेंजर रेल्वे गाड्या अक्कलकोट स्टेशन येथे थांबतात. तरी आपण मारुतीचे दर्शन घेवून पुनीत व्हावे.






# मंगळवेढा: काळ्या मातीतून उगवलेले सोनं

**मंगळवेढा- हा नकाशावरचा एक साधा गाव नव्हे; हा एक असा परिसर आहे ज्याची माती इतिहास, अध्यात्म, समाजसेवा आणि शेती या सर्व पैलूंनी पवित्र झाली आहे. सोलापूर जिल्ह्याच्या नैऋत्येस ५४ किलोमीटर अंतरावर वसलेला मंगळवेढा समुद्रसपाटीपासून सुमारे ४५८ मीटर उंचीवर आहे. भौगोलिकदृष्ट्या हा परिसर १७ ते १३ उत्तरे रेखावृत्त व ७५ ते २५ पूर्व अक्षवृत्तात स्थीत आहे. या नगरीचे क्षेत्रफळ, लोकसंख्येची परिस्थिती, आर्थिक व सामाजिक रचना व त्यातील विकासाच्या शक्यता यांचा सखोल आढावा घेतला असता मंगळवेढा हा केवळ तालुका नसून एक सांस्कृतिक-आर्थिक केंद्र म्हणून जास्त महत्त्वाच्या अंगाने उभा राहतो.**

## ऐतिहासिक ते आध्यात्मिक, सर्वांगिण विकासाच्या दिशेनं वाटचाल






बाळासाहेब नागणे
भ्र.-९७६३२३७७०७

**प्राचीन आणि ऐतिहासिक वारसा–** मंगळवेढ्याच्या भूमीत विविध कालखंडांचे ठशी स्पष्ट दिसतात. ब्रह्मदेवाची मूर्ती पुष्कर–जवळ आणि इथंच आढळल्याचे नोंदी या भूमीच्या प्राचीन संस्कृतीचे द्योतक आहेत. माचनूर येथील शिवमंदिर, काशीविश्वेश्वर मंदिर आणि तालुक्यातील इतर शिल्पकला व पुरातत्त्वीय अवशेष हे दर्शवतात की हा प्रदेश प्राचीन काळापासून सभ्यतेचा केंद्र राहिला आहे. उत्खननातून मिळालेल्या अवशेषांमुळे हरिहर किनाऱ्याच्या सिद्धापूर–मुडवी परिसरातही प्राचीन स्थापत्य व आर्थिक व्यवहाराचे पुरावे मिळाले आहेत. माचनूर किल्ल्यात प्रतापाने आणि शत्रुसैन्यांनी येथे तळ ठोकलेले. औरंगजेबांच्या काळातील कारवायांची उल्लेखनीय नोंद. या भागाचा ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करते.

**धर्म, संत वारसा आणि आध्यात्मिक परंपरा–** मंगळवेढा म्हणजे संतभूमी; या भूमीवर अनेक संतांचे पदस्पर्श आणि त्यांची शिकवण आजही जिवंत आहे. महात्मा बसवेश्वरांनी समाजात समतेचे सूत्र रुजवले, दामाजीपंत यांनी जनतेला स्वराज्याचे बोध दिले; कान्होपात्रा, स्वामी समर्थ आणि इतर संतांमुळे येथील मातीला एक वेगळा आध्यात्मिक सुगंध लाभला आहे. या संतपरंपरेमुळे मंगळवेढा केवळ स्थानिक लोकांसाठी नव्हे तर श्रद्धाभावाने पर्यटनाच्या दृष्टीनेही आकर्षक ठरतो.

**सांस्कृतिक व साहित्यिक परंपरा–** मंगळवेढ्याच्या भूमीने अनेक प्रतिभावान कलाकार व क्रीडापटूंना जन्म दिला आहे. गायनविश्वात प्रल्हाद शिंदे, आनंद शिंदे, मिलिंद शिंदे यांनी मंगळवेढ्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर चमकवले आहे. क्रीडा क्षेत्रात भाग्यश्री बिले, सविता बिराजदार, सुनील बिले यांसारख्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर तालुक्याचे प्रतिनिधित्व केले आहे. अशी सांस्कृतिक व क्रीडा परंपरा मंगळवेढ्याच्या सामाजिक जीवंततेचे प्रतीक आहे.

**भौगोलिक आणि कृषी संसाधने–** तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १,१४,२००४ (तुमच्या दिलेल्या आकड्यानुसार) असून त्यातील ८५,००० हेक्टर जमीन लागवडीस उपयुक्त आहे. उजनी कालव्याच्या माध्यमातून सुमारे २५,००० हेक्टर पाणीपुरवठ्याखाली आलेले असून आणखी ५०० हेक्टरांवर सिंचनाची क्षमता वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. दक्षिण भागातील २४ गावांसाठी विशेष पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत असून, यामुळे तालुक्यात फलोत्पादन व बागायती पिकांच्या लागवडीला चालना मिळाली आहे. शेतीत रब्बी पिकांसोबत ज्वारीची परंपरा आणि मालदांडीतील संशोधनात्मक पद्धतींमुळे उत्पादन वाढीसाठी प्रयत्न सुरू आहेत.

**समाजिक, राजकीय आणि प्रशासकीय स्थिती–**

मंगळवेढा हा अनेकदा मागासवर्गीय मतदारसंघ म्हणून गणला गेला आहे, त्यामुळे वेळोवेळी केंद्रित लक्ष मिळण्याचं प्रमाण मर्यादित राहिलं. तथापि इतिहासात एन.एस. कांबळे, किसनलाल मर्दा, विमलताई बोराडे, लक्ष्मणराव ढोबळे, डॉक्टर रामचंद्र साळे, भारत भालके यांसारख्या नेत्यांनी या भूमीचे प्रतिनिधित्व केले आहे.

सध्याचे आमदार समाधान आवताडे हे पंढरपूर– मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. प्रशासनिकदृष्ट्या तालुक्यात महसूल उपविभागीय कार्यालये, पोलीस उपविभागीय कार्यालय व इतर मूलभूत सेवा उपलब्ध आहेत, परंतु विकासाच्या गतीसाठी अधिक धोरणात्मक वाटचाल आवश्यक आहे.

**विकासात्मक अपेक्षा आणि प्राथमिकता–** मंगळवेढ्याच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक लोकांनी आणि नेत्यांनी काही ठोस मागण्या मांडल्या आहेत. त्या मागण्या केवळ तात्पुरत्या नव्हे, तर दीर्घकालीन सर्वांगीण नियोजनाचे आराखडे सुचवतात. प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे...

**तीर्थक्षेत्र आणि सांस्कृतिक पर्यटनाला चालना द्यावी–** मंदिरवर्ती, संतस्मृती व शिल्पकलेचे संवर्धन करावे.

**म्हाडा अंतर्गत गृहनिर्माण उपक्रम राबवावा–** तसेच भूमिहीनांसाठी जमीन व घरकुल योजनेचा वेग वाढवावा.

**संत–** साहित्य आणि स्थानिक संस्कृतीसाठी नाट्यगृह व समर्पित ग्रंथालय स्थापन करावे.

**कृष्ण तलावात–** नौकानयन व न्यूनगंडांचे पर्यटन विकास उपक्रम राबवावेत.

पंढरपूर मार्गावरील हद्दवाढीत स्वतंत्र स्मशानभूमीसाठी जागा व नियमन करावे.

उन्हाळ्यात माण नदीत नियमित पाणी सोडण्याची व्यवस्था ठरवावी. शेतकऱ्यांना पाणीपरवाने तत्काळ उपलब्ध करावीत.

शिरनांदगी तलाव प्रकल्पासाठी आवश्यक निधी जुळवावा व उजनी कालव्याचे पाणी पूर्ण क्षमतेने वापरासाठी उपलब्ध करावे.

दक्षिण भागातील २४ गावांसाठी पाणीपुरवठा योजना भरीव निधीने मजबूत करावी; पौट–पाटकळ परिसरात मोठे साठवण तलाव उभे करावेत.






तालुक्यातील साठवण तलाव व सिमेंट बंधारांमधील गाळ काढण्याचे काम वेळेत करावे. मागास भागाचा सर्वे करून त्यानुसार विकास निधी व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करावी. शेतकऱ्यांसाठी सौरऊर्जा प्रकल्पांचे प्रोत्साहन व मोफत आराखडे राबवावेत.

**शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुनिश्चित करावा–** कृषियोग्य निधी, कर्ज व सल्लागार सेवांची प्रणाली सुलभ करावी.



**पशुधन वाढीसाठी कमी व्याजदरात कर्ज व्यवस्था करावी–** दूधसंकलनात गुणवत्तेनुसार दरवाढ व गुणवत्ता परीक्षण अनिवार्य करावे. सार्वजनिक आरोग्य केंद्रे व शाळांमध्ये सुधारणा करावी. माध्यमिक व उच्चशिक्षण संस्थांचा दर्जा वाढवावा.

**पुरवठा खात्याचे रेशन व वितरण व्यवस्थेवर अंकुश ठेवावा–** पिवळ्या कार्डातून वंचित राहिलेल्या लोकांचा पुन्हा सर्वे करून लाभ देण्यात यावा.

**औषध दुकानांची नियमित तपासणी व बिल देण्याचे बंधन लादावे–** कालबाह्य औषध आढळल्यास कठोर कारवाई करावी. खानावळी, हॉटेल व पब यांची महिन्यातून तपासणी करावी व सार्वजनिक आरोग्य नियमांची अंमलबजावणी करावी.

**यशोगाथा आणि पुढील वाटचाल–**

मंगळवेढ्यातील सहकारी चळवळीने, साखर कारखान्यांनी आणि स्थानिक उद्योजकांनी एकत्र येऊन आर्थिक नवसंकल्पना राबविल्या. दामाजी साखर कारखान्याचे योगदान, आवताडे शुगर, युटोपियन शुगर तसेच भैरवनाथ शुगरच्या माध्यमातून ऊस पिकाला नवे व्यापारी मार्ग मोकळे झाले आहेत. बेरोकटोक कष्ट आणि सहकाराच्या सिद्धांतामुळे स्थानिक लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडले आहेत. परंतु या विकासाला व्यापक पातळीवर बळ देण्यासाठी अधिक योजनात्मक आणि धोरणात्मक प्रयत्नांची गरज आहे.

**समाजहिताचे आव्हान आणि स्थानिक सहभाग–**

मंगळवेढ्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन, स्थानिक स्वराज संस्था, नागरिकसंघटना, सहकारी संस्था व जनप्रतिनिधींनी एकत्र काम करणे अत्यावश्यक आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा आणि विधानपरिषदेतील प्रतिनिधींनी स्थानिक समस्या–पाणी, सिंचन, शिक्षण, आरोग्य, रोजगार व सुरक्षा–या सर्वांवर लक्ष केंद्रित करावे. या भागाला प्रामुख्याने सामाजिक व आर्थिक समरूपतेची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष– एक नवा संकल्प**

मंगळवेढा ही काळ्या मातीतून उगवलेली अशी भूमी आहे ज्याने इतिहास लिहिला आहे, संतांची शिकवण दिली आहे आणि सध्याच्या संघर्षातून प्रगत भविष्यासाठी उभी राहण्याचा आग्रह धरला आहे. या तालुक्याच्या सुसंस्कृत, स्वावलंबी आणि समतोल विकासासाठी स्थानिक जनतेच्या अपेक्षा स्पष्ट आहेत.

मंगळवेढ्याच्या जुन्या परंपरा व आधुनिक गरजांचे समन्वय करुन योग्य धोरण राबविले तर ही भूमी नक्कीच खऱ्या प्रकारचे सोनं दर्शवेल. आपल्या या प्रचंड, विविध अंगांनी परिपूर्ण मंगळवेढ्यावरच्या मतामध्ये कित्येक लोकशाही–आर्थिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक प्रस्ताव आहेत. आता आवश्यकता आहे त्या प्रस्तावांची अंमलबजावणी करण्याची तंत्रज्ञान, प्रशासनिक इच्छाशक्ती, स्थानिक सहभाग आणि दीर्घकालीन नियोजन या तिन्हीचा समन्वय साधून मंगळवेढ्याला समृद्ध, सुरक्षित आणि सुसंस्कृत बनवण्याची.



सोलापूर-मंगळवेढा हाय वे




### अर्थव्यवस्था व सहकार क्षेत्र

मंगळवेढा हा परंपरागतरित्या कृषिप्रधान तालुका आहे. उजनी धरणाच्या डाव्या कालव्याने सिंचनाचे प्रमाण वाढल्याने शेतकरी पिकांचे प्रकारही बदलले; आता फळबाग (डाळिंब, द्राक्ष), ऊस आणि इतर उच्चमूल्याचे पिक मोठ्या प्रमाणावर लागवड होतात. तालुक्यात चार साखर कारखाने कार्यरत असून दामाजी साखर व आवताडे शुगर, युटोपियन शुगर तसेच भैरवनाथ शुगर ह्या उद्योगांनी येथील शेतकरी आणि सहकारी संस्थांना आर्थिकदृष्ट्या सबळ केले आहे. स्थानिक सहकारी आणि बँक संघटनांनी शेतकऱ्यांना कर्ज व बाजारातील सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य केले आहे. स्वर्गीय मारवाडी वकील व रतनचंद शहा यांनी सहकारी बळ वाढवून स्थानिक विकासाची पायाभरणी केली.



























| अ.क्र. | तपशील | 31/03/2025 | 31/03/2026 |
|---|---|---|---|
| १ | भागभांडवल | 502.05 | 536.74 |
| २ | ठेवी | 19147.78 | 21159.62 |
| ३ | कर्जे | 12467.93 | 12684.85 |
| ४ | ढोबळ नफा | 385.55 | 496.65 |
| ५ | निव्वळ एन पी ए % | 0% | 0% |
| ६ | गुंतवणुक | 7690.82 | 8713.62 |






